मुंबई मराठी साहित्य संघ

# अमृत स्मृती



अमृत स्मृती

मुंबई मराठी
साहित्य संघ

# अमृत स्मृती

मुंबई मराठी साहित्य संघ

प्रथमावृत्ती : दिनांक २७ ऑक्टोबर २००९
मुंबई मराठी साहित्य संघ - अमृतमहोत्सवी वर्धापनदिन

संकलन-संपादन : यशवंत पंडित, उषा तांबे, उज्ज्वला मेहेंदळे

प्रकाशक : डॉ.रा. अ. तथा बाळ भालेराव
प्रमुख कार्यवाह, मुंबई मराठी साहित्य संघ
डॉ. अ. ना. भालेराव मार्ग, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक : ॲपीज् डिझाईन ॲन्ड प्रिंटस्
दादर, मुंबई ४०० ०१४

# मुंबई मराठी साहित्य संघ

# अमृत महोत्सव



## डॉ. अमृत नारायण भालेराव

जन्म १२ डिसेंबर १९०२
मृत्यू २५ ऑगस्ट १९५५

हे सारस्वताचे गोड, तुम्हीं चिं लाविलें जी झाड।
तरी अवधानामृतें वाढ, सिंपौनि की जो।।
मग हे रसभावफुली फुलैल, नाना फळभारे भरेल।
तुमचेनि प्रसादे होईल, उपयोगु जगा।।

- ज्ञानेश्वरी ११ वा अध्याय

## संघाचे विश्वस्त

    

अमृत नारायण भालेराव
गंगाधर मार्तंड फडके
रामराव गणपतराव विजयकर
भालचंद्र नीळकंठ पुरंदरे
दुर्गाबाई खोटे

मुंबई मराठी साहित्य संमेलन १९३४ - पहिल्या अधिवेशन प्रसंगीचे छायाचित्र



# व्यवस्थापन मंडळ


| | |
|---|---|
| **विश्वस्त** | श्री. मधु मंगेश कर्णिक, डॉ. वसंत पटवर्धन, श्रीमती विजया दिवेकर, श्री. हरिविजय गुर्जर |
| **अध्यक्ष** | श्री. जयंतराव साळगावकर |
| **उपाध्यक्ष** | श्री. राजाराम शिंदे, प्रा. सुभाष भेंडे, डॉ. चंद्रप्रकाश पुरंदरे, श्रीमती वसुंधरा पेंडसे-नाईक<br>श्री. प्रकाश पागे, श्री. गुरुनाथ दळवी, श्री. अच्युत फडके |
| **नियामक मंडळ सदस्य** | श्री. वसंत काकिर्डे, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. शशिकान्त कुलकर्णी, श्री. माधव खाडिलकर, श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर, श्री. मधुसूदन य. जोशी, श्री. सुधीर ठाकूर, श्री. विलास ढवळे, प्रा. उषा तांबे, श्रीमती मंगला पंडित, श्री. मोहन पंडित, श्री. यशवंत पंडित, श्री. रोहिदास पांगे, श्री. सुनील पै, श्रीमती नलिनी फणसे, श्री. अशोक वेंडखळे, श्री. स्वामीकुमार वाणात्लीकर, श्री. सुभाष भागवत, श्री. दिलीप भाटवडेकर, डॉ. रा. अ. (वाळ) भालेराव, डॉ. अश्विनी भालेराव-गांधी, डॉ. अलका मांडके, श्रीमती आशा मुळगावकर, डॉ. शशांक मुळगावकर, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्री. सतीशचंद्र म्हात्रे, श्री. विलास म्हामणकर, श्री. मधुकर शेजवलकर, श्रीमती रेखा सबनीस, श्रीमती गीता सोमण, श्री. मनोहर सोमण, श्री. चंद्रकान्त हेगिष्टे, श्री. प्रवीण धैर्यवान, श्रीमती कुंदा पडळकर, श्री. प्रमोद पवार |
| **नियामक मंडळ स्वीकृत सदस्य** | श्री. आमोद उसपकर, श्रीमती धनश्री धारप, डॉ. अचला जोशी, श्री. सुरेंद्र आपटे, श्री. मल्हार ढगे |
| **कार्यकारी मंडळ** | श्री. यशवंत पंडित, श्रीमती आशा मुळगावकर, डॉ. रा. अ. (वाळ) भालेराव, प्रा. उषा तांबे, श्री. सुभाष भागवत, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्रीमती रेखा सबनीस, श्री. प्रमोद पवार, श्री. चंद्रकान्त हेगिष्टे, श्री. सुनील मेहेंदळे, श्री. रोहिदास पांगे |
| **कार्यकारी मंडळ स्वीकृत सदस्य** | श्री. दिलीप भाटवडेकर, श्री. माधव खाडिलकर, श्रीमती कुंदा पडळकर, |
| **कायम निमंत्रित** | श्री. गुरुनाथ दळवी, श्री. अच्युत फडके, श्री. स्वामीकुमार वाणावलीकर, डॉ. शशांक मुळगावकर |

| | | |
|---|---|---|
| पदाधिकारी | कार्याध्यक्ष | - श्री. यशवंत पंडित, |
| | कोषाध्यक्ष | - श्रीमती आशा मुळगावकर |
| | प्रमुख कार्यवाह व नाट्यशाखा कार्यवाह | - डॉ. रा. अ.(बाळ) भालेराव |
| | साहित्य शाखा कार्यवाह | - प्रा. उषा तांबे |
| | संघ मंदिर व्यवस्था समिती कार्यवाह | - श्री. सुभाष भागवत |

## विविध शाखा सदस्य

**साहित्यशाखा** प्रा. सुहासिनी कीर्तिकर, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्रीमती कुंदा पडळकर, श्री. मल्हार ढगे, श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर

**कायम निमंत्रित** श्री. विलास ढवळे, श्री. अशोक बेंडखळे, श्रीमती अचला जोशी, श्री. चंद्रशेखर गोखले, श्री. पद्माकर शिरवाडकर

**साहित्य, संस्कृती मंडळ**

**प्रतिनिधी** डॉ. अनुपमा उजगरे

### नाट्यशाखा

**विभाग प्रमुख** श्रीमती रेखा सबनीस, श्री. प्रमोद पवार

**सदस्य** श्री. माधव खाडिलकर, श्री. सुभाष भागवत, श्री. नारायण बोडस, श्री. मनोहर सोमण, श्री. शशीकांत कुलकर्णी, श्री. विलास म्हामणकर, श्रीमती गीता सोमण, श्रीमती धनश्री धारप, श्री. सुधीर ठाकूर

### संघ मंदिर व्यवस्था समिती

**सदस्य** श्री. रोहिदास पांगे, श्री. दिलीप भाटवडेकर, श्री. चंद्रकांत हेगिष्टे, श्री. अच्युत फडके, श्री. स्वामीकुमार वाणवलीकर, श्री. सुनील मेहेंदळे, डॉ. शशांक मुळगावकर, श्री. गुरुनाथ दळवी, श्री. मोहन पंडित, श्री. सुधीर ठाकूर

### विशेष कार्याधिकारी

| | |
|---|---|
| **हिशेब तपासनीस** | वाटलीवॉय आणि पुरोहित, चार्टर्ड अकाउंटंट्स |
| **अंतर्गत लेखा परीक्षक** | श्री. सुधीर फडके - एस. एस. फडके आणि कं. |
| **कायद्याचे सल्लागार** | सॉलिसिटर श्रीमती विजया दिवेकर, सॉलिसिटर दिवेकर आणि कंपनी |
| **मानद सल्लागार** | ॲडव्होकेट अधिक शिरोडकर |
| **आर्किटेक्ट** | मराठे आणि कुलकर्णी कंपनी |
| **बँकर्स** | द सारस्वत को-ऑप बँक लि. |

# साहित्य संघ - सन्माननीय सदस्य

इसवी सन १९६४ साली संघमंदिर उद्घाटनाचे वेळी प्रथमतः जीवनातील विविध क्षेत्रांत अग्रेसरत्व मिळवणाऱ्या व्यक्तींना संघाचे सन्माननीय सदस्यत्व देण्याच्या प्रथेस सुरुवात झाली. आत्तापर्यंत पुढील व्यक्तींना सन्माननीय सदस्यत्व हा बहुमान प्रदान करण्यात आला.

भीमसेन जोशी
सुनील गावस्कर
लता मंगेशकर
द. म. सुकथनकर
चित्तरंजन कोल्हटकर
जयमाला शिलेदार
चंद्रशेखर धर्माधिकारी
नीलकंठ खाडिलकर
सुधीर दामले
भालचंद्र पेंढारकर
शरच्चंद्रजी पवार
शि. मो. घैसास
अधिक शिरोडकर
विंदा करंदीकर

### दिवंगत

श्री. दा. सातवळेकर
ना. गो. चाफेकर
पां. वा. काणे
वि. दा. सावरकर
गणपतराव बोडस
भा. वि. वरेरकर
वा. वि. मिराशी
वि. पां. करमरकर
ना. सी. फडके
चिं. द्वा. देशमुख
सं. ल. हळदणकर
म. म. द. वा. पोतदार
वि. स. खांडेकर
प्र. के. अत्रे
लक्ष्मणशास्त्री जोशी
यशवंतराव चव्हाण
पांडुरंगराव पिसुर्लेकर
उमाशंकर जोशी
केशवराव दाते
धनंजयराव गाडगीळ
विनायकबुवा पटवर्धन
एम. आर. आचरेकर
यशवंत दि. पेंढारकर
ना. स. बेंद्रे
सुरश्री केसरबाई केरकर
द. रा. बेंद्रे
न. र. फाटक
ग. त्र्यं. माडखोलकर
अ. का. प्रियोळकर
आ. रा. देशपांडे
प्रबोधनकार के. सी. ठाकरे
हिराबाई बडोदेकर
नानासाहेब फाटक
मा. दत्ताराम वळवईकर
विजय मर्चंट
भा. नि. पुरंदरे
दुर्गाबाई खोटे
वा. ल. कुलकर्णी
रा. भि. जोशी
दि. वि. आमोणकर
वा. रा. ढवळे
पां. वा. सुखात्मे
सेतुमाधव पगडी
एस्. एम्. जोशी
ना. ग. गोरे
द. ग. गोडसे
मोघुबाई कुर्डीकर
वि. वा. शिरवाडकर
पु. ल. देशपांडे
अनंत वर्तक
मीनाक्षी शिरोडकर
ज्योत्स्ना भोळे
विश्राम बेडेकर
वनमाला
प्रमोद नवलकर
श्री.ना. पेंडसे
सुधीर फडके
माधवराव गडकरी
श्री. पु. भागवत
शं.ना. अंधृटकर
प्रभाकरपंत जोशी
अनंत दामले
श्रीरंग आडारकर
दाजी भाटवडेकर
डॉ.बाबा कलगुटकर
दामू केंकरे
गंगाधर गाडगीळ

# अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने

मुंबई मराठी साहित्य संघ - मुंबईतील एक अग्रगण्य संस्था ! सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रांत कार्यकर्तृत्व गाजवून, नावलौकिक सार्थ करणारी! या संस्थेने रौप्यमहोत्सव साजरा केला, सुवर्णमहोत्सवाच्या स्मृती कोरल्या, हीरकमहोत्सवाची तेजस्वी पाऊले उमटवून 'साहित्य संघ' आता अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे.

मुंबई शहर आणि उपनगर भागात मराठी भाषा आणि साहित्य यांच्या सर्वांगीण अभिवृध्दीसाठी विविध प्रयत्न करण्याच्या हेतूने मुंबई मराठी साहित्य संघाचा जन्म २१ जुलै १९३५ रोजी झाला. १९३४ साली मुंबई येथे भरलेल्या मुंबई आणि उपनगर साहित्य संमेलनाच्या पहिल्या अधिवेशनापासून साहित्यिक स्वरुपाचे स्थायी कार्य करण्यासाठी अशी संस्था स्थापन करण्याची कल्पना निघाली. साधनांच्या मर्यादेप्रमाणे साहित्य संघाचे प्रारंभीचे कार्यक्षेत्र मर्यादित राहिले. मुंबई व उपनगर भागांत वार्षिक साहित्य संमेलने भरविणे, साहित्यविषयक प्रासंगिक चर्चा घडवून आणणे, आल्या-गेल्या साहित्यिकांचा परामर्श घेणे, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे वर्ग चालविणे, स्वत:ची नियतकालिके चालविणे, कै. वामन मल्हार जोशी स्मरणार्थ दरसाल एखाद्या विद्वान वक्त्यांची पूर्वनियोजित व्याख्याने करवून ती शक्य तेंव्हा पुस्तकरूपाने प्रसिध्द करणे, व्याख्यानमाला चालविणे, असे या कार्याचे विविध प्रकारचे स्वरूप होते.

१९३८ साली स्वा. सावरकर व १९५०साली राजकवी यशवन्त यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत महाराष्ट्र साहित्य संमेलने भरली ती संघाच्याच वतीने. तथापि, १९४१ साली मुंबईस संघाच्या विद्यमाने भरलेले महाराष्ट्र नाट्यसंमेलनाचे ३२ वे अधिवेशन संघाच्या कार्यास जरा निराळी व जोराची कलाटणी देण्यास कारणीभूत ठरले. मराठी रंगभूमीस १९४३ साली १०० वर्षे पूर्ण होतात हे लक्षांत घेऊन त्यावर्षी महोत्सव करण्याची कल्पना याच अधिवेशनात निघाली. त्यावर्षी मुख्य महोत्सव सांगली येथे नोव्हेंबर महिन्यात झाला, तरी एप्रिल १९४४ मध्ये साहित्य संघाने मुंबई येथे मोठ्या प्रमाणावर खुल्या नाट्यगृहात पुन: साजरा केला, इतकेच नव्हे तर त्यानंतर दरसाल कमीअधिक प्रमाणात मुंबईत नाट्योत्सव साजरा करण्याची प्रथा पाडली. ही प्रथा आजपर्यंत संघाने अव्याहत पाळली आहे. खुल्या नाट्यगृहाची प्रथा प्राचीन काळापासून चालत आली असली तरी अलीकडे मुंबईत व इतरत्र ती संघाने लोकप्रिय केली. १९४४ साली पहिला नाट्योत्सव साजरा करतानाच 'साहित्य संघाच्या व तत्सम इतर संस्थांच्या साहित्यविषयक चळवळींकरिता व मुंबईतील नाट्यसंस्थांना प्रतिष्ठित समाजासमोर अल्प भाड्यात नाट्यप्रयोग करून दाखविण्याची सोय करणे' असा उद्देश डोळ्यासमोर ठेवण्यात आला होता. तो तर साध्य केला गेलाच, परंतु लौकरच गिरगावातल्या केळेवाडीतील जमीन संपादन करून संघाने तेथे एक अद्ययावत नाट्यगृह बांधले. ६ एप्रिल १९९४ रोजी या संघमंदिराचं उद्घाटन झाले आणि मराठी रंगभूमीला हक्काचं घर मिळाले.

## संघाच्या अमृतमहोत्सवी वाटचालीतील काही महत्वाचे टप्पे :

- दि. २१ जुलै १९३५ - मुंबई मराठी साहित्य संघ स्थापना व कार्याचा शुभारंभ
- दि. १९ जानेवारी १९३६ - साहित्य संघाची पहिली सर्वसाधारण सभा
- 'सावकारी पाश' या त्याकाळी गाजलेल्या बोलपटाचा सेंट्रल सिनेमात खास खेळ प्रेक्षक व समीक्षकांसाठी. तदनंतर प्रेक्षक व समीक्षक यांच्या चर्चासत्राचे आयोजन
- काँग्रेसचे पहिले मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांचा मुझफराबाद हॉलमधे संघातर्फे खास सत्कार
- स्वा. सावरकर तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर, कृष्ण सिनेमागृहात साहित्य संघातर्फे प्रकट सत्कार
- देशभक्त रावसाहेब पटवर्धन यांच्या जाहीर सत्काराचे आयोजन
- दि. १७ एप्रिल १९३७ - साहित्य संघाचा पहिला संघदिन 'जयलक्ष्मी' या नौकेवर उत्साहाने साजरा. संघदिनाचे पहिले महनीय प्रवक्ते रियासतकार गो. स. सरदेसाई
- साहित्य संघाचे पहिले मुखपत्र 'वीणा'चा प्रकाशन समारंभ. संपादक : श्री. म. वर्दे
- जप्त वाङमयाबरील बंदी उठवण्यासाठी चळवळ साहित्य संघाने जोरदारपणे सुरू केली.
- महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या बाविसाव्या अधिवेशनाचे १९३८ मध्ये साहित्य संघातर्फे आयोजन, अध्यक्ष :स्वा. सावरकर, स्वागताध्यक्ष : नामदार मुकुंदराव जयकर
- या साहित्य संमेलनात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या 'मायाविवाह' या नाटकाचा प्रयोग संघातर्फे करण्यात आला.



जप्त वाङमयावरील बंदी उठविण्याच्या मागणीसाठी गेलेले शिष्टमंडळ- वा.म.जोशी, मा.दा.आळतेकर,ना.म.जोशी, लालजी पेंडसे, न.चिं.केळकर, अ.ना.भालेराव, द. आ. तुळजापुरकर, श्री.म.वर्दे

- १९३८ ते १९४१ : परिभाषा मंडळ, शुध्दलेखनप्रचार, कॉपीराइट कायदा फेरविचार आणि सुधारणा या चळवळींचे संघातर्फे प्रभावी आयोजन
- साहित्य संघातर्फे 'बत्तीसावे' मराठी नाट्य संमेलन १९४१ मध्ये विल्सन हायस्कूलच्या प्रांगणात भरविण्यात आले. अध्यक्ष : आचार्य प्र. के. अत्रे, स्वागताध्यक्ष : श्री. वि. वर्तक

- या नाट्यसंमेलनात नटवर्य केशवराव दाते यांनी 'आम्हा कलावंतांना उभे राहण्यासाठी जागा द्यावी' अशी अपेक्षा व्यक्त केली. या नाट्यसंमेलनात साहित्य संघाने नाट्यगृह बांधण्याचा संकल्प सोडला.

- महर्षी अण्णासाहेब कर्वे यांना बनारस विद्यापीठाने डॉक्टरेट हा सन्मान दिला, यानिमित्त साहित्य संघातर्फे अण्णासाहेब कर्वे यांचा सत्कार करण्यात आला.

- १९४३ मध्ये सांगली येथे मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा केला. या उत्सवात साहित्य संघातर्फे 'शारदा' नाटकाचा देखणा प्रयोग करण्यात आला. बालगंधर्व, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, चिंतोपंत गुरव अशा अनेक दिग्गज कलावंतांनी या प्रयोगात भूमिका केल्या होत्या.



- या शतकमहोत्सवाला मुंबईहून तीनशे प्रतिनिधी गेले होते. या चमूचे नेतृत्व तसेच 'शारदा' नाटकाच्या प्रयोगाचे धुरीणत्व डॉ. अ. ना. भालेराव यांनी केले.

- १९४४ च्या एप्रिल महिन्यात साहित्य संघाने आपला भव्य नाट्योत्सव आयोजित केला. या नाट्योत्सवात नाट्यरसिकांचे विराट दर्शन झाले आणि मराठी रंगभूमीला नवसंजीवनी मिळाली.

- या नाट्योत्सवात झालेल्या 'शारदा' नाटकाच्या प्रयोगाला प्रकाश पिक्चर्सचे विष्णुपंत औंधकर सुवर्णपदक मिळाले. शारदेचे काम करणाऱ्या वासंती या अभिनेत्रीला सुशीलकुमार रुईया सुवर्णपदक मिळाले.

- या नाट्यमहोत्सवात 'भाऊबंदकी' नाट्यप्रयोगात भूमिका करणाऱ्या नानासाहेब फाटक व शिवरामपंत परांजपे यांना रौप्य करंडक तर 'वेड्यांचा बाजार' या नाटकात भूमिका केलेल्या अनंत वर्तक यांना सुशीलकुमार रुईया सुवर्णपदक मिळाले.

- १९४४ मध्ये साहित्य संघाने 'साहित्य' हे द्वैमासिक सुरू केले. संपादक : वा. रा. ढवळे

- १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. साहित्य संघाने या महान आनंददायी पर्वणीनिमित्त खास कार्यक्रम आखून स्वातंत्र्योत्सव साजरा केला.

- १९४८ मध्ये साहित्य संघाने अ. बा. गजेंद्रगडकर संदर्भग्रंथालय सुरू केले.
- साहित्य संघाने १९३८ पासून नाट्यनिर्मितीचा प्रारंभ केला असला तरी, साहित्य संघाच्या नाट्यशाखेची स्थापना १९४९ मध्ये झाली.
- या नाट्यशाखेतर्फे त्वरित नाट्य शिक्षणवर्ग सुरू करण्यात आले. या वर्गांना केशवराव दाते, नानासाहेब फाटक, पार्श्वनाथ आळतेकर यांचे मार्गदर्शन लाभले.
- १९५० मध्ये तेहतिसावे साहित्य संमेलन भरवले. अध्यक्ष : राजकवी यशवंत
- १९५० : कन्नड साहित्य संमेलनानिमित्त मुंबईत आलेल्या कन्नड साहित्यिकांचा सत्कार
- करमणूक कर सरकारने माफ करावा यासाठी साहित्य संघाने जोरदार चळवळ सुरू केली.
- दि. १० ऑक्टोबर १९५० : साहित्य संघ मंदिरासाठी भूसंपादन करण्यासाठी साठेखत झाले.
- दि. २२ ऑक्टोबर १९५० : साहित्य संघ मंदिर उभारण्यासाठी जमीनखरेदी - एक आनंदसोहळा
- दि. २७ ऑक्टोबर १९५२ : भूमिपूजन- केंद्रीय मंत्री न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांच्या हस्ते, पौरोहित्य : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी









• १९५३ : साहित्य संघाची लहान वास्तू आणि रंगमंच, खुले नाट्यगृह संपन्न, खुल्या नाट्यगृहात नाट्योत्सवाचा शुभारंभ

• १९५३ : भारतीय रेल्वे शताब्दिसमारंभात दिल्ली येथे साहित्य संघ नाट्यशाखेची 'भाऊबंदकी' आणि 'खडाष्टक' ही नाटके सादर करण्याचा बहुमान मिळाला.

• भारत शासनाने १९५४ मध्ये दिल्ली येथे राष्ट्रीय नाट्यमहोत्सवाचे आयोजन केले. या नाट्यमहोत्सवात चौदा भाषांतील नाट्यप्रयोग पारंपारिक विभागाचे प्रथम पारितोषिक, राष्ट्रपतिसन्मान मिळाला. साहित्य संघाने मराठी नाटकाचा ध्वज राजधानी दिल्लीत फडकविला.

• साहित्य संघ मंदिर इमारतनिधीसाठी रॉयल टर्फ क्लबने शाक शर्यत लावून दहा हजार रुपये देणगी दिली.



• दि. २५ ऑगस्ट १९५५ : साहित्य संघाचे प्रमुख संस्थापक, ज्यांनी संघासाठी सर्वस्वाचा त्याग केला, आयुष्य पणाला लावले, असे खंदे कार्यकर्ते डॉ. अ. ना. भालेराव यांचे दु:खद निधन

• दि. २६ जानेवारी १९५७ : पु. ल. देशपांडे लिखित-दिग्दर्शित 'तुझे आहे तुजपाशी' या संघ नाट्यशाखेच्या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. 'शारदा', 'भाऊबंदकी', 'होनाजी बाळा', 'तुझे आहे तुजपाशी', 'टिळक आणि आगरकर', ही संघाची नाटके, नाट्यशाखेच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे आहेत.



• १९५८ : साहित्य संघाची बालनाट्य शाखा 'मधुमंजिरी' या बालनाट्यप्रयोगाने कार्यरत झाली.

• दि . ७ जानेवारी १९६० : संघमंदिराचा कोनशिला समारंभ भारताचे अर्थमंत्री मा. चिंतामणराव देशमुख यांच्या हस्ते झाला.

- १९६१ : मा. वि. स. खांडेकर यांच्या 'ययाति' कादंबरीस साहित्य अकादमी पारितोषिक मिळाले. यानिमित्त साहित्य संघातर्फे वि. स. खांडेकर यांचा सत्कार



- १९६२ :डॉ.अमृत नारायण भालेराव यांच्या स्मरणार्थ 'अमृत नाट्य भारती' या नाट्यविभागाची स्थापना
- म. म. पांडुरंग वा. काणे यांना 'भारतरत्न' सन्मान मिळाल्याबद्दल साहित्य संघातर्फे त्यांचा सत्कार
- केळेवाडी या संघमंदिरासमोरील मार्गाचे, मुंबई महानगरपालिकेतर्फे, १९६३ मध्ये, 'डॉ. अ. ना. भालेराव मार्ग' असे नामकरण झाले. यासाठी नगरसेवक अप्पा पेंडसे, डॉ. बाबा कलगुटकर या साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



- १९६४ : साहित्य संघाच्या वाङ्मयीन परीक्षांचे वर्ग सुरू करण्यात आले.
- दि. ६ एप्रिल १९६४ : नव्या विस्तारित वास्तूचा भव्य दिव्य उद्घाटन समारंभ भारताचे संरक्षणमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाला.





**मुंबई मराठी साहित्य संघाच्या १९६४ साली नवीन वास्तूच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या नांदीतील सहभागी प्रतिथयश कलाकार**

- साहित्य संघाचे आधारस्तंभ डॉ. गं. भा. फडके यांचे दि. १३ सप्टेंबर १९६४ रोजी दु:खद निधन

- दि. १ ऑगस्ट १९७० - अमराठी प्रौढांसाठी मराठी भाषा वर्ग सुरू

- दि. २५ ऑगस्ट १९७३ रोजी कै. डॉ. अ. ना. भालेराव यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण महापौर सुधीर जोशी यांच्या हस्ते झाले.



मराठी भाषा वर्गाचे प्रौढ विद्यार्थी व अध्यापक -पहिला गट १९७१

- १९७४ मध्ये साहित्य संघ नाट्यशाखेतर्फे जर्मनीचा यशस्वी दौरा. 'अजब न्याय वर्तुळाचा' या नाटकाचे झुरिच आणि बर्लिन येथे नाट्यप्रयोग. वायमार येथील राष्ट्रीय नाट्यशिक्षण केंद्रात, संघ नाट्यशाखा आणि कलावंत यांचा सत्कार. हा दौरा डॉ. बाळ भालेराव यांच्या नेतृत्वाने सफल



मराठी भाषा वर्गाचे अध्यापक - रमेश तेंडुलकर, मल्हार ढगे, राम पटवर्धन, अरुण कुलकर्णी, वसंत भांडारे, सुधा जोशी

- १९७६ : मा. वि. स. खांडेकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबद्दल संघातर्फे त्यांचा सत्कार

- १९८० : कै. न. र. फाटक संशोधन केंद्राची स्थापना

- १९८२ : संघ नाट्यशाखेतर्फे 'टिळक आणि आगरकर' या नाटकाची निर्मिती

- १९८६ : मुंबई मराठी साहित्य संघातर्फे अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या हीरक महोत्सवी साहित्य संमेलनाचे आयोजन. अध्यक्ष: विश्राम बेडेकर, स्वागताध्यक्ष: दत्ताजी नलावडे, महापौर, मुंबई

- १९८६-१९८७ : नाट्यसमीक्षक मेळावा आयोजन

- १९८९ : ज्ञानपीठ पारितोषिक मानकरी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा सत्कार

- १९९० : मुंबई मराठी पत्रकार संमेलन आयोजन

- मराठी प्रकाशक संमेलन आयोजन

- दि. २०-२१ एप्रिल १९९१ : विनोदी साहित्य संमेलन

- १९९२ : भाषाभगिनी संमेलन

- १९९४ : साहित्य संघ नाट्योत्सव, सुवर्ण स्मृती नाट्योत्सव
- दि. १४-१५ जानेवारी १९९५ : विभागीय संमेलने
- १९९५ : मुंबई मराठी साहित्य संघ - हीरक महोत्सव
- दि. २२ ते २४ मार्च १९९६ : मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलन (पूर्वी मुंबई व उपनगर साहित्य संमेलन म्हणून संबोधत.)
- १९९६ : साहित्य संघाची प्रतिवार्षिक साहित्य सेवा, नाट्यसेवा पारितोषिक योजना प्रारंभ
- २००१ ते २००२ : कै. डॉ. अ. ना. भालेराव जन्मशताब्दी
- दि. १२ एप्रिल २००३ : ३२वे मुंबई महानगर मराठी साहित्य संमेलन - एक सांस्कृतिक सरिता (साहित्य संघाच्या ६५ वर्षांतील कार्याचा आढावा) प्रकाशित
- दि. १४ ऑगस्ट २००३ : पहिली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा
- दि. १६ नोव्हेंबर २००३ : मुं. म. सा. संघातर्फे पहिले महाविद्यालयीन मराठी साहित्य संमेलन
- डिसेंबर २००३ : अमृतकुंभ त्रिस्तरीय एकांकिका स्पर्धेचा प्रारंभ

  १. युवा अमृत करंडक :(महाविद्यालयीन गट)

  २. अमृतवेल करंडक (हौशी गट)

  ३. अमृत कर्मश्री करंडक (कर्मचारी गट)

अमृतकुंभ

- १७ मार्च २००४ : रंगसंग या प्रायोगिक नाटकांच्या उपक्रमाचे उद्घाटन - सुप्रसिध्द अभिनेते व दिग्दर्शक दामू केंकरे यांच्या हस्ते
- दि. १४ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २००५ : रंगसंगतर्फे १२ नाटकांचे बहुभाषिक (उर्दू, गुजराती, इंग्रजी, हिंदी व मराठी) रंगोत्सव
- दि. १२ डिसेंबर २००७ : साहित्य संघाचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक प्रा. गंगाधर गाडगीळ पुरस्कृत मिलिंद गाडगीळ स्मृती पारितोषिक (बालवाङ्मय) निलीमकुमार खैरे यांच्या चंदुकाका या बालवाङ्मयाच्या पुस्तकास प्रदान
- २००८ : दुसऱ्या पिढीचे आत्मकथन - पुस्तक प्रकाशन



# साहित्य शाखा



# साहित्य शाखा - क्षणचित्रे





मुंबई मराठी साहित्य संघाच्या नवीन वास्तूचे उद्‌घाटन - प्रमुख पाहुणे यशवंतराव चव्हाण

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांचा वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सत्कार

मनोरमाबाई फडके, लता मंगेशकर



प्रा. वि. भा. देशपांडे, विजया मेहता, ज्ञानेश्वर नाडकर्णी, बाबा कलगुटकर

बाबा कलगुटकर, पु. ल. देशपांडे, गंगाधर गाडगीळ

डॉ. अ. ना. भालेराव जन्मशताब्दी महोत्सव पद्मा घारपुरे, शरद पवार, गंगाधर गाडगीळ












संमेलाध्यक्ष श्री. केशव मेश्राम यांचा सत्कार - प्रज्ञा लोखंडे, दाजी भाटवडेकर, केशव मेश्राम, के. ज. पुरोहित, गंगाधर गाडगीळ, निरंजन उजगरे

डॉ. अ. ना. भालेराव जन्मशताब्दी सोहळा

सुगावा प्रकाशन - उषा वाघ, नरेंद्र जाधव, विलास वाघ, कुंदा पडळकर, य. दि. फडके






जयंत साळगावकर, मधु मंगेश कर्णिक, डॉ. सुभाष भेंडे, डॉ. बाळ भालेराव

प्रमोद नवलकर, दाजी भाटवडेकर, अनिल अवचट, सदाशिव अमरापूरकर




महानगर संमेलन - अध्यक्ष : शंकर वैद्य

## इये साहित्याचिये नगरी

-डॉ. सौ. उज्ज्वला मेहेंदळे

इ.स. १९७० साली मी मुंबईत आले आणि मुंबई मराठी साहित्य संघाशी माझा पहिला संबंध आला, तो उत्तमोत्तम नाटके बघण्याच्या निमित्ताने. 'अश्रूंची झाली फुले', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'नटसम्राट', 'हिमालयाची सावली', 'बॅरिस्टर','तो मी नव्हेच' अशी एकाहून एक सरस नाटके गिरगावकरांना दाखविण्याचे मोलाचे कार्य मुंबई मराठी साहित्य संघाच्या 'डॉ. अ.ना.भालेराव' नाट्यगृहाने केले. साहित्य संघात नवीन नाटकाचा प्रयोग होतो कधी आणि आपण ते नाटक बघतो कधी यासाठी समग्र गिरगावकर डोळे लावून बसलेले असत. मुंबई मराठी साहित्य संघ म्हणजे एक चांगले नाट्यगृह इतकीच मला मर्यादित माहिती होती आणि मग या वास्तूला 'मुंबई मराठी साहित्य संघ' असे नाव कां ? असे कुतुहल माझ्या मनात निर्माण होत असे.

इ.स. १९९० पासून माझा मुंबई मराठी साहित्य संघाशी जवळून संबंध आला आणि मग लक्षात आले की हे नुसते नाट्यगृह नाही तर मराठी साहित्य - काव्य - नाट्य - अभिनय - लेखन - वाचन अशा सर्व गोष्टी सामान्य माणसापर्यंत पोहोचवणारी आणि त्यांची साहित्यिक तृषा शांत करणारी एक सांस्कृतिक सरिता आहे. या सांस्कृतिक सरितेचा उगम इ.स. १३९५ मध्ये झाला आहे. मुंबईमधील मराठी भाषाप्रेमी लोकांनी एकत्र येऊन २१ जुलै १९३५ रोजी 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावाने या संस्थेची रीतसर स्थापना केली. संस्थेचे कार्यालय संस्थेचे चिटणीस डॉ. अ. ना. भालेराव यांच्या विठ्ठलभाई पटेल रस्त्यावरील 'नारायण मॅन्शन' या घरात सुरू झाले. 'साहित्य संघा'च्या स्थापनेपासून ते 'साहित्य संघा'ला एका कार्यरत अशा उत्तम संस्थेचे स्वरूप देण्यात डॉ. अ. ना. भालेराव यांचे अथक परिश्रम तर कारणीभूत होतेच पण त्यांच्या या विचाराला प्रोत्साहन देणारे - आर्थिक - मानसिक - वैचारिक आणि शारीरिक पाठबळ देणारे अनेक हात त्यांच्या बरोबर होते. आजही कै. डॉ. अ. ना. भालेरावांचे चिरंजीव डॉ. बाळ भालेराव आपल्या पित्याची परंपरा चालवत आहेत. मात्र आता साहित्य संघ ही एक सरिता राहिली नाही, तो 'साहित्य सागर' झाला आहे.

इ.स. १९३४ ते १९४४ या दशकापासून पुढची इ.स. २००४ पर्यंतची सात दशके आणि त्यापुढची आज पर्यंतची पुढची पाच वर्षे असा एकूण पंचाहत्तर वर्षांचा कालखंड 'साहित्य संघा'ने पाहिला. या कालखंडात साहित्याच्या क्षेत्रात खूपच मोठी उलथापालथ झाली. साहित्यातले प्रवाह बदलले, विचार बदलले, लेखक बदलले आणि लेखनाची पध्दतही बदलली. पंचाहत्तर पावसाळे पाहिलेल्या साहित्य संघाने हे सर्व बदल स्वीकारत, नव्हे या बदलांचे आनंदाने स्वागत करत आपल्या साहित्य संस्थेची वाटचाल यशस्वीपणे चालू ठेवली आणि पुढेही ती अशीच चालू राहिल. साहित्याच्या या प्रांगणात अनेक

लेखक - लेखिका, कार्यकर्ते - उपकर्ते आले. आपापल्या विचारानुसार विविध साहित्यिक कार्यक्रम आणि उपक्रम त्यांनी चालू केले. आजही असे अनेक साहित्यिक उपक्रम मुंबई मराठी साहित्य संघाच्या साहित्य शाखेच्या वतीने केले जातात आणि ते करताना मुंबई मराठी साहित्य संघाचे पदाधिकारी, कार्यकारी मंडळ, नियामक मंडळाचे आजी-माजी सदस्य, अनेक सन्माननीय लेखक आणि वक्ते आणि प्रामुख्याने साहित्य शाखेचे सर्व सदस्य यांचे बहुमोल सहाय्य मिळत असते. साहित्य शाखेचे नानाविध कार्यक्रम या सर्वांच्या सहकार्याने उत्तम तऱ्हेने पार पडत आहेत.

इ.स. १९३४ पासून 'मुंबई मराठी उपनगर' संमेलनांची सुरूवात झाली. सुरूवातीला उपनगर संमेलन असे संबोधल्या जाणाऱ्या या संमेलनांना पुढे 'महानगर संमेलन' असे म्हटले जाऊ लागले. इ.स. १९३४ पासून साहित्य संघाने तेवीस 'उपनगर संमेलने' आणि त्यानंतर १० 'महानगर संमेलने' आयोजित केली. ह्या संमेलनांपैकी काही 'साहित्य संघात' तर काही मुंबईच्या उपनगरांमधून आयोजित केली गेली. आज बहुतेक सर्व उपनगरात छोट्या-मोठ्या साहित्य संस्थांची स्थापना झाली आहे. पण पूर्वी उपनगरातल्या लोकांना निरनिराळ्या साहित्यिक कार्यक्रमांचा आस्वाद घेता येत नसे. त्याची उणीव भरून काढण्याचा हा संघाचा प्रयत्न अतिशय स्वागतार्ह ठरला. आजही या महानगर संमेलनांना उत्तम प्रतिसाद मिळतो. या संमेलनांमधून नवनव्या विषयांवरील परिसंवाद प्रख्यात लेखकांच्या मुलाखती, प्रस्थापित आणि नवोदित कवींचे कविसंमेलन अशा साहित्यिक मेजवानीची रेलचेल असते. अनेक लोकप्रिय साहित्यिक अगदी फडके - खांडेकर - माडखोलकर यांच्यापासून ते आजच्या विजया राजाध्यक्ष, केशव मेश्राम, विश्वास पाटील, शंकर वैद्य, सुभाष भेंडे यांच्यापर्यंतचे साहित्यिक या महानगर संमेलनांचे अध्यक्षपद भूषवून गेले आहेत.

'महाविद्यालयीन तरूण मुलामुलींना आजकाल मराठी भाषेबद्दल फारसे प्रेम उरले नाही' असे एक सरसकट विधान बऱ्याचजणांकडून केले जाते. परंतु,

> 'माझा मराठीचे बोलु कौतुके । परी अमृतातेंही पैजा जिंके ।
> ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन' ।।

ही ज्ञानदेवांची उक्ती सार्थ करत मुंबई मराठी साहित्य संघाने 'महाविद्यालयीन साहित्य संमेलने' आयोजित केली. सध्याच्या तरूण पिढीत मराठी साहित्याची आवड जोपासण्याच्या दृष्टीने संघाने सुरूवातीला साहित्य संघाच्या सभागृहात आणि नंतर विविध महाविद्यालयांच्या सहकार्याने 'महाविद्यालयीन मराठी संमेलने' आयोजित करण्यास सुरूवात केली. यासाठी संघाला रूईया महाविद्यालय, वझे कॉलेज, चेतना आणि कीर्ती कॉलेज यांनी अतिशय उत्तम सहकार्य दिले. पुढच्या वर्षीसाठी साठ्ये कॉलेजचे निमंत्रण आहे. ही संमेलने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना फार आवडायला लागली आहेत. कारण त्यांना भावतील असे विषय, त्यांना आवडतील असे संमेलनांचे अध्यक्ष आणि उद्‌घाटक आणि वक्तेही त्यांना आवडतील असे असतात. शिवाय या संमेलनांचे सूत्रसंचालन, मुलाखती घेणे, परिसंवादात भाग घेऊन लेखकांना - वक्त्यांना प्रश्न विचारणे, कविसंमेलनात भाग घेऊन आपल्या कविता सादर करणे हे सर्व महाविद्यालयीनी विद्यार्थी - विद्यार्थिनी करतात. साहित्य संघाची

साहित्य शाखा त्यांना फक्त मार्गदर्शन करते. या मुलांना हा सहभाग घेता यावा यासाठी आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आणि काव्य स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धांमधून क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींना संघ तर प्रशस्तीपत्रके देतोच, शिवाय महाविद्यालयीन संमेलनात आणि मुख्यत: अखिल भारतीय साहित्य संमेलनातही कार्यक्रमात भाग घेण्याची संधी त्यांना उपलब्ध करून दिली जाते.

'अखिल भारतीय साहित्य महामंडळ' ही एक मध्यवर्ती संघटना आहे. या संघटनेच्या चार प्रमुख घटक संस्थांपैकी 'मुंबई मराठी साहित्य संघ' ही एक घटक संस्था आहे. साहित्य संघाच्या साहित्य शाखेचे तीन प्रतिनिधी या महामंडळाचे प्रतिनिधी म्हणून काम पाहतात. आतापर्यंत डॉ. बाबा कलगुटकर, श्रीमती पद्मा घारपुरे, श्रीमती वसुंधरा पेंडसे नाईक, श्री. निरंजन उजगरे, श्रीमती सुहासिनी कीर्तिकर, श्रीमती उषा तांबे, श्रीमती कुंदा पडाळकर, श्री. अ. ग. फडके, श्रीमती उज्ज्वला मेहेंदळे यांनी साहित्य महामंडळाचे प्रतिनिधी म्हणून काम केले आहे. इ.स. १९९९ ते २००१ या काळात साहित्य महामंडळाचे दफ्तर साहित्य संघाकडे होते. तेव्हा महामंडळाच्या अध्यक्ष म्हणून श्रीमती वसुंधरा पेंडसे नाईक सुरुवातीला कार्यवाह पद्माताई घारपुरे आणि कोषाध्यक्ष डॉ. बाबा कलगुटकर होते. नंतर कार्यवाह म्हणून श्रीमती सुहासिनी कीर्तिकर आणि कोषाध्यक्ष म्हणून श्री. निरंजन उजगरे यांनी काम पाहिले होते. पुढील वर्षी म्हणजे इ. स. २०१० मध्ये साहित्य महामंडळाचे दफ्तर पुनश्च मुंबई मराठी साहित्य संघाकडे येईल.

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे 'साहित्य' हे त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते. इ. स. १९४७ पासून या नियतकालिकाची सुरूवात झाली. सुरुवातीला काही दिवस हे नियतकालिक, 'वीणा' या नावाने प्रसिद्ध होत होते पुढे ते 'साहित्य' या नावाने प्रसिद्ध व्हायला लागले. 'साहित्य' सुरूवातीला द्वैमासिक होते. जानेवारी आणि एप्रिल असे वर्षातून दोन वेळा ते प्रसिद्ध होत असे. आता हे त्रैमासिक आहे. अलिकडे 'साहित्य दिवाळी अंक' हा एक उल्लेखनीय अंक काढला जातो कै. वा. रा. ढवळे यांच्या संपादकत्वाखाली सुरू झालेल्या या अंकाचे संपादन नंतरची काही वर्षे श्री. मल्हार ढगे नंतर कै. निरंजन उजगरे यांनी केले. गेली काही वर्षे हे कार्य प्रा. सुहासिनी कीर्तिकर करत आहेत. प्रथितयश लेखक आणि कवी याच बरोबर नवोदित साहित्यिकांनाही सहभागाची संधी हे साहित्य त्रैमासिकाचे वैशिष्ट्य आहे.

मुंबई मराठी साहित्य संघाने मराठी साहित्याच्या सर्वच क्षेत्रात मुलुखागिरी केली आहे. त्यामुळे साहित्य विषयक ग्रंथांची प्रकाशने हा सुध्दा साहित्य संघाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. वा. ल. कुलकर्णी, वा. रा. ढवळे, गं. ब. ग्रामोपाध्ये, रा. श्री. जोग, अ. का. प्रियोळकर, प्रभाकर पाध्ये, श्री. म. वर्दे, कुसुमावती देशपांडे, अशा मान्यवर लेखकांची पुस्तके संघाने प्रकाशित केली. संघाच्या कार्याची माहिती देणारी 'साहित्य संघाची पन्नास वर्षे' - शं. ना. अंधृटकर, 'एक सांस्कृतिक सरिता', 'दशपदी' 'बखर दशपदी' ही लेखक शि. मो. घैसास यांची पुस्तके संघाने प्रकाशित केली. गेल्या दोन वर्षात,

एका पिढीचे आत्मकथन (२ री आवृत्ती) , दुसऱ्या पिढीचे आत्मकथन, कै. गंगाधर गाडगीळ लिखित 'एका मुंबईकरांची कहाणी आणि काशिनाथ त्र्यंबक तेलंग (अल्पचरित्र) ही पुस्तके प्रकाशित झाली आणि आता 'अमृताचि बोलू कौतुके' हे अमृत व्याख्यानमालेवर आधारित पुस्तक प्रसिद्ध होत आहे. या पुस्तकांच्या संदर्भात प्रा. उषा तांबे, श्रीमती अनुपमा उजगरे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे आणि श्री. अशोक वेंडखळे यांचे महत्त्वाचे सहाकार्य आहे.

मुंबई मराठी साहित्य संघाचे ग्रंथालय हे अत्यंत निटनेटके असे संदर्भ ग्रंथालय आहे. दैनिके - मासिके - साप्ताहिके ही तर ग्रंथालयात असतातच, पण प्रामुख्याने मराठी साहित्याच्या अभ्यासकांसाठी लागणारे अनेक संदर्भ ग्रंथ इथे उपलब्ध आहेत. 'ग्रंथांना गुरु' मानणाऱ्या वाचकांसाठी इथे बसून वाचायला उत्तम अभ्यासिकेची सोय आहे. अनेक महाविद्यालयीन विद्यार्थी आणि साहित्याचे अभ्यासक या ग्रंथालयाचा उपयोग करून घेतात. दरवर्षी या ग्रंथालयासाठी नवीन प्रकाशित होणाऱ्या महत्त्वाच्या ग्रंथांची खरेदी केली जाते. हे ग्रंथ निवडण्याच्या कामात श्री. पद्माकर शिरवाडकर यांची मदत होते. या कै. अ. बा. गजेंद्रगडकर ग्रंथालयाला श्रीमती शरयूताई चंद्रगिरी यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ देणगी दिली, या देणगीतून या ग्रंथालयाला आता अधिक नेटके रूप देता आले आहे.

'मुंबईत येणाऱ्या अमराठी लोकांना मराठी भाषा शिकवली पाहिजे' हा विचार आज समाज मानसात भिनवण्याचा प्रयत्न चालला आहे. पण हे 'आपणा सारिखे करिती तात्काळ' व्रत मुंबई मराठी साहित्य संघाने दूरदर्शीपणाने फार पूर्वीपासून अंगिकारले आहे. साहित्य संघ अमराठी लोकांसाठी मराठी भाषा वर्ग गेली चाळीस वर्षे चालवीत आहे. शेकडो अमराठी अभ्यासकांनी या वर्गाचा फायदा घेतला आहे. सुरुवातीला कै. वा. रा. ढवळे यांनी या उपक्रमाची धुरा सांभाळली, तद्नंतर ती श्री. मल्हार ढगे यांनी खांद्यावर घेतली आणि आता श्रीमती सुहासिनी कीर्तिकर ही जबाबदारी सांभाळत आहेत. गिरगाव, चेंबूर, सायन आणि वांद्रे या केंद्रावरून हे मराठी भाषा शिक्षण दिले जाते. श्रीमती उषा मोघे, श्री सुहास लिमये, श्री जयवंत चुनेकर, श्रीमती सुहासिनी कीर्तिकर या वर्गांना शिकविण्याचे काम निरलसपणे करतात. या अमराठी विद्यार्थ्यांच्या मराठी भाषेच्या वर्गाच्या प्रबोध, परिचय आणि प्रवेश अशा परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांमध्ये चांगला क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना कै. वा. रा. ढवळे स्मृती पारितोषिके दिली जातात.

मुंबई मराठी साहित्य संघाची 'साहित्य शाखा' नेहमीच विविध साहित्यिक कार्यक्रम आयोजित करून या मराठी सारस्वताच्या झाडाला फुलविण्याचा प्रयत्न करते. नवीन प्रकाशित होणाऱ्या बहुचर्चित पुस्तकांवरील चर्चा, तत्कालीन सामाजिक आणि साहित्यिक विषयांवरील परिसंवाद, असे या कार्यक्रमांचे स्वरूप असते. अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचा सत्कार मुंबई मराठी साहित्य संघातर्फे केला जातो. पूर्वी संघाचे अध्यक्ष मा. गंगाधर गाडगीळ यांच्या पुढाकाराने अनेक कार्यक्रम झाले. गेल्या दोन वर्षात संघाचे आताचे अध्यक्ष ज्योतिर्भास्कर जयंत साळगांवकर यांच्या प्रोत्साहनाने झालेली 'अमृत व्याख्यानमाला' आणि त्यातील नामवंतांची श्रवणीय व्याख्याने ही संघाच्या

खास वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांपैकी प्रतिवर्षी साजरा होणारा वर्धापन दिन, प्रकाशन दिन, हे महत्त्वाचे असतात. वर्धापनदिनाच्या दिवशी दिले जाणारे साहित्यिक पुरस्कार, कै. बाबुराव चंद्रगिरी पुरस्कार, बालवाङ्मय पुरस्कार, कै. वि. पु. भागवत पुरस्कार, ढवळे पुरस्कार हे संघाकडून मिळणारे पुरस्कार प्रतिष्ठेचे मानले जातात. पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यासाठी साहित्य शाखेतील सदस्यांच्या विविध समित्या कार्यरत असतात. ज्या व्यक्तिंच्या देणगीतून हे पुरस्कार दिले जातात, त्यांना धन्यवाद देऊन या पुरस्कार विजेत्यांचा यथोचित सन्मान केला जातो.

साहित्य संघाच्या कार्यकारी आणि नियामक मंडळातील साहित्याची आवड असणाऱ्या सदस्यांनी आतापर्यंत साहित्य संघाच्या साहित्य शाखेचे कार्यवाहपद आणि सदस्यत्व सांभाळले आहे. साहित्य संघातर्फे केले जाणारे सर्व साहित्यिक कार्यक्रम आयोजित करणे, पुस्तक प्रकाशन 'साहित्य' त्रैमासिक, साहित्यिक पुरस्कार, मराठी भाषा वर्ग, महानगर महाविद्यालयीन संमेलने आयोजित करणे ही सर्व कामे साहित्य शाखेचे सदस्य आपलेपणाने करत असतात.

कै. वा . रा. ढवळे, कै. भीमराव कुलकर्णी, कै. रवींद्र, पिंगे, कै. पद्मा घारपुरे इत्यादी मान्यवरांनी नावारूपाला आणलेल्या साहित्य शाखेच्या कार्यवाह म्हणून सध्या प्रा. उषा तांबे कार्यरत आहेत. प्रा. सुहासिनी कीर्तिकर, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर, श्रीमती कुंदा पडळकर, श्री. अशोक वेंडखळे, श्री. पद्माकर शिरवाडकर आणि श्री. चंद्रशेखर गोखले हे सदस्य साहित्य शाखेचे सगळे काम जबाबदारीने पार पाडतात. अलिकडे साहित्य संस्कृती मंडळातर्फे निरीक्षक म्हणून श्रीमती अनुपमा उजगरे यांचे नेहमी सहकार्य मिळते. अर्थातच संघाचे अध्यक्ष मा. जयंत साळगांवकर, कार्याध्यक्ष श्री. यशवंत पंडित, प्रमुख कार्यवाह डॉ. बाळ भालेराव, कोषाध्यक्ष श्रीमती आशा मुळगावकर यांचे प्रोत्साहन आणि साहित्य संघाच्या सर्व कर्मचाऱ्यांची मदत असते, म्हणूनच साहित्य संघाची साहित्य शाखा या 'पुष्प मोगरी' मराठीचा सुगंध लोकांपर्यंत पसरवू शकते.

## अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ
-उषा तांबे

स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्रात अनेक मराठी साहित्य संस्था काम करीत आहेत. या संस्थांच्या ध्येय-धोरणांमध्ये सुसूत्रता आणावी, त्यांनी एकमेकांना सहकार्य करावे, यासाठी एक मध्यवर्ती साहित्य संस्था स्थापन करावी आणि त्या संस्थेने सर्व साहित्य संस्थांचे नेतृत्व करावे असा विचार सर्वप्रथम १९५१ साली कारवार येथे भरलेल्या संमेलनात मांडण्यात आला. तो प्रत्यक्षात येण्यासाठी १९६० साल उजाडावे लागले; अनेकांना त्या कल्पनेचा पाठपुरावा करावा लागला आणि 'अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ' या संस्थेची रीतसर स्थापना झाली.

मुंबई मराठी साहित्य संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, विदर्भ साहित्य संघ, नागपूर आणि मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद या महामंडळाच्या चार संस्थापक संस्था असून त्या कायम घटक संस्था मानण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र सोडून इतर कोणत्याही राज्यातील, संपूर्ण प्रदेशाकरिता काम करणाऱ्या नोंदणीकृत साहित्य संस्था, तसेच बाहेरील देशांमध्ये त्या संपूर्ण देशाकरिता काम करणाऱ्या नोंदणीकृत साहित्य संस्था ह्यांना महामंडळात समाविष्ट करून घेता येते. सध्या महामंडळातील समाविष्ट संस्था अशा मराठी साहित्य परिषद (हैद्राबाद), मराठी साहित्य सेवा मंडळ (गोवा), कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद (गुलबर्गा), छत्तीसगड मराठी साहित्य परिषद (बिलासपूर), याशिवाय संपूर्ण राज्याचे प्रतिनिधित्व न करणाऱ्या साहित्य संस्थेला संलग्न संस्था म्हणून मान्यता मिळते. मराठी वाङ्मय परिषद (बडोदे) ही अशी संलग्न संस्था आहे. महामंडळावर घटक संस्थांचे प्रत्येकी तीन प्रतिनिधी, समाविष्ट संस्थांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी आणि सर्व संलग्न संस्थांचे मिळून जास्तीत जास्त तीन प्रतिनिधी सभासद असतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष हे पदसिध्द सदस्य असतात.

महामंडळाचे व्यवस्थापकीय कार्यालय प्रत्येक घटक संस्थेकडे तीन वर्षांच्या मुदतीसाठी असते. पुढील क्रमानुसार ते फिरते -

१. मुंबई मराठी साहित्य, संघ मुंबई
२. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
३. विदर्भ साहित्य संघ, नागपूर
४. मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद


पहिले मराठी साहित्य महामंडळ

धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयाला संपर्कासाठी मुंबई मराठी साहित्य संघाचा कायम पत्ता देण्यात आला आहे.

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या संस्थांच्या धोरणांमध्ये आणि कामामध्ये एकसूत्रीपणा निर्माण करणे, मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी आणि संवर्धनासाठी कार्य करणे ही

महामंडळाची उद्दिष्टे आहेत. त्यानुसार दरवर्षी (शक्यतो) मराठी भाषक जनतेचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करणे, हे महामंडळाचे एक काम आहे. महामंडळाचे वतीने मराठी साहित्य संमेलनाचे प्रथम अधिवेशन हैद्राबाद येथे झाले. या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून साहित्य संघाचे कार्यकर्ते, सुप्रसिद्ध समीक्षक प्रा. वा. ल. कुळकर्णी ह्यांची निवड झाली होती.

महामंडळाच्या कार्यात मुंबई मराठी साहित्य संघाचा सदैव सक्रीय सहभाग राहिलेला आहे. २-१०-१९६१ रोजी महामंडळाची सभा मुंबईत साहित्य संघात झाली. यावेळी म. म. दत्तो वामन पोतदार महामंडळाचे अध्यक्ष होते, श्री. श्री. शं. नवरे खजिनदार, तर श्री. बापूराव नाईक कार्यवाह होते. नंतर महामंडळाच्या घटनेनुसार साहित्य संघाचे प्रतिनिधी म्हणून श्री. शं. नवरे, श्री. वा. रा. ढवळे, व श्री. बापूराव नाईक यांची निवड केली होती. १९८६ साली महामंडळाचे कार्यालय पुन्हा मुंबईकडे आले तेव्हा प्रा. गंगाधर गाडगीळ महामंडळाचे अध्यक्ष, प्रा. भीमराव कुळकर्णी कार्यवाह, आणि डॉ. बाबा कलगुटकर कोषाध्यक्ष होते. प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यावर श्री. पु. भागवत यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी घेतली. कार्यवाह म्हणून श्री. अंधृटकर व कोषाध्यक्ष म्हणून डॉ. कलगुटकर यांनी काम पाहिले. या कालावधीत महामंडळाने १९८६ साली मुंबई येथे,१९८८ साली ठाणे येथे व १९८९ साली अमरावती येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आयोजित केली.

जून १९९८ मध्ये महामंडळाचे कार्यालय पुन्हा मुंबई मराठी साहित्य संघाकडे आले तेव्हा अध्यक्षपदी श्रीमती वसुंधरा पेंडसे-नाईक, कार्यवाहपदी श्रीमती पद्माताई घारपुरे आणि कोषाध्यक्षपदी डॉ. बाबा कलगुटकर यांची नियुक्ती करण्यात आली. १९९९ साली पद्माताई घारपुरे यांनी राजीनामा दिल्याने कार्यवाहपदी प्रा. सुहासिनी कीर्तिकर आल्या आणि डॉ. बाबा कलगुटकर यांनी राजीनामा दिल्यानंतर श्री. निरंजन उजगरे यांची कोषाध्यक्षपदी नियुक्ती झाली. या तीन वर्षांच्या काळात मुंबई, बेळगाव आणि इंदूर येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आयोजित करण्यात आली. १ एप्रिल २०१० पासून महामंडळाचे कार्यालय पुन्हा मुंबई मराठी साहित्य संघाकडे तीन वर्षांसाठी यायचे आहे.

१९९९ साली मुंबई येथील साहित्य संमेलनात महामंडळाच्या कोषाची किंवा संमेलन-निधीची संकल्पना मांडण्यात आली आणि श्रीमती वसुंधरा पेंडसे - नाईक यांच्या अध्यक्षतेखाली महाकोष स्थापन झाला. संमेलने अधिकाधिक भव्य प्रमाणात साजरी होऊ लागली आणि खर्चासाठी निधीचा प्रश्न उपस्थित झाला. शासकीय किंवा अन्य मदत न घेता महामंडळाने स्वतंत्रपणे संमेलन आयोजित करावे, यासाठी हा महाकोष असून तो राष्ट्रीयीकृत बँकेत सुरक्षित ठेव म्हणून जमा करण्यात आला आहे. त्यासाठी एका स्वतंत्र विश्वस्त मंडळाची नेमणूक केलेली आहे. महामंडळाच्या नवीन घटनेनुसार या महामंडळाचा अध्यक्ष या विश्वस्त मंडळाचा पदसिध्द अध्यक्ष असतो. समाजातील सुप्रसिद्ध आणि अर्थव्यवहार जाणणाऱ्या चार व्यक्ती महामंडळातर्फे विश्वस्त मंडळावर घेण्यात येतात. त्यापैकी तीन व्यक्ती मुंबईत स्थायिक असलेल्या असतात. या तिघांपैकी एकाची महामंडळ कार्यकारी विश्वस्तपदी नेमणूक करते. सध्या श्रीमती वसुंधरा पेंडसे नाईक या कार्यकारी विश्वस्त आहेत. इतर विश्वस्तांची नावे अशी- श्री. अप्पा

परचुरे, श्री. प्रकाश पागे, श्रीमती रेखा दिघे, श्री. मधुकरराव मुळे, श्री. नरेंद्र चपळगावकर , श्री. सतीश देसाई आणि श्री. पी. आर. मुंडले. आजवर महाकोषात साधारणपणे ६५ लाख रू. चा निधी गोळा झाला आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करणे हा महामंडळाचा एक हेतू आहे. सुरूवातीला आटोपशीर असलेली ही संमेलने अधिकाधिक व्यापक होत चालली आहेत. कराड, नगर, सोलापूर, नाशिक, सांगली येथील संमेलनांनी तर गर्दीचे उच्चांक गाठले. तीन - चार मांडवांमध्ये तीन दिवस सतत चालणाऱ्या कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला. अशी संमेलने इतर भाषांमध्ये फारशी दिसत नाहीत असे मत अनेक ज्येष्ठ अन्यभाषक साहित्यिकांनी वेळोवेळी व्यक्त केले आहे. संमेलनाला जोडून भरणाऱ्या ग्रंथ प्रदर्शनामध्ये पुस्तकांची विक्रीही प्रचंड प्रमाणात होते. एकूण हा मराठी भाषेचा उत्सव गणेशोत्सवासारखाच भव्य आणि उत्साही होत चालला आहे असे दिसते.

त्याचबरोबर अशा संमेलनांवर दीर्घकाळ टीका होत आली आहे. गेल्या काही वर्षात हे टीकेचे प्रमाण अतिशय वाढले आहे. संमेलनाध्यक्षांची निवडणूक होत असते. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरावे लागतात. सूचक व पाच अनुमोदक असावे लागतात. उमेदवार घटक संस्थापैकी एकचा सदस्य असावा लागतो. लोकशाही प्रक्रियेनुसार हे सर्व आवश्यक असले तरी त्यामुळे अनेक ज्येष्ठ साहित्यिक संमेलनांपासून दूर राहिले आहेत हे ही खरे आहे. निवडणुकीचे मतदार प्रत्येक घटक संस्थेचे १२५ असतात. त्यांची निवड हा लोकांच्या दृष्टीने वादाचा मुद्दा ठरतो. निमंत्रक संस्थेची ६० मते निर्णायक ठरतात. एकूणच ह्या क्षेत्रात उमदेवाराचा प्रचार, आरोप - प्रत्यारोप, निवडणूक लवादाकडे तक्रारी, क्वचित न्यायालयात खटले, असे प्रकार होणे अनेकांना उचित वाटत नाही.

संमेलनाचा वाढता खर्च आणि अतिभव्य स्वरूप ह्यावरही आक्षेप घेतले जातात. प्रचंड मोठे मांडव, सुशोभित व्यासपीठ, ध्वनीव्यवस्था, जेवण्याची सोय हे सर्व महामंडळाच्या आटोक्यावाहेर जात चालले आहे. त्यामुळे निधीची जुळवाजुळव हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरू लागला आहे.

२००९ साली महामंडाने पाहिले विश्व मराठी साहित्य संमेलन सॅन होजे(अमेरिका) येथील बे एरिया महाराष्ट्र मंडळाच्या सहाय्याने आयोजित केले. जागतिक मराठी परिषद अस्तित्वात असतांना अशा विश्व साहित्य संमेलनाची काय आवश्यकता आहे असा प्रश्नही विचारला गेला.

मराठी भाषेचा वार्षिक उत्सव म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे महत्व निश्चितच आहे. परंतु त्यात काही बदल घडवून आणायला हवेत असे मुंबई मराठी साहित्य संघाचे मत आहे. अध्यक्षांची निवडणूक न करता, सर्व साहित्य संस्थांनी एकमताने दरवर्षी एका ज्येष्ठ साहित्यिकाला तो मान द्यावा, संमेलन स्थळाची निवड महामंडळाने करावी, अनावश्यक खर्च आणि भपका टाळावा, कार्यक्रम ठरवण्यात प्रकाशकांचे मत लक्षात घ्यावे, अशा तऱ्हेच्या अनेक सूचना संस्थेने महामंडळाकडे पाठवल्या आहेत. त्यावर योग्य तो निर्णय त्वरित होईल, अशी अपेक्षा आहे.

# मराठीचा सेतू

-मल्हार ढगे

मुंबई मराठी साहित्य संघाच्या स्थापनेमागे डॉ. अ. ना. भालेरावांची अंत:प्रेरणा एवढी ऊर्जस्वल होती की, त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मनात साहित्याबद्दलचे प्रेम आणि संस्थेबद्दलची आस्था यांच्या ज्योती उजळविल्या. डॉक्टरांचे खंबीर नेतृत्व आणि सहकाऱ्यांचे हार्दिक साहाय्य यांच्या बळावर १९३५ साली साहित्य संघाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यानंतर साहित्य संघाची वास्तू निर्माण होईपर्यंत व्याख्याने, व्याख्यानमाला, 'वीणा' मुखपत्र, 'साहित्य' द्वैमासिक, संदर्भ ग्रंथालय, नाट्यप्रयोग, नाट्यशिक्षणाचे वर्ग, बालनाट्य शाखा, वाङ्मयीन परीक्षांचे वर्ग, सचित्र आणि संग्राह्य 'स्मृतिग्रंथ' असे घसघशीत आणि भरीव कार्य साहित्य संघाने केले.

साहित्य संघाची अशी अभिमानास्पद आणि दमदार वाटचाल होत असताना जवळजवळ ३५ वर्षांनंतर साहित्य संघ कार्यात सहभागी होण्याची संधी मला अचानक लाभली. माझ्या मनाची प्रवृत्ती शालेय नाट्यप्रवेश वा महाविद्यालयीन नाट्यप्रयोग यांत भाग घेण्याची असायची. विल्सन हायस्कूल आणि विल्सन कॉलेजमध्ये शिकवणारे सुप्रसिध्द समीक्षक आणि प्राध्यापक वा. ल. कुळकर्णी यांच्या संस्कारांमुळे माझा ओढा स्वाभाविकपणे मराठी भाषा व वाङ्मयाकडे वळलेला होता. त्यामुळे 'मौज' मधल्या प्रा. राम पटवर्धनांकडून साहित्य संघाचा निरोप आल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी साहित्य संघाचे अध्वर्यू बा. रा. ढवळे आणि दि. वि. आमोणकर या दोघांच्या समवेत मला साहित्य संघाच्या मराठी भाषावर्गांचा प्रारंभ करण्यासाठी चेंबूरला जावयाचे होते.

भर पावसात रविवारी सकाळी टॅक्सीमधून मोठ्या उत्साहाने प्रथमच चेंबूरला जात असताना भाऊसाहेब ढवळे आणि तात्यासाहेब आमोणकर (हे तर विल्सन हायस्कूलमधले आमचे अध्यापक) या उभयतांच्या साहित्य संघामधल्या सहप्रवासाची एक हृद्य प्रचीती आली. मोठ्या आत्मीयतेने कार्यरत असताना संस्थेवर आलेले कठिण प्रसंग, कर्जाचा भार, ऋणमुक्ततेने प्राप्त झालेले सुख-समाधान, साहित्य संघाला प्रतिष्ठेकडे नेण्याचे इरादे, भविष्यकाळातल्या अपेक्षा, कार्यकर्त्यांची नवी फळी निर्माण करण्याचे प्रयत्न - या संबंधात चाललेला त्यांचा सुखसंवाद माझ्या कानांवर पडत होता. त्यामुळे साहित्य संघाच्या एकंदर परिस्थितीची मला थोडी फार जाणीव झाली. चेंबूर आल्यावर टॅक्सी थांबली आणि आम्ही जनरल एज्युकेशन ॲकॅडमीच्या आवारात उतरलो.

गिरगावातून थेट चेंबूरला जाण्यामागचे कारण म्हणजे चेंबूर तमिळ संघमच्या कार्याधिकाऱ्यांनी साहित्य संघाला चेंबूर अणि आसपासच्या भागातील दाक्षिणात्य आणि इतरही अमराठी भाषक प्रौढांना मराठी भाषा शिकविण्याची विनवणी केली होती. खुद्द चेंबूरमध्ये किंवा इतरत्र तशी सोय नसल्याने ते मार्ग काढीत मुंबई मराठी साहित्य संघात येऊन ठेपले. संघ मंदिरातल्या ढवळे-आमोणकरांनी त्यांचे आगतस्वागत करून 'आमच्या इथं मराठी साहित्य परीक्षांचे वर्ग चालतात' अशी त्यांना माहिती दिली.

असे असले तरीही त्यांच्या संस्थेच्या सहकार्याने खास अमराठी भाषकांसाठी म्हणून मराठी भाषा वर्ग चेंबूरला येऊन सुरू करण्याचा ठाम मराठी शब्द दिलेला होता.

लोकमान्य पुण्यतिथीच्या १ ऑगस्ट १९७०च्या रविवारी सकाळी झालेल्या समारंभात चेंबूर तमिळ संघमच्या कार्याधिकाऱ्यांनी आमचे प्रेमभराने स्वागत केले. जनरल एज्युकेशन सोसायटीच्या आवारातले सभागृह बरेच गजबजलेले होते. फुलांच्या माळांनी व्यासपीठ सजविलेले होते आणि लाऊड स्पीकरमधून दाक्षिणात्य वाद्यसंगीताची सुरावट ऐकू येत होती. चेंबूर तमिळ संघमने बऱ्याच सुशिक्षित स्त्री-पुरूष प्रौढांची नाव-नोंदणी केली होती. वा. रा. ढवळे यांनी आपल्या इंग्रजी भाषणात प्रारंभी असे सांगून टाकले की, ''मला आपल्याशी अशा भाषेत बोलावं लागतंय की जी भाषा आपलीही नाही की माझीही नाही.'' पुढे त्यांनी अगदी सरळ सोप्या मराठीत मराठी शिकावयास येणाऱ्या प्रौढअमराठी विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत केले. प्रमुख पाहुणे प्रा. अनंत काणेकरांनी भाषाभाषांमधील सौहार्दाचा उल्लेख करून मराठी संस्कृतीशी निगडीत स्त्रियांच्या कपाळावरील कुंकवाचे इंग्रजीत अवतरण करणे महाकर्मकठीण असल्याचे जाता जाता सांगितले. उद्घाटनाच्या त्या समारंभात प्रा. राम पटवर्धनांनी एका फळ्यावर 'श्री' काढून मराठीच्या वर्गाचा श्रीगणेशा केला. राम पटवर्धनांसोबत प्रा. प्रभाकर परांजपे व मी स्वत: हे चेंबूरच्या भरपूर संख्येने आलेल्या अमराठी भाषकांना मराठी शिकवणार होते. अशा प्रकारे भाषावर्गाचे पहिले केंद्र चेंबूरला थाटात सुरू झाले. दाक्षिणात्य प्रथेनुसार उपस्थितांना पेढे वाटण्यात आले.

हे भाषावर्ग आठवड्याला रविवारी दोन तासांसाठी भरत आणि वर्षाकाठी त्यांच्या परीक्षा ठेवल्या जात. माझा इंग्रजी माध्यमातल्या विद्यार्थ्यांना मराठी विषय शिकविण्याचा अनुभव लक्षात घेऊन भाऊसाहेब ढवळ्यांनी माझ्यावर चार परीक्षांचा अभ्यासक्रम आणि वार्षिक पाठ्यक्रम तयार करण्याची कामगिरी सोपवली. 'मराठी भाषा प्रवेश, 'मराठी भाषा परिचय', 'मराठी भाषा प्रबोध' आणि 'मराठी भाषा प्रवीण' असे त्यांचे पारिभाषिक नामकरण करण्यात आले. दुसऱ्या वर्षाच्या नवीन सत्रात आमच्यात सामील झालेले प्रा. रमेश तेंडुलकर यांच्या मदतीने व्याकरणाचे भाषा-व्यवहारोपयोगी पाठ संरचना (स्ट्रक्चर) पध्दतीने तयार करवून त्यांच्या चक्रमुद्रांकित प्रती वर्गात वापरण्यात आल्या. सुरुवातीच्या 'प्रवेश' आणि 'परिचय' च्या परीक्षांसाठी कवी विंदा करंदीकर आणि कवी मंगेश पाडगांवकर यांच्या निवडक बालकविता संकलित करून त्या विद्यार्थ्यांना पद्य-पाठ म्हणून आणि गद्य-पाठ म्हणून आचार्य अत्रे यांचे 'कावळ्यांची शाळा' हे पुस्तक लावण्यात आले. प्रकाशक अप्पा परचुऱ्यांनी आम्ही सुचविल्याप्रमाणे 'कावळ्यांची शाळा'च्या पुनर्मुद्रणात शैक्षणिकदृष्ट्या योग्य असा पाठांचा क्रम लावून तो पुनर्मुद्रित आवृत्तीत छापून दिला. कालांतराने निम्नस्तरीय मराठीसाठी असलेल्या शासकीय पाठ्य-पुस्तकातले गद्य-पद्य पाठ निवडून ते 'प्रबोध' आणि 'प्रवीण' या पुढील परीक्षांसाठी ठेवण्यात आले. प्रौढ अमराठी भाषकांसाठी असलेल्या परीक्षा-पध्दतीमध्ये लेखीप्रमाणे तोंडी परीक्षेचाही अंतर्भाव करण्यात आला होता.

दरेक वर्षी साधारणपणे ऑगस्ट महिन्यात नवीन सत्राचे उद्‌घाटन होत असे. त्याच वेळी मागील सत्रातल्या परीक्षांत उत्तीर्ण झालेल्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्याचा समारंभ होत असे. असे जोड कार्यक्रम ठिकठिकाणच्या केंद्रांत आयोजित करण्यात येऊ लागले. ही मराठी भाषा केंद्रे चेंबूर, शीव, गिरगाव, गोरेगाव, माटुंगा, अंधेरी, वाशी या ठिकाणी भरत. विशेष म्हणजे बहुतेक ठिकाणी परीक्षा संचालक वा. रा. ढवळ्यांची उपस्थिती ठरलेली असे. अशा समारंभामुळे स्नेह-संवर्धनास वाव मिळून विद्यार्थी-अध्यापकांमध्ये एक प्रकारचा भावनिक आणि वैचारिक जवळकीचा संबंध निर्माण होई. साहित्य संघातर्फे वा. रा. ढवळे हे विविध साहित्यिकांना अध्यक्ष अथवा प्रमुख पाहुणे निरनिराळ्या केंद्रातल्या विद्यार्थ्यांच्या भेटीस नेत. प्रा. अनंत काणेकर, प्राचार्य पु. शि. रेगे, प्रा. वा. ल. कुलकर्णी, कवी वसंत बापट, कवी मंगेश पाडगावकर, प्राचार्य रा. भि. जोशी, संस्कृत नाटककार वेलणकर, डॉ. व. दि. कुलकर्णी, 'साधना', साप्ताहिकाचे यदुनाथ थत्ते, कवी नारायण सुर्वे –हे त्यातले काही मान्यवर. अशा समारंभात मराठी शिकणाऱ्यांवर हे साहित्यिक मराठी साहित्याचा सुगंध शिंपडून जाताहेत की काय, असे वाटायचे.

सुप्रसिध्द सुलेखनकार आणि अक्षरमित्र र. कृ. जोशी यांना अमराठी भाषक यशस्वी परीक्षार्थींना देण्यात येणारे प्रमाणपत्र आमच्या संकल्पनेनुसार करून देण्याचे आवाहन केल्यावर थोड्याच अवधीत त्यांनी आमच्या हाती ते सुपूर्द केले. त्याचा आकार दोन्ही हातांत धरता येण्यासारखा, एखाद्या ताम्रपटाप्रमाणे होता. हातबनावटीच्या हळदीसारख्या पिवळ्या रंगातल्या जाडसर आयताकृती कागदावर प्रमुख भारतीय भाषांमधल्या आद्याक्षरांच्या नक्षीची किनार ठेवली होती. डाव्या-उजव्या बाजूंच्या समासांत होती 'श्री' ही मुद्रा व मुंबई मराठी साहित्य संघाचे बोधचिन्ह कुंकवाच्या रंगातले. त्याच्या वर, खालच्या ओळीत होती श्रीज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायामधली १४ वी ओवी : 'माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिकें । परि अमृतातें हीं पैजेंसीं जींके । ऐसी अक्षरें चि रसिकें । मेळवीन ।। — असे हे कलात्मक प्रमाणपत्र. भूर्जपत्राच्या इतक्या मोलाचे आणि त्यातल्या नक्षीदार चौकटीमधल्या काळ्या शाईतल्या ठसठशीत बाळबोध सुलिखित अक्षरांतले ! प्रौढ स्त्री-पुरुष भाषकांनी - विशेषत: तमिळ भाषकांनी आदाराने हातात घेतल्यावर कृतार्थतेची भावना त्यांच्या चेहऱ्यावर झळकून जायची. एका प्रमाणपत्र - प्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या कवी वसंत बापटांनी दोन्ही हातात धरून मोठ्या आदवशीरपणे वाकून ही प्रमाणपत्रे यशस्वी विद्यार्थ्यांच्या हातात ठेवली. इतकेच नाही, तर एक कोरे प्रमाणपत्र त्यांनी स्वत:साठी मुद्दाम ठेवून घेतले.

शिक्षणाच्या द्विध्रुवात्मक प्रक्रियेमध्ये एका बाजूस अध्यापक, तर दुसऱ्या बाजूस विद्यार्थी असतो. विद्यार्थी काय शिकला, हे अध्यापकांनी काय शिकवले यापेक्षा जास्त महत्वाचे. शेवटी 'घोड्याला स्वत:च पाणी प्यायचे असते.' म्हणून विद्यार्थी हाच विद्या संपादन करणारा असतो. अशापैकी बऱ्याच प्रौढ, तरुण विद्यार्थ्यांनी चेंबूरच्या आदरणीय अध्यापक वर्गाला समाधान लाभू दिले होते. परंतु त्यांच्या मधले एकमेवाद्वितीय भाषाभ्यासक प्रौढ विद्यार्थी सुंदररामन राममूर्ती आम्हा सर्वांचे स्नेही बनले होते. विशेष म्हणजे आम्हा सर्व अध्यापकांच्या हाताखालून ते गेले होते. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनमध्ये ते

काम करीत होते आणि पुढे डेप्युटी मॅनेजर पदावरून ते निवृत्त झाले. वर्ग संपल्यावर आमच्याबरोबर ते मित्र म्हणूनच कॉफी घ्यावयास बसायचे. मराठी भाषेचा पध्दतशीर अभ्यास त्यांनी ऑफिसात आणि घरी चालविला होता. मराठीत संभाषण, वृत्तपत्र वाचन, टी.व्ही.तल्या बातम्या ऐकणे आणि मराठी चित्रपट पाहणे असा सराव त्यांनी ठेवल्यामुळे मराठीत त्यांनी खूपच प्रगती केली होती. त्यासंबंधी ते आमच्याशी मराठीत गप्पा मारीत असत. मेहनतपूर्वक मराठीत लिहिताना म्हणी आणि वाक्प्रचारांनी युक्त अशा वाक्यांची खैरात करायचे. एखाद्या दिवशी 'मराठी भाषा प्रवेश'च्या विद्यार्थ्यांसाठी 'च' च्या उच्चाराबाबतीतला फरक दाखवणारी यादी घेऊन येत, तर कधी त्यांच्यासाठी एखादी नमुना प्रश्नपत्रिका तयार करून आणीत, कधी भाषांतरासाठी वाक्ये, कधी मराठी व तमिळमधील समानार्थी म्हणी, तर कधी मराठी निबंध. श्री. राममूर्तींनी जेव्हा मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात झालेल्या ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या वि. स. खांडेकरांच्या जाहीर सत्कार समारंभात मराठीत भाषण केले तेव्हा त्यांनी एका श्रेष्ठ मराठी साहित्यकाराच्या सन्मानार्थ त्याच्याच भाषेतील 'दोन शब्द' मोठ्या आत्मीयतेने वाहिलेले होते. अशा या सुंदररामन राममूर्तींनी अमराठी भाषक प्रौढविद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकवावी म्हणून गळ घातली गेली आणि त्यांना आपल्यात सामावून घेण्याची इच्छा चेंबूर केंद्राच्या अध्यापकांनी प्रदर्शित केली होती. परंतु त्यांनी आपण सदैव मराठीचे विद्यार्थीच राहावयाचे ठरविले होते; म्हणून मराठीचा अध्यापक होणे त्यांनी नम्रपणे नाकारले.

आधुनिक शिक्षण शास्त्रानुसार शिक्षणाच्या प्रक्रियेत समाजालासुध्दा अंतर्भूत केल्यामुळे ते त्रिध्रुवात्मक (ट्रायपोलर) बनले असले तरी ते स्वाभाविक, प्रागतिक आणि पध्दतशीर असणे क्रमप्राप्त आहे. भाषेद्वारा येणारे व्यक्तित्वाचे प्रगटीकरण म्हणजे मनातल्या आशयाचा भाषेच्या माध्यमातून येणारा आविष्कार – अशाच विचार प्रणालीचे उद्दिष्ट मनात ठेवून रमेश तेंडुलकरांनी आपल्या काही ज्ञानोत्साही विद्यार्थ्यांना मराठी भाषेकडून मराठी वाङ्मयाकडे त्यांच्याच इच्छेनुसार स्वाभाविकपणे वळविले. प्रा. रमेश तेंडुलकरांना चेंबूर केंद्राबद्दल सुरूवातीपासूनच आस्था होती. कॉलेजात शिकविण्यासारखा पुढे पुढे चेंबूरच्या भाषावर्गात त्यांना विशेष रस वाटू लागला. तिथले वर्ग ते कटाक्षाने आणि नियमितपणे घेत. पाचसहा अमराठी भाषकांना मराठी भाषेनंतर मराठी वाङ्मयाचा अभ्यास करण्यास तेंडुलकरांनी उद्युक्त केले. नंतर नंतर त्यांनी त्यांतल्या पाचेक विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे पुस्तक अभ्यासण्याचे स्वातंत्र्य देऊन साने गुरूजींचे 'श्यामची आई' अनंत काणेकरांचे लघुनिबंध आणि कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' मधल्या कविता शिकविल्या. या बाबतीत साहित्य संघाने प्रा. रमेश तेंडुलकरांना स्वातंत्र्य देऊन त्यांच्यावर सर्वस्वी शैक्षणिक जबाबदारी सोपवली होती. तेंडुलकरांना आपल्या अमराठी भाषक स्त्री पुरूष विद्यार्थ्यांबद्दल खूप कौतुक वाटायचे. त्यांच्या मराठीवरील प्रेमभावाखातर त्यांनी पु. ल. देशपांडे यांच्या 'तुझे आहे तुजपाशी' नाटकाची एकेक प्रत त्या विद्यार्थ्यांना भेटी दाखल दिली.

प्रा. रमेश तेंडुलकरांनी आणि मी – अशा दोघांनी मिळून जे व्याकरण - पाठ डॉ. व. दि. कुलकर्णी यांच्या प्रारंभीच्या सल्ल्यावरून भाषा -वर्गासाठी तयार केले होते, ते वस्तुत: पुस्तक रूपात काढण्यात

| ★ डॉ. भालेराव कुटुंबीय | साहित्य नाट्य विषयक कार्य करणारी संस्था |
| ★ शैलाताई पेंडसे | समाजवादी विचारवंत |
| ★ कुंदा पडळकर | क्रीडा समीक्षक |
| ★ नीलिमा भावे | वैचारिक लेखन |
| ★ शरयू चंद्रगिरी | विविध साहित्य प्रकार |
| ★ गाडगीळ कुटुंबीय | बालवाङ्मय |

**वरील पारितोषिके रू. १००० पासून रू. १०००० रोख आणि प्रमाणपत्र अशा स्वरुपात दिली जातात.**


नाट्य
शास्त्र

# नाट्यशाखा -
# स्थापना आणि विस्तार

## मुंबई मराठी साहित्य संघ

मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना १९३५ साली झाली असली तरी संस्थेच्या नाट्यविषयक कार्यास सुरवात झाली ती १९३८च्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांतील 'मायाविवाह' या कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या अप्रयोगित नाटकाने. त्यानंतरच्या दोन तीन वर्षांत स्थानिक संमेलने व संघ-दिन यांतून तुरळक नाटके होत होती. १९४१ साली महाराष्ट्र नाट्य संमेलनाचे अध्यक्ष अधिवेशन संघाच्या विद्यमाने आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली भरले, त्यावेळी इब्सेनचे काणेकरकृत भाषांतर 'घरकुल' व श्री. वरेरकरांचे 'उडती पाखरें' ही दोन नाटके श्री. के. नारायण काळे व कै. पार्श्वनाथ आळतेकर यांच्या दिग्दर्शनाखाली प्रयोगित केली होती. याशिवाय श्री. केशवराव दाते यांनी 'कांचनगडची मोहना' व कै. चिंतामणराव कोल्हटकरांनी 'राजसंन्यास' या नाटकांतील प्रवेश करून दाखविले होते. हे नाट्यप्रयोग, तमाशा, मूकनाट्य, इत्यादि कार्यक्रम म्हणजे साहित्य संघाच्या नाट्यविषयक कार्याची नांदीच होय.

या संमेलनांत झालेला तोटा भरून काढण्यासाठी म्हणून 'मराठी नाट्यालयाची' स्थापना १९४२ साली करण्यात आली आणि त्याच्यासाठी 'अरे बावा जाहिरात' हे श्री. रंगुमामा जोगळेकर यांचे सादर केलेले नाटक कै. चिंतामणराव कोल्हटकर यांनी दिग्दर्शित केले होते.

१९४३ साली सांगली येथे मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्यात आला. त्यात साहित्य संघाने 'शारदा' नाटकाची निर्मिती करून प्रत्यक्ष भाग घेतला होता. शिवाय १९४४ साली संघाने स्वतंत्रपणे मरीन ड्राइव्हवर भव्य खुले नाट्यगृह बांधून पंधरा दिवस नाट्योत्सव साजरा केला.

या खुल्या नाट्यगृहांत ५००० प्रेक्षकांची सोय होती. पण सात आठ हजार प्रेक्षक यांत सामावत होते. या उत्सवांत व त्यानंतर केलेल्या पांच वार्षिक नाट्योत्सवांत - हे ही समुद्रकिनारीच केले होते - मराठी रंगभूमीवरील यशस्वी नाटके, संगीत व गद्य प्रयोगित करण्यात आली. त्यांतून गेल्या पंचाहत्तर वर्षांत मराठी रंगभूमी गाजविलेले सर्व नट हजेरी लावून गेले. साहित्यिकांनी भूमिका केलेली नाटकेही गाजली.

जुनी नाटके जुन्या नामांकित नटांकरवी प्रयोगित करून 'साहित्य संघाच्या संकल्पित मंदिरासाठी पैसा उभा करणे' हा प्रधान हेतु या उत्सवामागे होता, तरी नवीन नाटके मुद्दाम लिहून प्रयोगित करण्याची प्रथाही संघाने चालू केली. अशाप्रकारे आजवर सुमारे १५० नवीन नाटके संघाच्या नाट्यशाखेने सादर केली आहेत. संघाची स्वत:ची जागा १९५२ सालच्या डिसेंबरमध्ये ताब्यात घेऊन त्या ठिकाणी तात्पुरते कच्चे नाट्यगृह उभारण्यात आले आणि येथे वर्षातील ७-८ महिने नाटके, व्याख्याने, चर्चा इत्यादि कार्यक्रम करण्याची सोय झाली. नाट्यनिर्मितीकडे व नेपथ्यरचनेकडे विशेष लक्ष देणेही शक्य झाले. भाऊबंदकी, होनाजीबाळा, सुंदर मी होणार, वैजयंती, गड्या अपुला गांव बरा, इ. नाटकांची नेपथ्यरचना विशेष उल्लेखनीय ठरली. राजमुकुट नाटकाची निर्मिती आणि नेपथ्यरचना यांनी संघाच्या नाट्यकार्याचा उच्चांक गाठला.

साहित्य संघाच्या नाट्यशाखेस महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील प्रमुख गावांतून आमंत्रणे येऊ लागली. दिल्लीस तीन वेळां संघाने नाट्यप्रयोग केले. १९५४ साली झालेल्या राष्ट्रीय नाट्यमहोत्सवात साहित्य संघाने सादर केलेल्या 'भाऊबंदकी' या नाटकास पहिला क्रमांक मिळून राष्ट्रपतींच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले आणि संघाच्या १५ वर्षाच्या नाट्यकार्याचे चीज झाले.

संघाची विशेष लोकप्रिय झालेली नाटके म्हणजे भाऊबंदकी, होनाजी बाळा, तुझे आहे तुजपाशी व सुंदर मी होणार! नाट्योत्सवाबाहेरील ज्या नाटकांनी संघाला पैसा मिळवून दिला त्यात वरील नाटके अग्रभागी आहेत.

प्रत्यक्ष नाट्यप्रयोगाशिवाय, नाट्यविषयक व्याख्याने, चर्चा आणि नाट्यशिक्षणाचे वर्ग चालण्यात नाट्यशाखेने पुढाकार घेतलेला आहे आणि सातत्याने मराठी रंगभूमीची सेवा करून संघ मंदिरासाठी निधी जमविण्यात नाट्यशाखा यशस्वी झाली आहे. या गोष्टीस प्रमुखत्वे कै. डॉ. भालेरावांचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि निरलस कामगिरी कारणीभूत तर आहेच, पण मराठी रंगभूमीवरील नव्या जुन्या नट-नटी, नाटककार यांचे सहकार्य आणि नाट्यरसिकांचे प्रेमही आहे. ते नसते तर संघाचे नाट्य कार्य फलद्रूप होऊ शकले नसते.

साहित्य संघाने या वाटचालीत सादर केलल्या काही वैशिष्टयपूर्ण नाटकांचा आढावा-

# संघाची वैशिष्ट्यपूर्ण नाटके

## भाऊबंदकी

भारत शासनाच्या सर्व भाषिक नाट्योत्सवात दिल्ली राजधानीत प्रथम क्रमांकाचा सन्मान











## अजब न्याय वर्तुळाचा

जर्मनीत जाऊन
नाटयप्रयोग सादर केलले
पहिले मराठी नाटक





## होनाजी बाळा

तमाशा प्रधान गायकी
रंगमंचावर सादर करणारे
प्रथम नाटक







## मुद्राराक्षस

जर्मनीत जाऊन तेथे नाट्य प्रयोग केलेले विक्रमी नाटक









## तुझे आहे तुजपाशी

पु. ल. देशपांडे यांचे एक अत्यंत गाजलेले नाटक





## धाडिला राम तिने कां वनी ?

नवविचारांना चालना देणारे
वैशिष्ठ्यपूर्ण नाटक





## मानापमान



## बाजीराव मस्तानी



## मृच्छकटिक

नव्या प्रकारच्या नेपथ्याने
सजविलेले नाटक





## राजमुकुट (मॅकबेथ)

नाटककार शिरवाडकर यांचे वैशिष्ठ्यपूर्ण नाटक
नामवंत कलावंतांसह रंगभूमीवर सादर.
तालमीच्या वेळी दिग्दर्शक हर्बर्ट मार्शल समवेत







## शोभेचा पंखा

एक वेगळया धर्तीचे
नाटक

## अमृत नाटयगाथा

संघाचे संस्थापक आणि मराठी रंगभूमीचे
धन्वंतरी डॉ. अ. ना. भालेराव यांच्या
जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या नाटयकर्तृत्वाचा आलेख दर्शविणारे नाटक



## अमृत नाट्य भारती





## बाल रंगभूमी



## अल्लाउद्दिन आणि जादूचा दिवा

महोत्सवी प्रयोगाच्या वेळी



## वैशिष्ट्यपूर्ण नेपथ्य व रंगमंच

**भरताचा रंगमंच** - भरतनाट्यशास्त्राप्रमाणे तयार केलेला मराठी रंगभूमीवरील पहिला रंगमंच व उत्कृष्ट नेपथ्य







**स्वरनिविष्ट रंगमंच** - मराठी रंगभूमीवरील नवनाट्याचे नेपथ्य दर्शविणारा रंगमंच

**स्लाइडर** - टिळक आणि आगरकर या नाटकाच्या प्रयोगासाठी खास रचना



## दूरचे दिवे

वि. वा. शिरवाडकरांचे
पहिले नाटक
(आयडियल हजबंडचे रुपांतरण)





## आंधळयांची शाळा

रंगभूमीवर नवा बदल आणि
वास्तववाद दर्शविणारे नाटक

## माया विवाह

जुन्या रंगभूमीचे दर्शन
घडविणारे
संगीतप्रधान नाटक





## टिळक आणि आगरकर

महाराष्ट्र राज्य व्यवसायिक नाटयस्पर्धेत
क्रमांकात येणारे आणि व्यक्तिगत
अनेक पारितोषिके मिळविणारे नाटक



## संन्यस्त खडग

स्वा. सावरकर यांच्या
स्मृती-आदरानिमित्त
सादर केलेले नाटक





## गोरा कुंभार

नव्या नटसंचात जुने गाजलेले संगीत नाटक





## साहित्य संघ या संस्थेस ७५ वर्ष होत आहेत त्यानिमित्त पूर्वीच्या आठवणी-

- कुंदा पडळकर, उषा टाकळकर

१९३४ साली भरलेल्या मुंबई साहित्य संमेलनात 'मुंबईत साहित्य विषयक कार्य करणारी एखादी मध्यवर्ती संस्था असावी' या कल्पनेचा जन्म झाला. त्यावेळी भास्करराव जाधव, भा. सी. सुकथनकर, दत्तो अप्पाजी तुळजापूरकर, श्री. म. वर्दे, र. धों. कर्वे, अ. बा. गजेंद्रगडकर, रा. ग. विजयकर, कृ. म. केळुस्कर यांनी सक्रीय सहाय्य करून मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना करण्याचे ठरवले. दुसऱ्याच वर्षी १९३५ साली वि. स. खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली दादर येथे भरलेल्या उपनगर साहित्य संमेलनात त्याची निश्चिती झाली. १९३८ साली बॅ. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेलं 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' 'लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या' या अध्यक्षीय आदेशाने ते संमेलन गाजले.

'मुंबई मराठी साहित्य संघाची धोरणे ठरवितांना उपनगर साहित्य संमेलने भरविणे, साहित्यविषयक प्रासंगिक चर्चा घडवून आणणे, परस्पर साहित्यिकांशी संवाद करणे व मराठी वाङ्मयाकरता कार्य करणे, हे ठरले.

'मुंबई' मराठी साहित्य संघाची स्थापना' ही अनेकांची गरज होती. साहित्यिकविषयक चळवळ आणि नाट्यप्रेमी ची उठवस होण्यासाठी स्वत:चे असे ठिकाण मुंबईतील मराठी समाजाला हवे होते. ह्यासाठीच १९३५ साली (जुलै) डॉ. अ. ना. भालेरावांच्या पुढाकाराने साहित्य संघाची स्थापना झाली. १९३५ पर्यंत व नंतरही सर्व व्यवहार आमच्या घरीच म्हणजे डॉ. भालेरावांच्या 'नारायण मॅन्शन' घरातूनच चालायचा कारण जागेचा प्रश्न होता. ती घ्यायची म्हटलं तर कशी आणि कुठे ? केळेवाडी - गिरगांव, जागेचा प्रस्ताव नंतर पुढे आला तोपर्यंत नाट्यमहोत्सव करून काही रक्कम जमा करण्याचे ठरले. या महोत्सवांची आजही अनेकांना आठवण आहे. कै. विजय तेंडुलकरांनी आपल्या अखेरच्या आठवणीतही ह्याचा उल्लेख केला आहे. 'ते दिवस' (२००९) मध्ये त्यांनी म्हटले आहे की, ''तो काळ मराठी रंगभूमीच्या उताराचा - नाटकांना हक्काचा प्रेक्षक नव्हता - त्याला नवे खेळणे मिळाले होते. सिनेमा! या परिस्थितीत गुण नटांना देशोधडी लागावे लागू नये म्हणून मुंबईच्या मराठी साहित्य संघाचे कर्णधार डॉ. भालेराव यांनी अनेक नवे उपक्रम सुरू केले, त्यात मरीन लाईन्सच्या मैदानात, मराठी नाटकांचा एक वार्षिक उत्सव सुरू केला.''

यामुळे अनेक मान्यवर साहित्यिक उदयास आले. त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळाले. कै. बापूराव नाईक, कै. शं. ना. अंधृटकर, कै. तात्या तथा दि. वि. आमोणकर, कै. वा. रा. ढवळे, कै. चं. वि. बावडेकर, कै. भार्गवराम पांगे, कै. शिवा चिखलीकर आदी कार्यकर्ते कामास लागले. आता खरी गरज होती ती संघ मंदिराच्या वास्तुच्या उभारणीची .

१९४३ साली सांगली येथे 'रंगभूमीचा शंभर वर्षाचा उत्सव साजरा झाला. पण त्यावेळी तो आनंदोत्सव आहे की शंभर वर्षे भरल्याचा काळ आलेला आहे हे कळत नव्हते. बालगंधर्व, दीनानाथ यांच्यासह सर्वच मोठ्या छोट्या नाटक कंपन्यांचा उतरणीचा काळ सुरू झालेला होता. अशा वेळी मुंबईत नाट्यसृष्टीला संजीवनी देण्यासाठी नाट्यमहोत्सवाची तयारी सुरू झाली. या उत्सवात अनेक नामवंत नटमंडळी जुनी गाजलेली नाटके करणारी होती. 'सं. शारदा', 'सं. सौभद्र', 'सं. मानापमान', 'सं. सत्तेचे गुलाम', 'भाऊबंदकी' ह्या नाटकांबरोबरच 'सारस्वत', 'जन्माचे सोबती', 'उद्याचा संसार', सारखी नाटकेही प्रदर्शित झाली. नटवर्य कै. बालगंधर्व नाट्योत्सवाचे अध्यक्ष होते आणि स्वागताध्यक्ष होते आचार्य अत्रे. हिराबाई बडोदेकर, कमलाबाई बडोदेकर, सरस्वती राणे, मास्तर कृष्णा, कृष्णराव चोणकर, राम मराठे, भालचंद्र पेंढारकर, अनंत दामले या नामवंत कलाकारांनी भूमिका केल्या होत्या. सात, आठ हजारांच्या श्रोत्यांच्या समूहाला जुन्या लोकप्रिय नाटकांनी वेड लावले. सं. शारदा नाटकाला तर सर्वोत्तम प्रयोगाचे सुवर्णपदक मिळाले. गणपतराव बोडस, बालगंधर्व, लोंढे, केशवराव दाते वगैरे नटमंडळींनी महोत्सवात रंग भरला, चिंतुबुवा गुरव श्रीमंतांच्या भूमिकेत ७५ वर्षांचे 'तरूण' लग्नाला आतुर झालेले विधुर शोभून दिसले. रंगभूमीवर प्रथमच उभ्या राहिलेल्या 'वासंती' ने शारदा उत्तम रंगविली होती.

त्याचबरोबर संघात उत्तमोत्तम व्याख्यानमाला सुरू होत्या. १९४४ सालापासून कै. वामन मल्हार जोशी स्मारक व्याख्यानमालेत अनेक साहित्यिकांची अभ्यासूपणे व्याख्याने झाली. त्याचे पुस्तकही प्रसिद्ध झाले आहे. साहित्य मासिकही १९३७ पासून सुरू झाले. वा. रा. ढवळे, वा. ल. कुलकर्णी, रा. भि. जोशी, वि. ह. कुळकर्णी, विजयाबाई राजाध्यक्ष, सरोजिनीबाई वैद्य, वगैरे मान्यवर ह्यात साहित्य निर्मिती करत होती. आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, कवी अनिल, कुसुमावती देशपांडे, ग. त्र्यं. माडखोलकर वगैरे मंडळी अतिशय मोलाचे सहाय्य करीत होते. ती परंपरा अजूनही सुरू आहे. प्रा. न. र. फाटक यांची महाभारतावरील व्याख्याने अजूनही रसिकांना आठवत असतील त्यानंतर संघाध्यक्ष गंगाधर गाडगीळांच्या मार्गदर्शनाखाली साहित्य संघ सतत प्रगतीपथावर राहिला. अनेक प्रकाशने प्रसिद्ध झाली. मराठी कविता, तीन खंड, मराठी रंगभूमी - मराठी नाटक - घटना आणि परंपरा, वामन मल्हार आणि विचार सौंदर्य वगैरे अशी मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरणारी प्रकाशने मोलाची ठरली.

१९७५ साली मुंबई मराठी साहित्य संघाने 'एका पिढीचे आत्मकथन' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. मागील पिढीच्या मान्यवर लेखकांचे लेख त्यात प्रसिद्ध झाले आहेत. त्याच धर्तीवर २००८ साली ' दुसऱ्या पिढीचे आत्मकथन' हा ग्रंथ प्रकाशित झाला.त्यात के. ज. पुरोहित गंगाधर गाडगीळ, अर्जुन वाडकर, म. द. हातकंणगलेकर, शिरीष पै, रा़चि ढेरे, वगैरे मान्यवर साहित्यिकांचे आत्मकथन अंतर्भूत आहे. दोन महत्वाची साहित्य संमेलने संघातर्फे भरविण्यात आली. १९८६ साली कै. विश्राम बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेली संमेलने अतिशय गाजली. कै. वि. पु. भागवत पारितोषिक ह्या समितीच्या

वतीने साहित्य संघाने देण्याचे ठरविले. असे अनेक साहित्यिक उपक्रम संघाला सुरु असतात. अनेक साहित्यिक पुरस्कारही दरवर्षी दिले जातात.

अनेक उत्तमोत्तम नाटककार नाट्योत्सवामुळे प्रकाशात आले. कै. वि. वा. शिखाडकर, कै. अनंत काणेकर, कै. वि. ह. कुलकर्णी यांची अनेक नाटके रंगभूमीवर आली. तसेच पु. ल. देशपांडे, आचार्य अत्र्यांची नाटके ही संघाच्या रंगभूमीवर गाजली. अंमलदार, तुझे आहे तुजपाशी, कवडी चुंबक ही नाटके अतिशय गाजली. जयमाला शिलेदार, जयराम शिलेदार, नटवर्य गणपतराव बोडस यांच्या 'सं. शाकुंतल, इ. च्या तालमी आमच्याच घरी होत असत. 'लग्नाची बेडी' या अत्र्यांच्या नाटकातील वनमालाबाईंची भूमिका अतिशय गाजली होती. दुर्गाबाई खोटे, चिंतामणराव कोल्हटकर, के. नारायण काळे, आचार्य अत्रे, दामु अण्णा जोशी, मामा पेंडसे, भालचंद्र पेंढारकर, दामू केंकरे, पु. ल. देशपांडे, आत्माराम भेंडे, ब्रिटनचे हर्बर्ट मार्शल (शेक्सपियरच्या नाटकांसाठी), जर्मनीचे फ्रिट्झ बेनेव्हिट्स ('अजब न्याय वर्तुळाचा' या नाटकाचे दिग्दर्शन) वगैरे दिग्दर्शकांनी नाट्योत्सवांना मोलाचे योगदान दिले.

'अजब न्याय वर्तुळाचा' हे जर्मन नाटककार ब्रेसट आणि भक्ती बर्वे व माधव खाडिलकरांच्या भुमिकांमुळे गाजले. प्रस्तुत नाटकाचे दिग्दर्शन बेनेव्हिटस आणि विजया मेहता ह्यांचे होते. या नाटकाचा जर्मनीतील बर्लिन नाट्यमहोत्सवात निमंत्रण देऊन सादर करण्यात आला. नाटकाचे लेखक चिं. त्र्यं. खानोलकरही तेथे उपस्थित होते. (१९७४) हे नाटक ह्या नाट्योत्सवातील 'outstanding event' ठरले होते. नंतर पूर्व - जर्मनीत इतरत्रही नाटकाचे आणखी काही प्रयोग झाले. द. ग. गोडसे ह्यांच्या नेपथ्याने सजलेली 'मुद्राराक्षस' आणि 'मृच्छकटिक' ही संस्कृत नाटके ह्यांच्या नेपथ्याने सजलेली 'मुद्राराक्षस' आणि 'मुच्छकटिक' ही संस्कृत नाटके त्यांच्या जर्मन रुपांतरात जर्मनीत प्रयोगित झाली. त्याकरिता पूर्वकालीन भारत रंगभूमीवर प्रथमत: मराठी भाषेत प्रयोग करण्याची जर्मन दिग्दर्शकांची विनंती साहित्य संघाने मान्य करून त्यानुसार आयोजन केले. नाटकांचे दिग्दर्शन श्रीमती विजया मेहता यांनी केले. नेपथ्ययोजना संघाचे नेपथ्यकार द. ग. गोडसे यांची तर संगीत, दिग्दर्शक भास्कर चंदावरकर हे होते. जर्मन दिग्दर्शक या प्रयोगांना हजर राहिले होते. त्यांनी एकूण बाजाला पसंती दिली. ह्या नाटकांकरिता दिग्दर्शिका विजयाबाईंनी खूपच मेहेनत घेतली होती. ही कथा नंतरच्या काळातली पण त्याअगोदर 'झुंझारराव', 'तुझे आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार' ह्या साहित्य संघाच्या एकापेक्षा एक सुंदर नाटकातल्या त्यांच्या भूमिका नावाजल्या गेल्या होत्या. त्याखेरीज पु. ल. देशपांडे यांच्या 'सदू आणि दादू', 'सारं कसं शांत शांत', 'मोठे मासे आणि छोटे मासे' ह्या तीन एकांकिकांचे त्यांचे दिग्दर्शन आणि त्यांत त्यांनी साकार केलेल्या भूमिका ह्यामुळे त्या काळात (स. १९७५) विजयाताई रसिकांच्या मनावर ठसल्या होत्या. विजयाबाईंना संघासारख्या प्रतिष्ठित रंगमंचांसाठी दिग्दर्शनाची जी संधी मिळाली तिचे त्यांनी सोनेच केले. या प्रयोगांमुळे 'एकांकिका' ह्या एका नवनाट्यप्रकाराची मुहूर्तमेढ सन्मानपूर्वक रोवली गेली.

द. ग. गोडसे यांचे रंगतदार संगीत नाटक 'धाडिला राम तिने का वनी' आणि चिं. य. मराठे लिखित, बाळासाहेब काळे दिग्दर्शित 'सं. होनाजी बाळा' ही दोन्ही नाटके संघाच्या शिरपेचातले तुरे बनून राहिली. त्याकरिता चिं. य. मराठे, बाळासाहेब काळे आणि भालचंद्र पेंढारकर ह्यांनी अविश्रांत मेहेनत घेतली. रजनी जोशी, आशा खाडिलकर, नारायण बोडस या गायक नटांच्या व त्यांच्या सहकारी नटांच्या जाणकारीने केलेल्या भुमिकांमुळे 'धाडिला राम तिने का वनी' नाटकाचा प्रयोगही खूप देखणा होत असे. 'होनाजी बाळा' या संगीत नाटकांद्वारे खास मराठी पध्दतीचे संगीत नाटक संघाने रंगभूमीवर आणले, एक नवा ढंग सादर करून संगीत नाटकात नाविन्य निर्माण केले. सुरेश हळदणकर, भालचंद्र पेंढारकर, लीला मेहता ह्यांच्या अभिनयाने आणि गाण्यांमुळे ह्या नाटकाला अमाप लोकप्रियता मिळाली.

संघाला मान्यतेच्या शिखरावर नेऊन पोचवणारी संघाची आणखी एक फार मोठी नाट्यकृती म्हणजे कृ. प्र. खाडिलकरांचे सदाबहार नाटक 'भाऊबंदकी'. १९०९ सालापासून गाजत असलेले हे नाटक संघाने प्रथम १९४४ सालच्या शतसांवत्सरिक उत्सवात प्रयोगित केले. १९४८ साली नाट्योत्सवात भाऊबंदकीचा नव्याने बसविलेला प्रयोग केला. त्यात दुर्गाबाई खोटे ह्यांनी आनंदीबाईची भूमिका केली होती. तेव्हापासून सारखे या नाटकाचे प्रयोग होत राहिले. १९५४ साली द्रिष्टी येथे झालेल्या अखिल भारतीय नाट्यस्पर्धेत 'भाऊबंदकी'चा प्रयोग संघाने सादर केला. त्यात राघोबा - नानासाहेब फाटक, रामशास्त्री - मा. दत्taराम, नाना फडणीस - मामा पेंडसे, आनंदीबाई - दुर्गा खोटे असे नाट्यक्षेत्रातले रथी-महारथी होते. त्यांच्याबरोबर नवोदित पण त्याच तोलामोलाने साथ देणारे नाना अभ्यंकर, अनंत वर्तक, दाजी भाटवडेकर, राजा पटवर्धन, शंकर घाणेकर, सुधा आमोणकर, सुमन मराठे इत्यादि अन्य नट होते. निर्मिती डॉ. अ. ना. भालेराव यांची. हा प्रयोग नाटकाच्या सर्वच अंगांनी, दृष्ट लागेल इतका उत्कृष्ट व देखणा झालेला होता. त्यालाच राष्ट्रपती-पारितोषिकाचा सन्मान प्राप्त झाला. या नाटकासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या संघाच्या सर्वच मंडळींचा आणि विशेष करून संघाचे सर्वेसर्वा डॉ. भालेराव यांचा हा फार मोठा सन्मान होता. भारतीय रंगभूमीवर मराठी नाटकाला अढळपदी विराजमान करणारा हा क्षण डॉ. भालेरावांच्या आयुष्यातला सुवर्णक्षणच ठरला.

सुधा करमरकर (आमोणकर) यांनी बाल-रंगभूमीची सुरूवात 'मधुमंजिरी' (१९५८ रत्नाकर मतकरी) व 'जादूचा वेल' (१९५९ सुधा करमरकर) ह्या नाटकांनी संघाच्या रंगमंचावरूनच केली. पुढे या क्षेत्रात सुधाताईंनी खूपच काम केले. संगीतिका, छोट्या नाटिका, छाया-नाट्य असे नव प्रयोगही सुरूवातीच्या काळातच संघाच्या रंगमंचावर झाले. परंपरा आणि नवता ह्या दोनही अंगाचे तिथे स्वागत केले जात होते. दर्जा आणि गुणवत्ता यांना प्राधान्य होते. नाट्यक्षेत्राला सर्वतोपरी साह्य करण्याची वृत्ती त्यामुळे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद या मान्यवर संस्थेला कार्यालयासाठी संघात जागा मिळाली. हे कार्यालय अनेक वर्षे संघाच्या इमारतीतच होते.

संघाच्या नाट्यशाखेची संगीत नाटकांची परंपरा खंडीत न होता आजतागायत चालू राहिली आहे. पुढील काळात रजनी जोशी, अरविंद पिळगांवकर, रामदास कामत ह्यांच्यासारखी गोड गळा, संगीताची उत्तम

जाण असलेली गायकी सोबत दमदार अभिनय या गुणांनी युक्त नटमंडळी संघाला मिळत गेली. संघावरच्या प्रेमाने नाटकांत जीव ओतून ती सादर केली. त्यामुळे 'सौभद्र','स्वयंवर', 'मानापमान', 'होनाजी बाळा' ही एका काळात गाजत असलेली नाटके आपल्या प्रयत्नांनी संघाने आजपर्यंत जिवंत ठेवली आहेत. आजच्या तरूण पिढीतील नीलाक्षी पेंढारकर, ज्ञानेश पेंढारकर व इतरही काही तारे संगीत रंगभूमीवर दाखल होऊन संघाच्या संगीत नाट्यप्रयोगात काम करीत आहेत. विश्राम बेडेकर ह्या सिध्दहस्त लेखकाचे 'टिळक आणि आगरकर' हे नाटक १९८० नंतर संघाकडे आले. नाटकासाठी सर्व कलावंत शक्यतो नवीनच घेतले होते. १ ऑगस्ट १९८२ रोजी टिळक पुण्यतिथीस नाटकाचा प्रयोग संघमंदिरात झाला. एक दर्जेदार कलाकृती म्हणून ह्या नाटकाला मान्यता मिळाली. नाट्यपरिषदेने यावर्षीच सुरू केलेले उत्कृष्ट निर्मितीचे पारितोषिक या नाटकाला मिळाले.

१९८४ साली थोरले बाजीराव पेशवे स्मारक समितीने पुण्यात थोरले बाजीरावांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याचे ठरवले होते. त्या प्रसंगी संघाने 'रविराज तो मी रोहिणी' (बाजीराव-मस्तानी) हे बाजीरावांच्या आयुष्यावरचे नवे नाटक (नाट्यलेखन आणि दिग्दर्शन - पुरूषोत्तम दारव्हेकर) सादर केले. नाटके सादर करणाऱ्या अनेक नाट्यसंस्था असतानाही हा मान साहित्य संघास देण्यात आला, तो संघाचे या क्षेत्रातले भरीव कार्य लक्षात घेऊनच दिला असावा. दाजी भाटवडेकर प्रथमपासूनच संघाच्या नाटकांत अतिशय रस घेऊन काम करायचे. त्यांचा काकाजी अजूनही आठवला जातो.

वैभवाच्या शिखरावर पोचलेल्या नाट्यसृष्टीचा १९३० नंतर पडता काळ सुरू झाला. ह्या क्षेत्रातील कलावंत मंडळींना काही काम उरले नाही. ही स्थिती दूर करण्याचा निश्चय करून, आपल्या निकराच्या प्रयत्नांनी तिच्यात संजीवनी ओतून मरगळलेल्या नाट्यसृष्टीला परत एकदा डॉ. भालेराव यांनी तिचे पूर्व वैभव प्राप्त करून दिले. १९४४ साली संघाने मुंबईत पहिला नाट्यमहोत्सव केला तेव्हापासून १९५९ पर्यंत दरवर्षी संघाचे नाट्योत्सव सातत्याने होत राहिले. त्यांत गतकालीन प्रख्यात नाटककारांच्या गाजलेल्या नाटकांच्या बरोबरीने नवोदित नाटककारांची आशयघन नाटकेही सर्वांगपरिपूर्ण प्रयोगांच्या द्वारे संघाने रंगभूमीवर आणली. संघ मंदिराची वास्तू तयार होऊन १९६४ साली तिचे उद्‌घाटन झाले. डॉ. भालेरावांच्या मोठ्या स्वप्नांची त्यांच्या निष्ठावंत सहकाऱ्यांनी परिपूर्ती केली होती. संघ मंदिराच्या भव्य नाट्यगृहाला डॉ. भालेराव ह्यांचे नाव दिले. ह्या निमित्ते संघाने एक भलामोठा नाट्योत्सव आयोजित केला होता. प्रत्यक्ष नाट्यप्रयोगांशिवाय नाट्यविषयांसंबंधी व्याख्याने, नाट्यशिक्षणवर्ग, नाट्यविषयक चर्चा ही कार्येही संघाच्या नाट्यशाखेने अविरत चालू ठेवली. नवे नट तयार होण्यासाठी नाट्य प्रशिक्षण आवश्यक आहे हे डॉक्टरांच्या केव्हाच लक्षात आलेले होते. त्यानुसार संघ नाट्यशाखेने नाट्यशिक्षण वर्ग चालू केले ते सुरूवातीच्या काळातच. पण, त्यावेळी त्यांना तितकासा प्रतिसाद मिळाला नव्हता. पुढील काळात 'अमृत नाट्य भारती' विभाग सुरू करून हे कार्य दाजी भाटवडेकर, माधव खाडिलकर, वामन केंद्रे इत्यादिकांनी पुढे नेले. दाजी भाटवडेकर यांनी अतिशय परिश्रम घेऊन संगीत नाट्यपरंपरा चालू ठेवली.

*पुढील मजकूर पान ८४ वर...*

पान ८५ वरून...

ही माझी गोड समजूत हादरली ती कॉलेजात असतांना तिथे देखील कॉलेजच्या 'मराठी वाङ्मय मंडळातर्फे रामचंद्र वर्दे, मामा पेंडसे, रमाकांत देशपांडे यांच्या दिग्दर्शनाखाली खडाष्टक, दूरचे दिवे, व इतर अनेक नाटकांत कामं केली. इंटरला असतांना आमच्या इंग्लिशच्या प्रोफेसर मिस जेसावाला यांच्या सांगण्यावरून आम्ही काही मैत्रिणी अल्काझींचं 'वेटींग फॉर गोदो' पहायला गेलो. एका पाच मजली बिल्डिंगच्या गच्चीवर, उघड्यावर हे नाटक व्हायचं. प्रेक्षकांना बसायला बाकडी व सतरंजी व नाटकाचा प्रयोग जमिनीच्या स्तरावरच. रंगमंचावरील पात्रं दिसण्याइतपत व तेव्हढ्याच करता असलेली प्रकाश योजना. पण रंगभूषाविहीन व साध्या नेहेमीच्या वेषातली. नाटकात संगीत नव्हतं. गोष्टीला आरंभ - मध्य - शेवट नव्हता, सीनसीनरी, भरजरी कपडे, बदलणारं नेपथ्य काही काही नव्हतं. एक दमदार संवाद व चक्रावून टाकणारा अभिनय तो प्रयोग पाहून मी पुन्हा एकदा भारावून गेले. पुढचे अनेक दिवस त्या नाटकाशिवाय दुसरा कसलाच विचार नव्हता.

याला 'प्रायोगिक' नाटक म्हणतात तर ! पण हे नाटक पाहून निव्वळ करमणूक झाली नाही. उलट त्रासच झाला. यापूर्वीची पारंपारिक पठडीतील नाटकं पहाताना खूपदा दु:खी प्रसंगांच्या वेळी त्या नायिकेवर कोसळणारी संकटं पाहून डोळ्यांत पाणी यायचं. पण त्यामुळे त्रास होत नसे. उलट त्यामुळे पुढे होणाऱ्या सुखान्ताचा परिणाम अधिक आनंदमय व्हायचा. तसंच, प्रेक्षागृहाबाहेर आल्यावर नाटक छान होतं,' किंवा 'बरं नव्हतं' यावरच नाटकाचा विषय संपायचा. फार तर 'तो/ती काय गायली, वा !'

तर मग हा 'प्रायोगिक' प्रकार म्हणजे काय होतं ? नाटकाचं, किंवा कुठल्याही कलेचं प्रथम प्रयोजन म्हणजे करमणूक करणं हेच ना ? तर मग अल्काझींच्या नाटकात अशी करमणूक नव्हती. उलट आत्मचिंतन करायला लावणारं, अनेक प्रश्न उभं करणारं, त्यांची योग्य उत्तरं माहित नसल्याने बेचैन करणारं आणि म्हणूनच त्यावर सतत मनन, चिंतन, विचार, वादसंवाद करायला लावणारं, बुध्दीला चालना देणारं असं काहीतरी होतं. वाटलं, अशी नाटकं पाहिली पाहिजेत. पण तशी नाटकं कुठेच होत नव्हती. मग काही वर्षांनी 'रंगायन' ने माधव वाटवे दिग्दर्शित 'एक शून्य बाजीराव' चा प्रयोग केला. हे नाटक देखील नेहमीच्या सुसज्ज नाट्यगृहात न होता विल्सन कॉलेजच्या हॉलमध्ये व्हायचं. आनंद याचा झाला की 'रंगायन' तर्फे अशी नाटकं पहाण्याची संधी वरचेवर मिळू लागली.

पुढे सत्यदेव दुबे यांच्या 'थिएटर युनिट' मध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या दिग्दर्शनाखाली मी अनेक नाटकं केली. त्यांच्या तालमीत अभिनय म्हणजे पूर्वी पाहिलेल्या नटांचं अनुकरण किंवा नक्कल नव्हे तर तो एक अतिशय वैयक्तिक अनुभव, आपलं व्यक्तिमत्व विसरून दुसऱ्या व्यक्तिमत्वात प्रवेश करणं असतं आणि ते यशस्वी तऱ्हेने साधण्यासाठी अथक अभिनय साधना करावी लागते हे समजलं. पंडित दुबे हे माझे दुसरे गुरू.

'प्रायोगिक', 'समांतर', 'वास्तववादी', 'न्यू वेव्ह','हौशी' अशी अनेक नावं अशा प्रकारच्या नाटकांना दिली गेली. यातलं कुठलंच नाव माझ्या मते योग्य नाही. पण त्यातल्यात्यात मुख्यधारा व्यावसायिक नाटकांपासून वेगळी म्हणून त्यांना 'समांतर नाटक' म्हणणं योग्य. अरूण नाईक आपल्या एका लेखात म्हणतात - 'प्रायोगिक' म्हणजे काय ? 'हौशी' म्हणजे काय ? 'समांतर' म्हणजे काय ?



पुढील मजकूर पान ८६ वर...

१९४४ ते १९६४ हा संघाच्या नाटकांचा आणि नाट्यशाखेचा कार्यकर्तृत्वाचा सुवर्णकाळच म्हणता येईल. १९६० सालानंतर नाट्यचळवळ फोफावली, वहरत गेली, तिचे क्षेत्रही विस्तारत गेले. संघाच्या भरगच्च कार्यामुळे, जणू योग्य ती दिशा दाखवली गेल्याने पुढील काळात अनेक नाट्यव्यावसायिक, निर्माते पुढे सरसावल्यामुळे मराठी नाटकांनी रंगभूमी गाजवली. साठ नंतरची जवळजवळ २५ वर्षे हा मराठी नाटकांच्या दृष्टीने समृध्दीचा काळ होता. राज्य-नाट्यस्पर्धा, एकांकिका स्पर्धा, प्रायोगिक नाटके, लोकनाट्ये, एकपात्री प्रयोग, पथनाट्ये व इतरही वाटांनी रंगभूमीला अनेक धुमारे फुटत गेले आहेत. आजच्या घडीला दूरदर्शन मालिकांचे फुटलेले पेव, चित्रपटांची रेलचेल अशी घरबसल्या करमणूक सहजोपलब्ध झाल्याने नाटकाचा प्रेक्षक रोडावला आहे. नाटकांची फारशी चलती नाही, पुन्हा नाटकाला वाईट दिवस आले आहेत, अशी ओरड आहे. अशा परिस्थितीतून वाट काढून मार्ग दाखवायला डॉ. भालेरावांसारख्या सर्वांना एकत्र आणून कामाला जुंपणाऱ्या, व्यक्तिमत्वरूपी दीपस्तंभाचीच गरज आहे. कै. बापूंचे नाट्यसृष्टीवरचे हे ऋण कधीच फिटू शकणार नाही एवढे मोठे, अपरिमित आहे.

साहित्य संघाच्या 'साहित्य' आणि 'नाट्य' ह्या दोन्ही शाखा आपापले कार्य उत्तम रीतीने करीत राहिल्या आहेत व आजही संघाच्या पंचाहत्तरीतही करीत आहेत. कारण ह्या एकाच नाण्याच्या दोन तुल्यबळ अशा बाजू आहेत. हे कार्य संघ कार्यकर्त्यांना यशस्वीरित्या पार पाडता आले यामागे डॉ. भालेरावांचा दुर्दम्य आत्मविश्वास, संघटनाकौशल्य, कार्यनिष्ठा, निरलस कामगिरी कारणीभूत झाली आहे. त्याचप्रमाणे मराठी रंगभूमीवरील जुन्या-नव्या नट-नटी, नाटककार, दिग्दर्शक, सहाय्यक, नाट्यविषयक कार्य करणाऱ्या अन्य संस्था ह्यांचे सहकार्य व नाट्यरसिकांचे अतुलनीय प्रेम नसते तर हे कार्य तडीस जातेच ना ! या साहचर्याचा हेतू संघ करीत असलेले नाट्यकार्य हे एकट्या संघाचे नसून मराठी रंगभूमीच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व संस्थांचे आहे, हाच होता.

संदर्भ


१. साहित्य संघ मंदिर उद्‌घाटन समारंभ स्मृतिग्रंथ, संकलक - संपादन समिती, मुंबई १९६४.
२. साहित्य संघाची पन्नास वर्षे : सुवर्णमहोत्सव १९८५-८६, मुंबई १९८५
३. दशपदी : वाटचाल १९८५ ते १९९५, लेखन-संपादन शि. मो. घैसास, मुंबई १९९५
४. साहित्य : नाट्यविषयक विविध लेखांचा संग्रह. मुंबई, एप्रिल १९४७
५. आमचे बापू : डॉ. अ. ना. भालेराव जन्मशताब्दि विशेषांक, नाटक व. ३, अं. १, एप्रिल २००२

## नाटकांविषयी...
- रेखा सबनीस

१९४४ पासून मुंबई मराठी साहित्य संघात दरवर्षी नाट्योत्सव व्हायचा. संघाची इमारत तेव्हा उभी नव्हती. उघड्या पटांगणात उभारलेल्या रंगमंचावर नाटकं केली जायची. मी माझ्या आयुष्यातलं पहिलं नाटक पाहिलं ते तिथे. माझे वडील (डॉ. भालचंद्र सबनीस) मला नाट्योत्सवात झालेल्या मामा वरेरकरांच्या 'कुंजविहारी' या नाटकाला घेऊन गेले. त्यात माझ्याच वयाच्या एका अतिशय चुणचुणीत मुलीने बालकृष्णाची भूमिका इतकी सुंदर प्रकारे सादर केली की मी अवाक् झाले. नाटक हा प्रकार इतका सुंदर, इतका मनोरंजक असतो हे मला तिथे कळलं आणि मी वेडी झाले. बाबांपाशी हट्ट धरून मी त्या, व पुढील अनेक वर्षांच्या नाट्योत्सवाना गेले व अनेक गाजलेली संगीत नाटकं पाहिली. त्यात दाखवलेल्या पुराणातल्या, महाभारत-रामायणातल्या गोष्टी मला आजोबांनी सांगितल्या होत्या. ती सर्व माणसं व प्रसंग जिवंत झालेली पहाताना मला आजूबाजूच्या साऱ्या जगाचा विसर पडायचा आणि मी विस्फारलेल्या डोळ्यांनी व तोंडाने ती नाटकं पहायचे.

पुढे अनेक प्रकारची त्या काळातली नाटकं मी पाहिली. रांगणेकर व वरेरकरांची सामाजिक, विद्याधर गोखलेंची पौराणिक, कानेटकरांची ऐतिहासिक, अत्रेंची विनोदी वगैरे. बहुधा सर्व संगीत नाटकंच असायची म्हणून जेव्हा 'तुझे आहे तुजपाशी' मी पाहिलं, तेव्हा संगीताशिवाय नाटक असू शकत हे पाहून मला आश्चर्य वाटलं. असंही नाटक असू शकतं तर !

जेव्हा १९६० मध्ये ब्राह्मण सभेचे प्रभाकरपंत (अण्णा) जोशी यांनी सभेच्या संस्कृत नाटकांत काम करण्याविषयी विचारलं, तेव्हा मी आनंदाने होकार दिला. धरून आजीचा याला तीव्र विरोध होता, पण आजोबांच्या (सॉलिसिटर शां. आ. सबनीस) संस्कृत प्रेमापोटी मला त्यांची पूर्ण परवानगी मिळाली व मी कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रम' या नाटकात मालविकेची भूमिका केली. त्यानंतर अनेक संस्कृत नाटकांत मी कामं केली व दिग्दर्शित देखील केली ही सर्व नाटकं मराठी संगीत नाटकांच्याच पठडीतली होती. संस्कृत नाटकांत मला दाजी भटवडेकरांकडून अभिनयाचे धडे मिळाले. ते माझे पहिले गुरू.

अभिनय करणं किती सोपं असतं,असं पाहिलेल्या नाटकांवरून तेव्हा वाटायचं. नायिकेची भूमिका म्हणजे नाजूक, लाडिक बोलायचं, वागायचं, रडणं, घाबरणं, रूसणं वगैरे सर्व भाव असे दाखवायचे की त्यामुळे चेहरा वाकडातिकडा होऊ नये. खलनायिकेने कर्कश्य आवाजात, डोळे लहान - मोठे करत व छद्मी स्मित करत बोलायचं. म्हाताऱ्या पात्राने (म्हणजे पन्नाशी पुढल्या) आवाज व मान कापवत, कमरेत वाकून चालायचं- बोलायचं, वगैरे. म्हणजेच आतापर्यंत नाटक - सिनेमात पाहिलेल्या पात्रांच ठोकळेबाज अनुकरण करायचं. पाठांतर चोख असलं म्हणजे झालं आणि हे सर्व दिग्दर्शकांने घोटून घेतल्याप्रमाणे केलं म्हणजे भरपूर कौतुक होत. लोक आपल्याला अभिनेत्री म्हणून ओळखू लागतात. गर्दीत आपल्याकडे बोट दाखवून 'ती पहा....' म्हणतात. मज्जाच मज्जा !

*पुढील मजकूर पान ८३ वर...*

याची उत्तरं या शब्दांच्या व्याख्येत शोधण्यापेक्षा ती विरोधी शब्दांत शोधल्यास सहज सापडतील. 'हौशी' चा अर्थ जे व्यावसायिक नाही ते. 'समांतर' चा अर्थ जे मुख्यधारा नाही ते आणि 'प्रायोगिक' जे पूर्णपणे प्रचलित नाही ते. 'प्रयोग' चा इंग्रजी अर्थ experiment असा घेतला पाहिजे. हे experiments नाटकाच्या प्रत्येक घटकात - लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश, वेषभूषा, रंगभूषा, संगीत, अभिनय, नृत्य इत्यादी होऊ शकतात.

'घाशीराम कोतवाल' हे याचं सर्वात चांगलं उदाहरण होऊ शकतं कारण तेंडुलकरांनी वेगळा विषय हाताळला. एवढंच नाही तर मराठी नाटकाला अपरिचित असा total theatre चा आणि लोककलांचा उपयोग केलेला बाज यातून प्रगट केला.

कलात्मक वस्तू आणि विकाऊ वस्तू यात जो फरक असतो, तोच समांतर आणि व्यावसायिक नाटकांत आहे. आंतरिक उर्मी पोटी जे निर्माण होतं त्याला आपण कलात्मक म्हणतो, तर अर्थार्जन इच्छेपोटी ग्राहकाची मर्जी पाहून केलं जातं ते विकाऊ. समांतर नाटकात जे प्रयोग केले जातात ते प्रेक्षकांची आवड-निवड पूर्ण करण्याकरता नसून लेखकाला काहीतरी वेगळं सांगायचं असतं, दिग्दर्शकाला वेगळं दाखवायचं असतं, नटांना नेहेमीच्या रूढपात्रांपेक्षा वेगळ्याच्या व्यक्ती व प्रसंग व त्यासाठी वेगळ्या प्रकारच्या अभिनय करण्याची संधी मिळते, म्हणून बहुधा ही नाटकं वास्तववादी असतात व त्यांचं नेपथ्यही सांकेतिक (symbolic) असतं. त्यामुळे त्यात फारसं मनोरंजन - म्हणजे भव्य नेपथ्य, भरजरी, उंची वेषभूषा, संगीत, ट्रिक सीन्स् वगैरे नसतं. त्यामुळे या सर्वांची अपेक्षा करणाऱ्या प्रेक्षकाला ती रटाळ वाटतात. कधी माहितीतलाच पौराणिक किंवा ऐतिहासिक प्रसंग घेऊन त्याची वेगळी, आजच्या कलानुरूप अभिव्यक्ती केली जाते, ज्याला बहुतेक परंपरावादी लोकांचा आक्षेप असतो. तर कधी ही नाटकं रंगमंचाशिवायच उघड्या चौकात किंवा गच्चीवर केली जातात, तर कधी प्रेक्षकांतलं व रंगभूमीमधलं अंतर तोडून ही नाटकं थेट प्रेक्षागृहात उतरतात किंवा आपल्या दैनंदिन जीवनातल्या अपवादात्मक प्रसंगांवर किंवा माणसांवर संहिता लिहिली गेली असते - जसं 'सखाराम बाइंडर' किंवा 'गिधाडे'. कधी एखादा विषय घेऊन त्याच्या दोन किंवा अधिक बाजू दाखवल्या जातात. अशा अनेक प्रकारच्या सादरीकरणाचे प्रयत्न असतात. हा प्रयत्न जर प्रेक्षकांना भिडला, आवडला, तर त्यांचं मनोजरंजनही होतं, पण केवळ मनोरंजन आणि बोध एवढाच या नाटकांचा उद्देश नसतो. अतिशयोक्ती असलीच तर ती abstration किंवा symbolism ची असू शकते, आणि तीही आवश्यक म्हणूनच वापरली जाते. आंगिक, वाचिक व भावनिक अतिशयोक्ती नसते.

समांतर रंगभूमीवर धडपडणाऱ्या माणसांचा दृष्टीकोन नाटकाकडे एक गंभीर कलाप्रकार म्हणून पहाण्याचा असतो. पैशासाठी किंवा प्रसिध्दीसाठी हा उपद्व्याप कोणी करत नाही. उलट बहुतेक वेळा आपला पोटा पाण्याचा व्यवसाय संभाळून, वेळात वेळ काढून, घरच्या माणसांचा रोष पत्करून, रात्र रात्र तालमी करून व प्रसंगी स्वत:च्या खिशाला कात्री लावून ही मंडळी समांतर रंगभूमीवर काम करत असतात. अर्थात आपल्याला जे पटतं, जे भावतं, ते करत असताना जर आर्थिक फायदा व प्रसिद्धी

मिळाली तर ती त्यांना नको असते असं नाही, कारण त्यामुळे त्यांना हेच कार्य पुढे चालू ठेवण्यात मदत होते.

आधुनिक चित्रकलेला रंगाचे अर्थहीन फराटे म्हणणारे परंपरावादी, आणि याउलट शास्त्रीय संगीताला कर्णकर्कश, अर्थहीन रेकणे म्हणणारे व फक्त फिल्मी संगीतात रमणारे श्रोते, यांच्याप्रमाणे व्यावसायिक व समांतर नाटकांचे चाहते देखील कधीकधी टोकाची भूमिका घेतात. पण व्यावसायिक रंगभूमीवर सुध्दा उत्तम नाट्यकृती सादर झाल्या आहेत, तसंच समांतर रंगभूमीवर वाईट नाटकं केली गेली आहेत. अभिनयाचा, रंगभूमीचा अभ्यास व व्यासंग असलेला चोखंदळ प्रेक्षकच दोन्हीतलं चांगलं व वाईट निवडू शकतो.

१९५० पासून मुंबई - पुण्यातली खूपशी नाटकवेडी तरूण मंडळी आपापल्या परीने वेगवेगळे नाट्यप्रयोग करण्याचा प्रयोग करत होती. १९६२ च्या सुमारास साहित्य संघाने 'अमृत नाट्य भारतीची' स्थापना केली व कमलाकर सोनटक्के संचालित शास्त्रोक्त नाट्यशिक्षणाचे अभ्यासक्रम सुरु केले. त्यानंतर काही वर्ष माधव खाडिलकर यांनी हे वर्ग चालवले. यातून नाट्यप्रशिक्षण घेतलेल्या कित्येक मंडळींनी आपापले संच गोळा करून समांतर नाट्यनिर्मितीचे प्रयत्न केले. पण त्याकाळी त्यांना परवडणारा कुठलाच रंगमंच उपलब्ध नव्हता. याच सुमारास रमेश चौधरींनी साहित्य संघातच गुरुवार योजना सुरू केली, ज्यायोगे समांतर नाट्यसंस्थांना दर गुरूवारी संघाचा रंगमंच आपल्या नाट्यकृती सादर करण्यासाठी मिळू लागला. पण महिन्यातून केवळ चार प्रयोग करून ही चळवळ जोर धरेल असं वाटत नव्हतं. एकूण २०-३० संस्था मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक येथे कार्यरत आहेत हे पाहून काही मंडळी - यात अच्युत वझे, राजीव नाईक, अरूण व मीना नाईक, जयराम हर्डीकर, मी व इतर काही जण साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाला भेटलो व या आमच्या समांतर नाट्य चळवळीसाठी सक्रीय मदत करावी व संस्थांना नाट्यनिर्मितीसाठी व सादरीकरणासाठी एक कायम स्वरूपाचा रंगमंच उपलब्ध करून द्यावा अशी विनंती केली. पण तेव्हाच्या कार्यकारी मंडळाने त्यात फारसा रस दाखवला नाही. तेव्हा जर संघाने आम्हाला ही संधी दिली असली, तर कदाचित पुढे आविष्कारने सुरू केलेल्या 'छबिलदास' उपक्रमांचं स्वरूप तेव्हाच संघाला मिळालं असतं आणि तरूण, सळसळत्या रक्ताच्या रंगकर्मीच्या नवनवीन निर्मितींना एक मोलाचं ठिकाण मिळालं असतं, जे कदाचित अजूनही कार्यरत असतं.

जेव्हा आविष्कारने १९७० च्या सुमारास अगदी अल्प दरात छबिलदास शाळेचा हॉल या चळवळीकरता उपलब्ध करून दिला, तेव्हा मुंबईतल्याच जवळ जवळ तीस संस्था पुढे आल्या. यात अच्युत वझेची 'उन्मेष', रमेश चौधरींची 'उदय कला केंद्र', डॉ. श्रीराम लागूंची 'रूपवेध', माझी 'अभिव्यक्ती' अमोल /चित्रा पालेकरची 'अनिकेत', सत्यदेव दुबेची 'थिएटर युनिट', आणि अर्थात अरविंद / सुलभा / काकडे यांची आविष्कार व विनय आपटे, रत्नाकर-प्रतिभा मतकरी यांच्या व इतर अनेक संस्था महिन्याचे तीसच्या तीस दिवस आपापली नाटकं सादर करू लागल्या. प्रेक्षक वर्गही तयार झाला. 'छबिलदास' हे सर्व तरूण उत्साही रंगकर्मींचं भेटण्याचं ठिकाण होतं. नवनवीन नाट्यप्रयोग, विचारांची देवाण घेवाण, तरूण रक्ताचा सतत वावर, याने छबिलदासचे वातावरण नेहमी भारून गेल्यासारखं

असायचं. सर्व संस्थांत एकजूट होती. एकमेकांचे नट, प्रकाश नियोजक, ध्वनि संयोजक, नेपथ्यकार, एकमेकांना दिले जायचे. एका संस्थेचा दिग्दर्शक दुसऱ्या संस्थेसाठी नाटक बसवायचा, नवीन नाटकांच्या शोधात एकमेकांना मदत केली जायची, नाट्य वाचनाला सर्वांना आमंत्रण असायचे, असे चळवळीच्या दृष्टीने अतिशय उत्साहवर्धक वातावरण तयार झाले. या काळात कितीतरी समांतर नाटकं लिहिली गेली व गाजली.

जवळजवळ २० वर्षे छबिलदासचा हॉल आम्हाला मिळाला. त्यानंतर शाळेने जेव्हा तो लग्नसमारंभ वगैरेसाठी आविष्कारकडून काढून घेतला, तेव्हा अनाथ झालेल्या बहुतेक संस्था हळूहळू नाहीशा झाल्या.

या चळवळीने व्यावसायिक नाट्यसृष्टीला अनेक उत्तम नट दिले. विजया मेहता, दामू केंकरे, अरविंद - सुलभा देशपांडे, डॉ. श्रीराम लागू, सतीष दुभाषी, माधव वाटवे वगैरे व त्यानंतरच्या पिढीचे भक्ती बर्वे, सुधीर जोशी, वंदना गुप्ते, सुहास जोशी, दिलीप कोल्हटकर, विक्रम गोखले, सुरेश भागवत, दिलीप प्रभावळकर, विनय आपटे, लालन-कमलाकर सारंग, डॉ. हेमू अधिकारी, विहंग नायक, नाना पाटेकर, नीना कुलकर्णी, रोहिणी हट्टंगडी व इतर कितीतरी ज्यांच्या नावाची यादी करायची म्हटलं तर हा लेख पुरा पडायचा नाही. म्हणजेच ३० वर्षांपूर्वीच्या व त्यानंतर आजपर्यंतच्या व्यावसायिक रंगभूमीवरचे रंगभूमीविषयक प्रशिक्षण घेऊन उभे राहिले होते. व्यावसायिक रंगभूमी मुख्यधारा रंगभूमी आहे. प्रायोगिक समांतर रंगभूमीला नाक मुरडण्यातच ते धन्यता मानतात. पण व्यावसायिक रंगभूमीचा पाया समांतर रंगभूमीवरच आधारलेला आहे हे त्यांनी विसरू नये.

या संदर्भात अरूण नाईक म्हणतात - मुख्यधारेच्या मंडळींनी नाकाने कांदे न सोलता, आपण ज्यांच्या खांद्यांवर उभे आहोत ते स्मरावं, आणि 'प्रायोगिक' मंडळींचा बहुमान करावा. 'प्रायोगिकता' जोपासणं ह्यातच 'मुख्यधारेचं' हित आहे हे त्यांनी जाणावं. आपला आजचा माल चांगला खपतो आहे म्हणून कोणताही कारखाना आपली अडगळीच्या खोलीतली छोटीशी प्रयोगशाळा बंद करून टाकत नाही. कारखानदार पैसा मिळताच चांगला rescrab आणि development workshop उभारतो. थॉमस एडिसनने निर्माण केलेली उपकरणं अमेरिकेत जोरात खपू लागली आणि त्याने त्याचा कारखाना मोठा केला. पण तो स्वत: मात्र त्याच्या प्रयोग - कार्यशाळेतच बसत असे. त्याला 'प्रायोगिकतेचं' महत्व कळलं होतं.

आज टेलिविजनमुळे एकूणच नाट्यसृष्टीला वाईट दिवस आले आहेत. पण चक्रनेमिक्रमानुसार लवकरच प्रेक्षकवर्ग परत जिवंत नाट्यककलेकडे वळेल अशी खात्री वाटते आणि प्रायोगिक / समांतर संस्थाच रंगभूमीचा आणि पर्यायाने व्यावसायिक रंगभूमीचा उध्दार आणि पुनरुज्जीवन करू शकतील, नाट्यप्रेमी मंडळींनी व प्रेक्षकांनी त्यांना सर्व प्रकारची मदत व उत्तेजन देणं आवश्यक आहे.

# मुंबई मराठी साहित्य संघ - नाट्यशाखेच्या स्त्री कलावंत
- रजनी जोशी

एखाद्या संस्थेचा अमृत महोत्सव साजरा होणे ही सामान्य घटना नाही. डॉ. अमृत नारायण भालेराव यांनी लावलेला साहित्य संघाचा हा वेलू गगनावेरी गेला आहे. डॉक्टरांच्या दूरदृष्टीने, संगठन चातुर्यामुळे, आर्थिक नियोजनामुळे साहित्य व नाट्य या दोन्ही पथावरची संघाची वाटचाल लक्षणीय आहे.

ज्या काळात कुलीन घराण्यातील स्त्रिया रंगमंचावर काम करण्यासाठी कचरत असत, त्या काळात डॉक्टरांनी आपल्या नेतृत्वगुण व आदबशीर वागणुकीमुळे स्त्रियांना धीर देऊन रंगमंचावर उभे राहण्याची स्फूर्ती दिली. दुर्गाबाई खोटे, वनमालाबाई, मीनाक्षीबाई, शांता आपटे, जयमालाबाई, विमल कर्नाटकी या सर्वांनी डॉक्टरांच्या आग्रहाखातर रंगमंचावर पदार्पण करून संघाचा रंगमंच उजळून काढला. दुर्गाबाई खोटे व नानासाहेब फाटक यांना घेऊन भाऊबंदकी नाटक निर्माण केले व संघाचा झेंडा अटकेपार फडकविला.

त्यानंतरच्या पिढीतील विजया मेहता, भक्ती बर्वे, सुधा करमरकर, ललिता केंकरे, मनोरमा वागळे, प्रफुल्ला डहाणूकर, चारूशीला भाटवडेकर, मंगला पर्वते, मंदाकिनी भडभडे, मालती पेंढारकर या सर्वांनी संघावरील प्रेमाने व आपल्या अभिनय गुणांच्या प्रदर्शनाने संघाच्या नाट्य विभागाला एका विशिष्ट उंचीवर नेवून ठेवले.

संघाच्या यानंतरच्या पिढीतील निर्मला गोगटे, रजनी जोशी, सुहासिनी मुळगांवकर, कान्होपात्रा, कीर्ती शिलेदार, सुमती टिकेकर, मधुवंती दांडेकर, नयना आपटे, आशा खाडिलकर, योजना भाट्ये वगैरे सर्वांनी साहित्य संघाच्या नाट्यविषयक कार्यक्रमांना भरघोस यश मिळवून दिले.

साहित्य संघाच्या ज्या तिसऱ्या पिढीने हे शिवधनुष्य समर्थपणे उचलण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे त्या कलावतींमध्ये नीलाक्षी पेंढारकर, मेधा गोगटे, सुवर्णा कागल, अपर्णा अपराजित यांची नावे विसरून चालणार नाही. आत्तापर्यंतच्या सर्व नायिकांना दुय्यम भूमिकेने साथ देणाऱ्या दुर्गा शिंदे, सुमित्रा किर्लोस्कर, सुनिता धोंड, गीता सोमण, माणिक बोडस, संध्या म्हात्रे यांचेही स्थान कमी नाही.

साहित्य संघाच्या नाटकांमधून काम करीत असताना संघ कार्यकर्त्यांकडून अतिशय प्रेमाची वागणूक मिळत असे व घरगुती वातावरणामुळे नि :संकोच वावरता येत असे हे सर्वांचेच मत आहे. आम्हा स्त्री कलाकारांच्या सोयी-सवलतींकडे संघाचे कार्यकर्ते जातीने लक्ष देत असत. त्यातही श्री भार्गवराम पांगे, तात्यासाहेब आमोणकर, श्री शिवा चिखलीकर, श्री त्रिंबक गोखले यांचा आधार वाटत असे. रात्री बेरात्री प्रयोग संपल्यावर किंवा दौऱ्यावरून परत आल्यावर आम्हाला काळजीपूर्वक घरी पोहोचविले जात असे.

डॉ. अ. ना. भालेराव, तात्या आमोणकर, श्री पांगे, दाजी भाटवडेकर या सर्व आदरणीय व्यक्तिमत्वांचा सर्वांना दरारा होता. त्यानंतर आलेले संघाचे कार्यवाह म्हणजे डॉ. बाळ भालेराव. डॉ. बाळ भालेराव म्हणजे मेडिसिनच्या जगतातला एक चमत्कार म्हणावा लागेल. आपल्या वडिलांच्या तालमीत तयार झाल्यामुळे डॉक्टरांना नाटकांबद्दल प्रचंड आत्मियता आहे. संघाच्या रंगमंचावर नवीन व धाडसी प्रयोग करण्याचा त्यांनी सपाटा चालविला. नाट्य वर्तुळात साहित्य संघ व डॉ. बाळ भालेराव हे समीकरण आदरास पात्र आहे. संघाने आपली परंपरा टिकवली आहे.

महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा असलेले संगीत नाटक जिद्दीने जपले जात आहे. संघाच्या जगन्नाथाचा हा रथ ७५ वर्षे निर्वेधपणे व यशस्वीपणे वाटचाल करून या टप्प्यावर पोहोचला आहे. यापुढे १००व्या वर्षाकडे जाण्यासाठी संघ सज्ज आहे. त्यांच्या पुढील वाटचालीत त्यांना अमाप कीर्ती व उदंड प्रतिसाद मिळो हीच सर्व स्त्री कलावंतांची इच्छा नटेश्वर चरणी व्यक्त करीत आहे.

## मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ. अ. ना. भालेराव आणि बापूराव नाईक ह्यांचं मुंबईमधल्या नाट्य चळवळींना आणि मराठी रंगभूमीवरच्या प्रायोगिकतेला दिलेलं योगदान

-श्री. अरूण नाईक

यंदा मुंबई मराठी साहित्य संघाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. कोणत्याही शहराच्या इतिहासात ७५ वर्षे म्हणजे काही लहान कालखंड नव्हे. कित्येकदा ज्या कारणांकरिता एखादी संस्था जन्माला येते ते कारण कालांतराने नाहीसे होते. मग ती संस्था सांस्कृतिक असो वा सामाजिक. स्थापनेच्या वेळची सांस्कृतिक किंवा सामाजिक परिस्थिती पुढे-पुढे उरत नाही. शैक्षणिक किंवा आर्थिक संस्था शतकं पुरी करतात. त्यांचा विस्तारच होत असतो. त्या फोफावतात. अनेक शाळा-कॉलेज स्थापली जातात. बँकांच्या शाखा वाढतच जातात. पण भाषाविषयक संस्था मात्र बऱ्याचदा आपली गरज, उपयुक्तता आणि रेलेवन्स गमावून बसतात. साहित्य संघाच्या बाबतीत तसं काही प्रमाणात झालंही. पण तरीही आज साहित्य संघ तग धरून आहे. कदाचित त्याचा देदिप्यमान कालखंड आज ओसरला असेल पण संस्था आजही आपल्या स्वत:च्या इमारतीत काम करत आहे, अस्तित्व टिकवून आहे. ती अशी जागती ठेवण्याकरिता बरेच कार्यकर्ते कारणीभूत आहेत.

डॉ. अमृत नारायण भालेरावांना साहित्याची नितांत आवड असल्यामुळे त्यांनी काही समविचारी मित्रांच्या मदतीने १९३५ मध्ये मुंबई मराठी साहित्य संघ स्थापन केला. त्या आधी ते 'अरविंद' नावाचं एक मराठी साहित्य मासिक काढत असत. साधारण १९३५ पासूनच डॉक्टरांना काही उत्तम कार्यकर्ते सहकारी म्हणून मिळाले. त्यात चं. वि. बावडेकर, तात्या आमोणकर, वा. रा. ढवळे, बापूराव नाईक ह्यांच्याबरोबर मुळात नाशिकचे शं. ना. अंधृटकर आणि बाळासाहेब काळे हे होते. इतर विद्वान साहित्यिक बरोबर होते. न. र. फाटक, वा. ल. कुलकर्णी, अ. बा. गजेंद्रगडकर तसेच, अनंत काणेकर, आचार्य अत्रे असे मान्यवर साहित्यिक ही होते. ह्या सर्वांच्या सहकार्याने डॉक्टरांनी निष्ठेने, शिस्तपूर्णपणे, जोमाने साहित्य संघ चालवला.

सुरवातीच्या काळात वार्षिक साहित्य संमेलने भरवणे, ती इतरत्र भरली तर त्यात मोठ्या प्रमाणात प्रतिनिधींसह सामील होणे, मुंबई महानगरात साहित्य विषयक कार्यक्रम आयोजित करणे, 'साहित्य' नावाचं नियतकालिक चालवणे, व्याख्यानांचं आयोजन करणे, अशा प्रकारचे कार्यक्रम राबवले.

१८४३ मध्ये विष्णुदास भावे ह्यांनी सांगलीमध्ये 'सीता स्वयंवर'चा प्रयोग केला. श्री. ना. बनहट्टी आणि बापूराव नाईक ह्यांनी ह्या प्रयोगाला आधुनिक मराठी व्यावसायिक रंगभूमीची सुरूवात मानली. त्या प्रकारे प्रचार केला. विरोधाला उत्तर दिलं. साहित्य संघाच्या पदरच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या पुढाकारामुळे १९४३ मध्ये सांगलीमध्ये मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक महोत्सव साजरा करण्यात आला. डॉक्टर भालेरावांनी १९४४ मध्ये असाच महोत्सव मुंबईमध्ये घडवून आणला आणि तो त्यांच्या

हयातभर दरवर्षी जोमाने साजरा केला. ह्या नाट्यमहोत्सवामुळेच, चित्रपटांमुळे लयाला गेलेल्या मराठी रंगभूमीचं पुनरूज्जीवन झालं असं आज इतिहास मान्य करतो. ह्या महोत्सवांतून जुनी मराठी गद्य आणि संगीत नाटकं जुना-नवा असा संमिश्र नटसंच घेऊन पुन्हा करण्यात आली. बोडस-बालगंधर्वांपासून अनेक दिग्गज ह्यात सामिल झाले होते.

माझे वडील श्री. बापूराव नाईक १९३६ मध्ये मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याकरिता वेंगुर्ल्याहून मुंबईला आले. तेव्हा त्यांची सख्खी मोठी बहीण माटुंग्याला आणि मोठी आतेबहीण गावदेवीला रहात असे. मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर माझे वडील पुन्हा वेंगुर्ल्याला गेले नाहीत. माझ्या आजोबांची आर्थिक परिस्थिती बरी नव्हती आणि त्यामुळे माझ्या वडिलांना कॉलेजचं शिक्षण घेणं काही शक्य नव्हतं. त्यांनी नोकरी पत्करली ती सरकारी मुद्रणालयात. ह्याला कारण दोन. एकतर तिथे पाच वर्षांची उमेदवारी (apprenticeship) पगार देऊन करता येत होती आणि आधुनिक मुद्रणतंत्राचं शिक्षण देखील घेता येत होतं. दुसरं कारण हे त्यांना वाटलं मी मुद्रणालयात नोकरी केली तर खूप वाचायला मिळेल. साहित्य संघ गिरगावांत होता. शासकीय मुद्रणालयातून पाच-दहा मिनिटात तिथे पोचता येत होतं. माझे वडील असेच चालत चालत साहित्य संघात पोचले आणि ते तिथलेच होऊन गेले. इतके की डॉक्टर भालेरावांनी त्यांना त्यांच्या घरीच ठेवून घेतलं. १९५६ मध्ये डॉक्टर गेले. मध्यंतरीच्या काळात ते आणि माझे वडील इतके एकरूप झाले की त्याचं वर्णनच करता येणार नाही.

त्या काळात मराठी रंगभूमीची काय परिस्थिती होती ते जाणून घ्यायच्या आधी मुंबईमधल्या काही नाट्य चळवळींचा थोडा विचार करणं उपयुक्त ठरेल.

महाराष्ट्रात जरी लोकनाट्यप्रकार ऐतिहासिक काळापासून प्रचलित होते, तरी १८४३ मध्ये सांगली मधे विष्णुदास भावे ह्यांनी 'सीता स्वयंवर' ह्या नाटकाचा प्रयोग केला आणि ते मराठी मधलं पहिलं नाटक असं आपण मानतो. ह्या नाटकाच्या प्रयोगाला १९४३ मध्ये १०० वर्षे पूरी झाली. त्यानिमित्त सांगली मध्ये मराठी नाटकाचा शतसांवत्सरिक उत्सव भव्य पध्दतीने करण्यात आला, ते आपण पाहिलंच.

भाव्यांचं 'सीता स्वयंवर' हे खरं पहिलं मराठी नाटक आहे ह्या संशोधकांच्या आणि विद्वानांच्या म्हणण्याला इतर काहींचा विरोध होता. तमाशा, त्यातील वग, दशावतार इ. कथन करणाऱ्या प्रयोगित लोककला प्रकार प्रचलित होते. मग असा नवीन उगम कसा ? असा सवाल अनेकांनी केला आणि वादंग माजलं. पुढे संशोधन केल्यावर असंही लक्षात आसं की, तंजावुरच्या सरफोजी राणे भोसले ह्यांच्या दरबारी मराठी नाटकं केली जात आणि ती लिखित स्वरुपात आता उपलब्ध आहेत. हा वाद १९४३च्या सांगलीच्या शतसांवत्सरिक उत्सवानंतर निर्माण झाला. डॉ. अ. ना. भालेराव ह्यांनी ह्या वादाचा फायदा घेतला.

हा वाद राहू दे. पण त्यातून जे निर्माण झालं ते महत्वाचं. डॉ. भालेरावांनी १९४४ मध्ये मराठी नाटकांचा एक भव्य उत्सव घडवून आणला. मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना झालेली असली तरी त्यांच्याकडे रंगमंच नव्हता. तेंव्हा केवडी सी फेस वर, जिथे इस्लाम, हिंदू, पारसी जिमखाने आहेत तिथे एक भव्य रंगमंच उभारण्यात आला. प्रेक्षकांना बसण्याची जागा खुली होती. हजारो प्रेक्षक बसू शकत. बरीच

नाटकं करण्यात आली. अर्थात प्रत्येक नाटकाचा एकच प्रयोग करण्यात आला.

मराठी रंगभूमीला १०० वर्षे होऊन गेलेली असली तरी त्यावेळेला तिची परिस्थिती फारच गंभीर स्वरुपाची होती. डॉ. भालेरावांनी नव्या-जुन्या कलाकारांना एकत्र आणलं. त्यात बालगंधर्व होते. त्यांनी ह्या उत्सवात पुरुष भूमिकाच केल्या.

एक काळ गाजलेली अशी समृध्द संगीत रंगभूमी आणि त्याचबरोबर नवीन नाटकं. त्यात शिरवाडकर, काणेकर, कुलकर्णी इ. सर्व लेखक, प्राध्यापक मंडळींकडून इंग्रजी नाटकं रुपांतरित करून घेतली. मराठी रंगभूमीचं पुनरुज्जीवन झालं आणि म्हणून तर डॉ. अमृत नारायण भालेराव यांना आज आपण मराठी रंगभूमीचे धन्वंतरी मानतो.

मुंबईमध्ये मराठी रंगभूमी विषयक अशा किती चळवळी झाल्या ? वास्तविक विष्णुदास भावे ह्यांनी जे 'सीतास्वयंवर' नाटक केलं ते जरी त्यांनी सांगली मध्ये लिहिलं, बसवलं आणि त्याचा पहिला प्रयोग तिथल्या राजवाड्यात सांगलीच्या महाराजांसाठी केला, तरी त्याची सर्व प्रेरणा त्यांनी मुंबईत पाहिलेल्या, कामानिमित्त येऊन राहिलेल्या, इंग्रजी लोकांनी केलेल्या इंग्रजी नाटकावरूनच घेतली. मुळात ही जी इंग्रजी नाटकं मुंबईत केली गेली तीच मुंबईची पहिली नाट्य चळवळ मानली पाहिजे. इंग्रजांची ही नाटकं बघून इथल्या पारसी लोकांनी उर्दूमध्ये नाटकं केली. ह्याला मुंबईची पारसी-उर्दू रंगभूमी म्हणतात. 'सोहराब मोदी' हे ह्या चळवळीतलं शेवटचं मोठं नाव.

बालगंधर्व, केशवराव भोसले, मा. दीनानाथ, बापूराव पेंढारकर ह्यांची संगीत नाटकं आणि गणपतराव जोशी, नानासाहेब फाटक ह्यांची गद्य नाटकं ही प्रामुख्याने मुंबईतच केली गेली, आणि जी वस्ती बकाल असून तिथे मोठ्या प्रमाणात वेश्याव्यवसाय चालतो अशा फॉरस रोड, कॉक्लंड रोड, कामाठीपुरा ह्या भागात ह्या नाटकांची बरीच नाट्यगृहं होती. त्यात 'पिला हाऊस', 'बालीवाला', अशी नावं आजही आपल्याला माहीत आहेत. ह्या मुळच्या नाट्यगृहात पुढे फालतू हिंदी चित्रपट दाखवले जाऊ लागले आणि आजही दाखवले जातात. ऑपेरा हाऊस मध्ये अर्थातच मुळात ऑपेरा होत असत. पण मग तिथे नाटकं होऊ लागली. पृथ्विराज कपूर ह्यांची बहुतेक नाटकं इथे झाली. बालगंधर्वांचीही झाली. आज त्याची काय परिस्थिती आहे ते आपण पाहतोच.

१९४४-४५च्याच सुमारास मुंबईमध्ये IPTA(Indian Peoples Theatre Academy) ही साम्यवादींची आणि INT (Indian National Theatre) ही समाजवाद्यांची, अशा दोन नाट्य संस्था निघाल्या. IPTA ने हिंदी नाटकंच केली, तर INTA ने गुजराती आणि मराठी नाटकं केली आणि आजही ह्या संस्था कार्यरत आहेत.

१९५०च्या नंतर 'भारतीय विद्या भवन मध्ये गिरीश जोशी ह्यांनी दामू केंकरे ह्यांना हाताशी घेऊन महाविद्यालयीन नाट्य स्पर्धा तर चालू केल्याच, पण त्यातून आलेल्या नवीन आणि होतकरू कलाकारांना तिथे वाव दिला. ह्यात अरविंद देशपांडे, विजय तेंडुलकर, विजया मेहता होते. पुढे विजया मेहता ह्यांनी अरविंद देशपांडे, माधव वाटवे वगैरें बरोबर 'रंगायन' ही संस्था काढली आणि ती १९६० ते

१९७० ह्या दशकात यशस्वीरित्या चालवली. पुढे ह्या संस्थेतून बाहेर पडून अरविंद देशपांडे आणि सुलभा देशपांडे ह्यांनी 'अविष्कार' ही संस्था काढली आणि आजपर्यंत ती कार्यरत आहे. ह्या सर्व चळवळीतून प्रेरणा घेऊन श्रीराम आणि दीपा लागू, अमोल पालेकर, हेमू अधिकारी, रत्नाकर मतकरी, कमलाकर नाडकर्णी, रेखा सबनीस, अच्युत वझे ह्या मंडळींनी 'छबिलदास चळवळ' केली, ती अरविंद देशपांडे ह्यांच्या प्रेरणेमुळे.

१९८५ नंतर आंतरनाट्य संस्था निघाली आणि अरुण-मीना–राजीव नाईक, विजय केंकरे, संजय मोने, अतुल परचुरे, अजित भुरे, धनंजय गोरे, रेणुका शहाणे, माधवी कामत, अशा दुसऱ्या पिढीच्या नवोदितांना सतत १० वर्षे कार्यरत ठेवली. ह्या सर्व नाट्य चळवळी मुंबईमध्येच सुरू झाल्या, रुजल्या, वाढल्या आणि काळानुसार त्यांचा अंतही झाला. पण नाट्यकार्य मात्र इथे चालू आहेच आणि ते चालूच राहिल.

डॉ. अ. ना. भालेरावांच्या प्रेरणेने वार्षिक नाट्यमहोत्सव केवडी सी फेसच्या भव्य मैदानावर खुला रंगमंडप बांधून केले जात. ह्या महोत्सवांची व्यवस्था बघणाऱ्यांत माझे वडील होते. रंगमंच उभारणे आणि प्रेक्षागार लावणे अशी कामं करत असतानाच माझ्या वडिलांना नाट्यगृह स्थापत्याचा अभ्यास करण्याची स्फूर्ती मिळाली. ह्याच सुमारास केशवराव दाते ह्यांनी कोणत्यातरी व्यासपीठावरुन 'आम्हाला (नटांना) उभं रहायला जागा द्या' असा धावा केला, जणू टाहोच फोडला. त्याचा परिणाम डॉक्टरांवर झाला आणि माझ्या वडिलांवरही. डॉक्टरांनी आमोणकर, बावडेकर, कलगुटकर, भाटवडेकर, अंधृटकर, पांगे, चिखलीकर ह्यांच्या मदतीने केळेवाडीत नाट्यगृहासाठी जागा विकत घेतली. माझे वडील त्यांचं मुद्रणशिक्षण पूर्ण झाल्यावर मुंबई किंवा पुणे इथे आळीपाळीने नोकरीसाठी असत. १९५१ ते १९५३ मध्ये ते अडीच वर्ष लंडनला उच्च शिक्षणासाठी गेले.

डॉक्टरांना केळेवाडीत चांगलं आधुनिक नाट्यगृह बांधायचं होतं. तिथे त्यांनी एक खुलं नाट्यगृह आधीच बांधलं होतं. ते त्यांच्या हयातीतच मराठी रंगभूमीचं माहेरघर असं मानण्यात येऊ लागलं होतं. ह्या ठिकाणी कायमस्वरूपी, बंदिस्त नाट्यगृह बांधण्यात बऱ्याच अडचणी येणार होत्या. जागा फारच लहान होती. त्यात १००० प्रेक्षक बसतील असं प्रेक्षागृह, शिवाय साहित्य विषयक कार्यक्रमांसाठी जागा, वाचनालय, कचेऱ्या हे सगळं सामावून घेऊन वर रंगमंचाबाबत मात्र कोणतीही तडजोड करायची नाही, असं डॉक्टरांचं मत होतं. शेक्सपिअरच्या मॅकबेथचं शिरवाडकरांनी केलेलं 'राजमुकुट' हे रूपांतर साहित्य संघाने सादर केलं. ते इंग्रज दिग्दर्शक हरबर्ट मार्शल ह्याने बसवलं. त्याला दुर्गाबाई खोटे ह्यांनी सहाय्य केलं, त्या लेडी मॅक्बेथ आणि नानासाहेब फाटक मॅकबेथ. ह्या नाटकात तीन डाकिणींचे चार प्रवेश आहेत. एका प्रवेशात कढईमध्ये त्या प्राण्यांचे अवयव टाकून रटारटा शिजवतात. कढई किंवा खुद्द त्याही जमिनीतून प्रविष्ट होतात आणि अदृश्य होतात असा परिणाम अभिप्रेत आहे. अशा प्रकारच्या शेक्सपिअरिअन नाटकांसाठी रंगमंचाखाली जाण्यासाठी देखावे आवश्यक असतात. अशा नेपथ्य सुविधांनी सज्ज अशा प्रकारचा रंगमंच डॉक्टरांच्या मनात होता. माझे वडील अडीच वर्ष मुद्रणाचा अभ्यास करण्याकरता लंडनला होते. त्या काळात त्यांनी डॉक्टरांच्या सांगण्यावरून तिथल्या नाट्यगृहांचा आणि रंगमंचांचा सखोल अभ्यास केला. अत्याधुनिक दृश्यरेखा

प्रकाशयोजना आणि ध्वनीयोजना कशा करता येतील, त्याकरता कोणती सामग्री लागेल ह्या सर्व बाबींची चर्चा डॉक्टर आणि माझे वडिल पत्रांद्वारे करत. ही सर्व पत्रे आज N.C.P.A. मध्ये जतन केली गेली आहेत. त्यातली काही  निवडक पत्रे प्रकाशितही करण्यात आली आहेत. ह. मो. मराठे ह्यांनी संपादित केलेल्या 'विश्रब्ध शारदा' ह्या पत्र-संग्रहात आणि साहित्य संघाने वेळोवेळी प्रकाशित केलेल्या ग्रंथांत ह्यातली निवडक पत्रं, इंग्रजीतली मराठीत भाषांतरित करून, प्रसिध्द करण्यात आली आहेत. N.C.P.A. च्या संग्रही ही बहुमोल पत्रं जतन केली जावीत म्हणून श्री. पु. ल. देशपांडे ह्यांनी पुढाकार घेतला.

१९५६ मध्ये डॉक्टर अकाली गेले. त्यांना हृदयविकार होता. त्यांचं केळेवाडीत नाट्यगृह बांधण्याचं स्वप्न अर्धच राहिलं. तेव्हा आम्ही पुण्याला होतो. पुढच्या वर्षी आम्ही बडोद्याला आणि त्याच्या पुढच्या वर्षी नागपूरला गेलो. १९५७ मध्ये माझ्या वडिलांची पुन्हा मुंबईला बदली झाली. पुन्हा एकदा त्यांचं कार्यालय साहित्य संघापासून पाच मिनिटांच्या अंतरावर ! रोज संध्याकाळी ते केळेवाडीत संघाच्या कार्यालयात हजर होत. त्या काळात न. र. फाटक हे संघाचे अध्यक्ष होते. वा. रा. ढवळे कार्याध्यक्ष होते आणि चं. वि. बावडेकर आणि तात्या आमोणकर संयुक्त कार्यवाह. ह्या दोघांनी कामकाज विभागून घेतलं होतं. साहित्यविषयक कार्य बावडेकरांकडे, तर नाट्यविषयक कार्य आमोणकरांकडे.

वास्तविक माझ्या बालपणी लंडनला जाण्याआधी आम्ही गिरगावातच करेलवाडीत रहात असू. डॉक्टर संध्याकाळी पाचच्या सुमारास चालत चालत त्यांच्या घरून संघात येत. ते बऱ्याच वेळा करेलवाडीत येऊन खालूनच मला हाक मारीत. आई मला कपडे वगैरे घालून तयार ठेवत असे. मग मी खाली येऊन आजोबांबरोबर संघात जात असे. ते अर्थात मला उचलू घेत. तेंव्हा मी दोन-तीन वर्षांचा होतो. पुढे माझे वडील लंडनला गेल्यावर मी आणि आई आजोबांकडेच राहिलो. आम्ही नंतर लंडनला गेलो. आल्यावर पुन्हा आम्ही करेलवाडीत रहात असू. तेंव्हाचे आजोबा मला आठवतात. आता मात्र ते मला उचलून घेत नसत. कारण मी आता जड झालो होतो.

नागपूरहून आल्यावर मी साहित्य संघात जाऊ लागलो. ती नऊ-दहा वर्षांचा होतो. १९५७-५८ ह्या काळात आम्ही डॉक्टर भालेरावांच्या गिरगावातल्या 'नारायण सदन' मधल्या घरातच राहत असू. तेव्हा अक्का म्हणजे मालती ह्या डॉक्टरांच्या मोठ्या मुलीचं नुकतचं लग्न होऊन ती इंदोरला गेली होती. घरी आजी, बाळदादा आणि कुंदाताई, डॉक्टरांची बहीण आत्ती असत. आम्ही तिथेच एक वर्ष राहिलो. पुढे सहा महिने जोगेश्वरीला आणि १९६० पासून हाजी अलीच्या सरकारी वसाहतीत राहिलो.

माझे वडील आता पूर्णवेळ मुंबईत आल्यामुळे त्यांनी साहित्य संघाचं नाट्यगृह बांधण्याचा प्रस्ताव मांडला आणि त्या कामात पुढाकार घेतला. लंडनमध्ये केलेला नाट्यगृह स्थापत्याचा अभ्यास गाठीशी असल्यामुळे त्यांनी नवीन नाट्यगृहाचा कच्चा आराखडा तयार केला. ह्याच आराखड्यावर आधारित पण दिशा पूर्णपणे बदलून, स्थापत्य विशारदांनी (ग. ल. कुलकर्णी) पक्का आराखडा तयार केला. त्याचप्रमाणे आजचं साहित्य संघ मंदिर आणि त्यातील डॉ. भालेराव नाट्यगृह उभं आहे. १९६० पासून १९६४ मध्ये डॉ. भालेराव नाट्यगृहाचं भव्य उद्घाटन होईपर्यंत माझे वडील साहित्य संघाचे इमारत-

शाखेचे कार्यवाह होते. पुढे ते साहित्य संघाचे कोषाध्यक्ष आणि कार्याध्यक्ष झाले आणि ह्या पदावर ते बराच काळ म्हणजे १९८५ मध्ये त्यांचं निधन होईपर्यंत राहिले.

१९६४ मध्ये संघ मंदिराचं भव्य उद्घाटन झालं आणि त्याला लागून दोन नाट्य महोत्सव करण्यात आले. तेव्हा पु. ल. देशपांडे ह्यांची 'तुझे आहे तुजपाशी' आणि 'सुंदर मी होणार' ही नाटकं जोरात चालू होती. ह्या दोन नाटकांनी संघाला चांगला पैसा मिळवून दिला. तो इमारतीच्या उभारणीला कामी आला. साधारण १९७० पर्यंत साहित्य संघाच्या नाट्यशाखेने बरीच नाटकं केली आणि मराठी रंगभूमीवरची एक अग्रेसर संस्था अशी साहित्य संघाच्या नाट्यशाखेची ख्याती झाली. सुधा करमरकर, अरविंद देशपांडे, विजया मेहता, दामू केंकरे आणि त्याचबरोबर आधीचे के. नारायण काळे, केशवराव दाते असे दिग्दर्शक आणि पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर, विजय तेंडुलकर, चि. त्र्यं. खानोलकर, वि. द. घाटे, व्यंकटेश माडगुळकर असे नाटककार त्या काळात साहित्य संघाला लाभले.

ह्याच काळात मी (वय वर्ष १८-१९) साहित्य संघात नियमितपणे जाऊ लागलो. न. र. फाटक अध्यक्ष होते. ते दरवर्षी व्याख्यानमाला गुंफत. त्यात गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, हरी नारायण आपटे अशा विषयांवर व्याख्यानमाला असत. शिवाय इतर बरेच नावाजलेले वक्ते व्याख्यान देत. दरवर्षी संघ दिनानिमित्त महनीय प्रवक्ते असत. त्यात साहित्यिक, राजकारणी, सेनानी, शास्त्रज्ञ, तत्ववेत्ते असत. बॅ. नाथ पै ह्यांना मी इथेच प्रथम पाहिले.

मला नाटकात जरी रस अधिक असला तरी मराठी साहित्याची ओळख आणि संस्कार माझ्यावर साहित्य संघातच झाले.१९६७च्या सुमाराला कमलाकर सोनटक्के यांच्या संचालकपदाखाली 'अमृत नाट्य भारती'ची स्थापना झाली. मी जरी ह्याचा सहभागी-विद्यार्थी नसलो तरी मी तिथे हजर असे आणि त्या कामात, प्रदर्शन, प्रयोग ह्यात सहभागी होत असे. १९७० च्या सुमाराला मात्र हे कार्य बंद पडलं. तसं पाहता साहित्य संघातलं नाट्यविषयक कार्य १९७२-७३ नंतर हळूहळू कमी होत गेलं. त्याला कारणं बरीच आहेत. मराठी माणूस गिरगाव सोडून गेला, व्यवसायिक निर्मात्यांनी परिस्थिती बदलून टाकली. आमची माणसं नवीन प्रयोग करायला तयार होईनाशी झाली, प्रायोगिक मंडळी इतरत्र कार्यरत झाली. पण नाट्य व्यवसायात साहित्य संघाचं स्थान मागे पडू लागलं, हे मात्र खरं.

१९७५ मध्ये माझी वडील निमसरकारी अशा पाठ्यपुस्तक मंडळाच्या नियंत्रकपदावरून निवत्त झाले आणि त्यांचे साहित्य संघात जाणेसुध्दा कमी होऊ लागलं. १९८० मध्ये न. र. फाटक गेले. कालांतराने इतर सहकारीसुध्दा एकेक करून गेले. तात्या आमोणकर, चं. वि. बावडेकर, भार्गवराम पांगे, शिवा चिखलीकर, वा. रा. ढवळे हे सर्व माझ्या वडिलांचे सहकारी होते. त्यामुळे पुढे-पुढे माझ्या वडिलांचा साहित्य संघातला रस कमी होत गेला असावा. ते ३१ डिसेंबर १९८५ रोजी गेले आणि आमचा साहित्य संघाशी असलेला रक्ताचा दुवा तुटला.

१९८४-८५च्या सुमारास काही नाट्यवेडी मंडळी एकत्र आली. ती सर्व तरूण होती. ती वास्तविक नाट्यकर्मींची दुसरी पिढी होती. त्यांनी १० वर्षांत १५ नाटकं केली. शेक्सपिअरपासून शूद्रकापर्यंत अगदी आधुनिक नाटकं केली. ह्या संस्थेचं नाव होतं 'आंतरनाट्य'. वास्तविक हे नाट्यकार्य साहित्य

संघात व्हायला पाहिजे होतं, पण तसं झालं नाही. ह्यांच्या काही गाजलेल्या नाटकांचे प्रयोग मात्र साहित्य संघात ठेवले गेले. त्या करिता साहित्य संघातील प्रमुख कार्यकर्त्यांनी मदतच केली. तालमींना फुकट जागा, प्रयोगांना फुकट रंगमंच, कधी तलवारी आणि इतर साहित्य दिलं, पण खालच्या माणसांना मात्र मस्ती आलेली होती. ते उर्मटपणा करत आणि म्हणून 'आंतरनाट्य'ची ही चळवळ साहित्य संघात झाली नाही हे दुर्दैव!

माझ्या वडिलांच्या शेवटच्या दिवसात मात्र कधी कधी अशी वेळ येत असे की आम्ही सर्व पुन्हा कार्यरत होत असू. न. र. फाटक गेल्यावर प्रभाकर पाध्ये साहित्य संघाचे अध्यक्ष झाले. डॉ. रा. भा. पाटणकर, मे. पुं. रेगे, अशोक रानडे ह्यांच्याबरोबर साहित्य संघातली दुसरी पिढी कार्यरत होऊन तिने सौंदर्यशास्त्रावर तीन दिवस परिसंवाद आयोजित केला गेला. ह्यात माझा भाऊ डॉ. राजीव नाईक, वा. रा. ढवळे ह्यांचा मुलगा विलास आणि वसुधा आंबिये हे प्रामुख्याने होते. ह्या परिसंवादावर आधारित ग्रंथ नंतर ह्यांच्याच संपादनाखाली प्रसिध्द करण्यात आला. तो गाजला. सरोजिनी वैद्य ह्यांनी पुढाकार घेतल्यामुळे साहित्य शाखेचं कार्य पुन्हा वाढलं. साहित्य संघात साहित्यिकांचा राबता वाढला. मी सुध्दा त्यात सहभागी होऊ लागलो. ह्याच सुमासार वा. रा. ढवळे ह्यांनी साहित्य संघाची प्रकाशनं काढायला सुरवात केली. 'साहित्य' पुन्हा निघू लागलं. त्याचे संपादक होते उमाकांत ठोंबरे आणि मी ते छापत असे.

पण साहित्य संघात नाट्यकार्य कां झालं नाही?

वास्तविक साहित्य संघाकडे एक चांगलं नाट्यगृह होतं. नाट्यशाखा होती. सुसज्ज कपडेपट होता. नेपथ्याच्या सोयी आणि साहित्य होतं. मध्यंतरीच्या काळात प्रोजेक्टर लावण्यात आला. इथे एक चांगल्यापैकी नाट्यशिक्षणाची सोय करता आली असती. मुंबईमध्ये मराठीच्या बरोबर गुजराती, हिंदी आणि इंग्रजी रंगभूमीही आहे. ह्या सर्व भाषांमधले काम करणारी आणि सतत काही ना काही नवीन प्रयोग करणारी मंडळी आहेत. इथे जर नाट्यशिक्षण संस्था निर्माण झाली असती तर तिथे शिकवण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी मातब्बर मंडळी ह्या चार भाषांमध्ये कार्यरत होती, ती आली असती. पण तसं दुर्दैवाने झालं नाही. अमृत नाट्य भारती हे नाट्यशिक्षणाचं स्वप्न अर्धच राहिलं. पण तसा एक प्रयत्न करण्यात आला होता. मुंबई विद्यापीठाच्या सहाय्याने ह्यात अभ्यासक्रम मुक्रर करण्याकरता एक खरंच चांगल्या मंडळींची समिती नेमण्यात आली. पण निमंत्रकाने समितीची सभा न बोलवता स्वत:च अभ्यासक्रम निर्माण केला. तो तद्दन मूर्खपणाचा आणि चुकीचा होता. तसं विद्यापीठाच्या मी लक्षात आणून दिलं आणि त्यानंतर तो रद्द करण्यात आला. पुढे साहित्य संघात नाट्यशिक्षणाचा कार्यक्रम झालाच नाही. ह्याला मी जबाबदार आहे. पण मी जे केलं ते जरी तेव्हा साहित्य संघाला न आवडणारं होतं, तरी मला वाटतं डॉक्टर अमृत नारायण भालेराव आणि बापूराव नाईकांना नक्कीच पटलं असतं.

अमेरिकन नाटककार अशा विषयाच्या तपशीलात सार्त्र, आयेनेस्ते, बेकेट, अनवी, जेने, ह्या फ्रेंच नाटककारांची नावे होती. दिग्दर्शनाच्या अभ्यासक्रमात तालमीची जागा ठरवणे, वेशभूषेच्या अभ्यासक्रमात ड्रेसवाल्याकडून कपडे भाड्याने आणणे, अशा प्रकारचा मजकूर होता. ज्या निमंत्रकाने

हा अभ्यासक्रम तयार केला तो पुढे नाट्य संमेलनाचाही अध्यक्ष झाला. त्यालाही मी जोरदार विरोध केला. जळगावचं नाट्यसंमेलन रद्द झालं आणि ते अपमानास्पद पध्दतीनं अलिबागला उरकून घेण्यात आलं.

नाट्यसंमेलनं नाटयपरिषद भरवत असते. ही नाट्यपरिषद बराच काळ साहित्य संघात होती. तेंव्हा माझे वडील त्याचे उपाध्यक्ष असत. त्या काळात परिषदेला असा वेगळा अध्यक्ष नसे. संमेलनाचाच अध्यक्ष एक वर्ष हे काम बघत असे. त्यामुळे प्रमुख उपाध्यक्षाला फारच महत्व असे. पुढे जेंव्हा नाट्यपरिषदेची वेगळी जागा निर्माण झाली तेव्हा त्याची कचेरी साहित्य संघातून हलविण्यात आली आणि साहित्य संघाचा त्याच्यावरील तावा नाहीसा झाला. साहित्य संघाच्या दृष्टीने हा एक मोठाच तोटा ठरला.

नाटकांमध्येही महाराष्ट्र कायम आघाडीवर. अधूनमधून बंगाली, हिंदी, कन्नड अशा रंगभूमीबद्दल आदराने बोललं जातं. पण मराठी रंगभूमी कायम अग्रस्थानी राहिली आहे. असं कां? ह्याची नेमकी कारणं कोणती? तर त्याची 'प्रायोगिकता' !

१९व्या शतकातच अण्णासाहेब किर्लोस्कर आणि गोविंद बल्लाळ देवल ह्या दोन असामान्य नाटककारांनी असामान्य प्रयोग केले. किर्लोस्करांनी कालिदासाच्या 'शाकुंतल'चं मराठीकरण केले आणि 'संगीत सौभद्र'सारखं कौटुंबिक जिव्हाळ्याचं पौराणिक नाटक लिहिलं. देवलांनी शेक्सपिअर आणि मोलियर मराठीत 'झुंझारराव' आणि 'संशयकल्लोळ'च्या स्वरुपात आणण्याचे प्रयोगच केले. पण फक्त भाषांतर -रुपांतरांवर समाधान न मानता 'संगीत शारदा' सारखं सामाजिकदृष्ट्या महत्वाचं नाटक करण्याचा प्रयोग देवलांनी केला.

मराठी रंगभूमीच्या पहिल्या ५० वर्षातच हे एवढे मोठे प्रो.ग आपल्या 'प्रायोगिक' लोकांनी केले आणि मराठी परंपरा निर्माण केली, जी पुढील १०० वर्षे टिकून राहिली आणि काही संभावित नाट्यकर्मींची उपजिविकेची सोय झाली.

२०व्या शतकातील प्रायोगिकतेचे मानकरी कोण होते? नाटककारांपैकी गडकरी, खाडिलकर, कोल्हटकर. त्यानंतर वर्तक, वरेरकर, रांगणेकर, सावरकर, अत्रे. त्याहीनंतर बबन प्रभू, शिरवाडकर, कानेटकर, पु. ल.देशपांडे. अजून पुढे जाऊन दळवी, मतकरी. ह्या सर्वांनी ज्या प्रकारची नाटकं मराठी रंगभूमीवर आणली त्यातील पुष्कळशी माझ्या मते 'प्रायोगिक'च होती, जरी हे सर्व नाटककार आज आपण मुख्य धारेचे नाटककार मानत असलो तरी! आज मात्र आपण असं मानू लागलो आहोत की ही 'प्रायोगिकता' १९५० नंतर इथे रुजली. ते खरं नाही. 'प्रायोगिकता' म्हणजे काय? 'हौशी' म्हणजे काय? 'समांतर' म्हणजे काय? ह्यांची उत्तरं ह्या शब्दांच्या व्याख्येत शोधण्यापेक्षा ती विरोधी अर्थांच्या शब्दांत शोधल्यास सहज सापडेल. 'हौशी'चा अर्थ 'जे व्यावसायिक नाही ते'. 'समांतर'चा अर्थ 'जे मुख्य धारा नाहीत ते'. तसंच, 'प्रायोगिक' ते जे पूर्णपणे 'प्रचलित' नाही ते. 'प्रयोग'चा इंग्रजी अर्थ experiment असा घेतला पाहिजे. ही experiments नाटकाच्या प्रत्येक घटकात होऊ शकतात. लेखनात, विषय/आशय आणि बाज ह्यांत प्रयोग होऊ शकतात. 'घाशीराम कोतवाल' हे ह्याचं सर्वात चांगलं उदाहरण होऊ शकतं. कारण ह्यात तेंडुलकरांनी वेगळा विषय हाताळला. एवढंच नव्हे तर मराठी

नाटकाला अपरिचित असा नवा 'टोटल थिएटर'चा आणि लोककलांचा उपयोग केलेला बाज आणला. लेखनात जसे प्रयोग शक्य आहेत तसेच ते दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश, वेषभूषा, रंगभूषा, संगीत, अभिनय, नृत्य इ. मध्येही होऊ शकतात आणि मराठी रंगभूमीवर ते तसे १८४३च्या भाव्यांच्या प्रयोगापासून आजतागायत होत आलेले आहेत आणि ते ही मुख्यधारेमध्ये. ह्यात डॉ. भालेरावांचं काम महत्वाचं ठरतं. ज्याला सर्वसाधारणपणे आपण 'व्यावसायिक' रंगभूमी म्हणतो (आणि जिला वास्तविक आपण 'मुख्य धारा' Main Stream रंगभूमी म्हटलं पाहिजे) अशा प्रकारच्या नाटकांमध्ये कायम 'प्रयोग' करणं चालूच असतं. अगदी हल्ली हल्लीच (१६६ वर्षांचा इतिहास लक्षात घेता) उदाहरण घ्यायचं तर वसंत कानेटकर ह्यांची नाटकं. त्यांचं प्रत्येक 'व्यावसायिक' नाटक वेगळं आहे. 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'मत्स्यगंधा', 'लेकुरे उदंड झाली' इ. आशय-विषय आणि बाजाचे इथे 'प्रयोग'च होते. पण 'प्रायोगिकतेच्या' पलिकडे 'समांतर' रंगभूमी इतर बरंच काही साधत असते. लोकांना काय आवडतं, तेच तेच पुन्हा पुन्हा आणि वर्षांनुवर्ष तसंच देत राहणं ह्यापेक्षा जे आपल्याला करावसं वाटतं, ते करून पहाणं हे 'समांतर' रंगभूमीचं प्रयोजन आहे. ह्या 'समांतर' रंगभूमीवर सर्व प्रकारचे रंगकर्मी जमतात. 'मुख्य धारे'मध्ये प्रस्थापित झालेले इथे प्रयोग बघायला येतात. इतकंच नव्हे तर ते सहभागीही होतात. 'समांतर' नाट्यसंस्था ही प्रत्येक व्यावसायिक रंगकर्मीची alma mater सारखी असते. Old students' reunion होत राहिली पाहिजे. आपण जिथे धडपडलो, शिकले, ती आपली शाळा. तिथले सोबती आज दूरदर्शन आणि चित्रपटांत स्थिरावले असतील, व्यावसायिक म्हणून गाजले असतील, श्रीमंत झाले असतील. पण इथे ते पुन्हा परत येतात, एकमेकांना भेटायला.

'प्रायोगिक' रंगभूमीचे अनेक मित्र असतात. हे मित्र कधी आर्थिक, तर कधी इतर प्रकारे 'समांतर' रंगभूमीला मदत करत असतात. ते ह्या नाटकांना आवर्जून हजेरी लावतात. आमच्या सर्व नाटकांना पु. ल. देशपांडे, मधुकर तोरडमल, जयवंत दळवी हमखास हजर असायचे. प्रभाकर पणशीकरांसारखे निर्माते कायम मदत करायचे. त्या काळच्या प्रतिथयश व्यावसायिक नाट्यकर्मींना 'समांतर'चं महत्व पटलेलं होतं. पण आज (२००० नंतर) काय परिस्थिती आहे? आज 'समांतर', 'प्रायोगिक' ह्या शब्दांचा अर्थ न कळलेल्या काही प्रतिष्ठित रंगकर्मींना 'प्रायोगिक'चा तिटकारा आलेला आहे. त्यांचा राग ते उघडपणे व्यक्त करत आहेत. 'समांतर'वाले फुकटे आहेत, त्यांची लायकी नाही, त्यांच्या नाटकांना कोणी येत नाही, तेंव्हा त्यांना महत्व देऊ नये, त्यांना आपल्यात घेऊ नये, त्यांना आपल्या नाट्यगृहात हक्कांची जागा मिळू नये, त्यासाठी प्रयत्न करावा, दामू केंकरे आणि विजय तेंडुलकरांना तुच्छतेने वागवत आपल्या वास्तूच्या वाहेर पावसात भिजत ठेवावं....अशा प्रकारची मतं असलेले 'प्रायोगिक'चे शत्रू आज आपल्या इथे आहेत. ज्या रंगभूमीसाठी आयुष्यभर योगदान दिलं, त्याच रंगभूमीच्या 'प्रातिनिधिक' प्रतिष्ठितांनी आपल्याला कसं वागवलं, असं केंकरे-तेंडुलकरांना वाटलं नसेल? त्यातच ते खचले नसतील? आणि त्यामुळेच ते तर वर्षभरात आपल्यातून निघून गेले नसतील? दोघांनी अखेरच्या काळात औषध आणि जेवण सोडलं होतं.

ज्यांचा रंगभूमीशी काहीही संबंध नाही अशी राजकारणी मंडळी सरकारी देणग्या आणून देऊ शकतात, म्हणून 'व्यावसायिक' नाट्यकर्मींच्या प्रातिनिधिक संस्थांवर विळावर नागोबा बसतो तसे बसून आहेत. ही सर्व मंडळी 'संमेलनं' घेऊन 'प्रायोगिक'वाल्यांना शिव्या देतात. त्यात काही असेही असतात की

ज्यांना 'व्यावसायिक'वर काहीही बुकींग कधीच मिळालं नाही. ते मात्र ह्या 'व्यावसायिकां'च्या गर्दीत बेमालूम मिसळून जातात आणि प्रातिनिधिक संस्थेवर पद मिळवतात किंवा आकस-युक्त असं वृत्तपत्रीय लिखाण करण्यात धन्यता मानतात. दोन्ही ठिकाणी सपशेल आपटी खातात, त्यांची छी थू होते हे वेगळं. पण ते त्यांना वेळीच कळत नाही. तेव्हा, मराठी रंगभूमीवरची 'प्रायोगिकता' ही मोठ्या प्रमाणावर धोक्यात आली असून ती सांभाळणं आता पूर्णपणे 'समांतर'वाल्यांच्याच हातात आहे.

मुख्य धारेतल्या मंडळींनी नाकाने कांदे न सोलता, आपण ज्यांच्या खांद्यावर उभे आहोत ते स्मरावं आणि त्या 'प्रायोगिक' मंडळींचा बहुमान करावा. 'प्रायोगिकता' जोपासणं ह्यातच 'मुख्य धारे'चं हित आहे हे त्यांनी जाणावं. आपला आजचा 'माल' चांगला खपतो आहे म्हणून कोणताही कारखानदार आपली अडगळीच्या खोलीतील छोटीशी प्रयोगशाळा बंद करून टाकत नाही. कारखानदार पैसा मिळताच चांगला Research आणि Development Workshop उभारतो. थॉमस एडिसनने निर्माण केलेली उपकरणं अमेरिकेत जोरात खपू लागली आणि त्याने त्याचा कारखाना मोठा केला. पण तो स्वत: मात्र त्याच्या प्रयोग कार्यशाळेतच बसत असे. त्याला 'प्रायोगिकते'चं महत्व पटलेलं होतं!

ते असो. थोडं विषयांतर झालं.

साहित्यविषयक कार्य म्हणजे काय ? मध्यवर्ती संस्थेकडून ह्या बाबतीत काय अपेक्षित आहे ? मराठी साहित्याची जोपासना करण्यासाठी महाराष्ट्रात दत्तो वामन पोतदार ह्यांच्या अध्यक्षतेखाली १९६० च्या सुमाराला मराठी साहित्य महामंडळ स्थापण्यात आलं. माझे वडील महामंडळाचे पहिले कार्यवाह. विदर्भ साहित्य संघ, मराठवाडा साहित्य संघ, पुण्याची साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ ह्या घटक संस्था. सुरुवातीच्या काळात साहित्य संघाने महामंडळाला नावारूपाला आणण्यात मोठं योगदान केलं. तेव्हा महामंडळ खरंच महाराष्ट्रव्यापी अशी संस्था होती. पुढे-पुढे मात्र दर दोन-चार वर्षांसाठी मंडळाचं 'दफ्तर' कधी नागपूर, कधी औरंगाबाद, कधी पुणे आणि क्वचितच मुंबईला येऊ लागलं. ही अखिल-महाराष्ट्र संस्था जवळजवळ स्थानिक होऊन गेली. ज्या ठिकाणी औषधाला सुध्दा 'खरा' साहित्यिक सापडणं दुरापास्त, तिथल्या 'संस्थानिक' मनोवृत्तीच्या प्राध्यापकीय मंडळींच्या हातात कारभार गेला आणि मग वार्षिक साहित्य संमेलन लॉस-एंजेलिस किंवा न्यू जर्सी सारख्या फालतू ठिकाणी होऊ लागली. मुंबई मराठी साहित्य संघ काहीच करू शकला नाही. कां ? कारण तोपर्यंत ह्या महामंडळावर पाठवण्यासाठी साहित्य संघाकडे तशी मातब्बर मंडळीच उरली नाहीत.

मध्यवर्ती साहित्य संस्थेने काय कार्य करावं ? तिथे साहित्यातील सर्व नवीन प्रवाहांनी वेळोवेळी येऊन मिळू नये काय ? नामदेव ढसाळ साहित्य संघात किती वेळा आला ? किरण नगरकर किती वेळा आला ? आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे, अनंत काणेकर आणि वि. वा. शिरवाडकर जसे येत, तसे पुढे श्री. ना. पेंडसे, विं. दा. करंदीकर, विजय तेंडुलकर किती वेळा आले ?

वर्षापाठोपाठ वर्ष जातात. वार्षिक अहवाल छापले जातात. वार्षिक सर्वसाधारण सभा होतात. हिशोब तपासनिसांचे शेरे चांगले असतात. देणग्यांतून कर्ज फिटतात. इमारत रंगवली जाते. प्रेक्षागारात नवीन गुबगुबीत खुर्च्या लावल्या जातात. त्यांचं उद्घाटन कोणी मोठा उद्योगपती करतो. अध्यक्षस्थान कोणी धनिक भूषवतो.

आज संस्थेला ७५ वर्ष झाली.....पण साहित्य कुठं आहे ? नाटकं कुठे आहेत ?

## संघ एक कुटुंब
-दिलीप भाटवडेकर

माझा साहित्य संघाशी खऱ्या अर्थानं सक्रीय संबंध आला तो १९८० सालापासून, असं म्हणायला हरकत नाही. खरं तर मी लहानाचा मोठा संघातच झालो असंच म्हणावं लागेल व ते योग्यही होईल. साधारण ५/६ वर्षाचा असताना मी संघातच माझं पहिलं रंगभूमीला योगदान दिलं. संघात 'दुसरा पेशवा' या नाटकांत बाजीरावाचा मुलगा समशेरची भूमिका करण्याचा माझ्यावर प्रसंग आला. नेहमी 'ते' काम करणारी भक्ती वर्वे आजारी असल्यामुळे माझ्यावर हा प्रसंग ओढवला होता. 'प्रसंग' म्हणण्याच कारण म्हणजे, आयुष्यात प्रथमच रंगमंचावर उभं राहण्याची वेळ आली होती, आणि ती सुध्दा बाबा म्हणजे दाजी भाटवडेकर, अभिनेत्री उषाकिरण, विनायक जोशी वगैरे इतक्या मोठ्या कलाकारांबरोबर ! इतर वेळी मस्ती करणारा द्वाड मुलगा मी, पण तालमीची वेळ आल्यावर मात्र तोंडाचं पाणी पळालं होतं. माणसाचे 'हातपाय लटपटणं' म्हणजे नक्की काय हे मला त्यावेळी अनुभवाला आलं. माझ्या परम भाग्याची गोष्ट म्हणजे, माझी भूमिका बसवून घेण्याची जबाबदारी, मी ज्यांना रंगभूमीचे अभिनिवक्त सम्राट मानतो ते दत्ताराम वळवईकर म्हणजे आमचे बापू दत्ताराम बापू, यांच्यावर सोपवण्यात आली होती. इतका मोठा नट पण एका नवख्या, लहान आणि रंगभूमीशी तिळमात्र संबंध नसलेल्या मुलाकडून काम बसवून घेण्यासाठी दत्तारामबापूंची योजना करण्याची ज्यांची कल्पना ते म्हणजे बापू -डॉ. भालेराव. अतिशय प्रेमळ स्वभावाचे, कधीही कोणाशी चढ्या आवाजात न बोलणारे दत्ताराम बापू माझ्याकडून माझ्या पातळीवर येऊन मला शिकवीत. दत्तारामबापू माझी तालीम घेत असत, त्यावेळी छोटी कॅडबरी चॉकलेटस् आणून मला जवळ घेऊन दत्तारामबापू बसत. तालीम चांगली झाली की मला छोटी कॅडबरी मिळे. तालीम सुरू झाल्यावर, बरोबर नाटकात काम करणारी सर्वच माणस माझ्याशी प्रेमाने वागत. त्यामागे मी घाबरून बुजून जाऊ नये, माझी भीती चेपून मला धीर यावा हाच हेतू होता.

या सर्वांपेक्षा वेगळी अशी एक व्यक्ती तिथे मला लाभली, की जिच्याबद्दल मी जे अनुभवलं त्यावर त्या व्यक्तीला साधारणपणे ओळखणाऱ्या कोणाचाही विश्वास बसणार नाही. ती व्यक्ती म्हणजे कै. डॉ. अ.ना. भालेराव - माझे बापू. वरकरणी तापट आणि अतिशय शिस्तीचा अट्टाहास असणारा हा गृहस्थ, की ज्यांचा नुसता आवाज ऐकला तरी मी मी म्हणणाऱ्यांचं धाबं दणाणायच, अशा माणसाला जर कोणी माझ्या सारख्या मुलाला कडेवर घेऊन त्यावेळच्या दिवाडकरांच्या कँटिनमध्ये नेऊन बटाटावडा आणि मँगोला देऊन, अर्धा अर्धा तास माझ्याशी, माझ्या पातळीवर येऊन खेळत बसलेलं पाहिलं असतं तर त्यांचा विश्वास तरी बसला असता का ? माझ्या मनातील भीती संपूर्णपणे घालविण्यासाठी बापूंनी माझ्यासाठी हे सुध्दा केलं.

थोरा मोठ्यांपासून ते लहानांपर्यंत आणि प्रसिध्द, मातब्बर व्यक्तीपासून ते सर्वसाधारण माणसापर्यंत, माणसं जोडण्यांत बापूंचा हातखंडा होता. साहित्य संघाला त्यावेळी माणसाचं पाठबळ मिळविण्यात केवळ बापूच जबाबदार होते. संस्थेला पैशाचं पाठबळ तोकडं होतं, पण त्याची उणीव बापूंनी जिवाला जीव देणाऱ्या आणि संघासाठी काबाडकष्ट काढणाऱ्या माणसांना जोडून भरून काढली होती. त्यांचा शब्द फुलासारखा झेलणारे डॉ. गंगाधर फडके, डॉ. भा. नि. पुरंदरे, तात्या आमोणकर, शं. ना. अंधृटकर, बापूराव नाईक, चं. वि.बावडेकर, वा. रा. ढवळे, बाबा कलगुटकर, भार्गवराम पांगे, त्रिंबक गोखले, शिवा चिखलीकर, संघ नाट्यगृहाचा सांभाळ करणारे वझेकाका, शहाणेकाका, जगन्नाथ ठाकूर, रंगमंच व नेपथ्याचा सांभाळ करणारे जयवंत, कृष्णा, बाळू, कपडेपट सांभाळणारे घोटसकर, असे अनेक शिलेदार बापूंजवळ होते, ज्यांनी कशाचीही तमा न बाळगता बापूंनी अंगावर टाकलेलं प्रत्येक काम जणू त्यांची आज्ञा मानून पार पाडलं. हे होण्यामागे केवळ धाक नव्हता तर आदरयुक्त प्रेम व आपुलकी होती. प्रत्येकजण जणू बापूंच्या प्रेमळ कटाक्षासाठी अथवा पाठीवर पडणाऱ्या आपुलकीच्या थापेसाठी आसुसलेला असे. या प्रेमाचा आमच्या भाटवडेकर कुटुंबावर इतका खोलवर प्रभाव झाला होता की बाबा (दाजी), आई (चारूशीला उर्फ संघ कुटुंबियांची माईसाहेब) आणि मी, आजतागायत संघाशी सर्वस्वी बांधले गेलो आहोत. हे नातं लादलेलं नाही तर स्वेच्छेने अंगीकारलेलं आहे. बाबा अखेरच्या श्वासापर्यंत संघ व्यवस्थापनाशी निगडीत होते. प्रथम नियामक मंडळ सदस्य, मग कार्यकारी मंडळ सदस्य, त्या नंतर प्रमुख कार्यवाह, कार्याध्यक्ष व अखेरीस अध्यक्ष म्हणून. माझा संघ व्यवस्थापनाशी प्रथम संबंध आला तो त्रिंबक गोखले हे संघ कार्यवाह असताना - साधारणपणे १९८० च्या सुमारास, तो आजही कायम आहे. प्रथम केवळ कार्यकर्ता म्हणून व नंतर कार्यकारी मंडळ सदस्य व कार्यवाह संघ मंदिर व्यवस्था समिती. आजही मी कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून संघकार्याशी संलग्न आहे. असे माझ्यासारखे अनेक कार्यकर्ते संघाने घडवले आहेत, जे आज संघात व संघाबाहेरही उत्तम कार्य करत आहेत.

कार्यकर्त्यांबरोबर बापूंनी मोठ्या नट मंडळींचाही संग्रह संघासाठी केला व बापूंच्या उत्तराधिकाऱ्यांनी हे व्रत पुढे तसचं चालू ठेवलं. चिंतामणराव कोल्हटकर, मास्टर नरेश, नानासाहेब फाटक, मास्टर दत्ताराम, मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्तोपंत आंग्रे, कृष्णराव चोणकर, जयराम शिलेदार, चित्तरंजन कोल्हटकर, बाळ कोल्हटकर, मीनाक्षीबाई शिरोडकर, जयमालाबाई शिलेदार, दुर्गाबाई खोटे, दुसऱ्या फळीत अनंत वर्तक, दाजी भाटवडेकर, दामू केंकरे, नाना अभ्यंकर, शंकर घाणेकर, विनायक जोशी, अरविंद देशपांडे, आत्माराम व आशा भेंडे, जयंत सावरकर, अरविंद पिळगांवकर, दत्ता भट, मधुकर तोरडमल, विजया जयवंत (मेहेता), कामेरकर भगिनी, आमोणकर भगिनी-सुधा आमोणकर (करमरकर), ललिता आमोणकर (केंकरे), रजनी जोशी, कमलाकर व लालन सारंग, असे अनेक रंगभूमीचे शिलेदार संघाच्या अगदी जवळचे होते व आहेत. त्याचप्रमाणे नाना ओक, बळवंत पाठारे, सुरेश कर्णिक, नंदा फडके, राम भडसावळे, शंकरराव भोसले, अच्युत जोशी असे अनेक हौशी कलाकारही संघाच्या व रंगभूमीच्या प्रेमाखातर त्या काळीही संघ परिवारात कार्यरत होते. संघाच्या नाट्य

दिग्दर्शकांच्या नामावळीत स्वत: बापू, बाळासाहेब काळे, केशवराव दाते, पु.ल.देशपांडे अलीकडच्या काळात विश्राम बेडेकर, पुरूषोत्तम दारव्हेकर, दामू केंकरे, दाजी अशी अनेक नावे आहेत. द. ग. गोडसे यांच्यासारखे नेपथ्यकार, कुसुमाग्रज, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, पार्श्वनाथ आळतेकर, चिं. य. मराठे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखे सिध्दहस्त लेखक संघाला बापूंमुळेच लाभले. बाबांना त्यांचे अभिनय क्षेत्रातले गुरू श्री. के. नारायण काळे हेही साहित्य संघामुळेच लाभले. बाबांना आज नाट्यक्षेत्रात जे स्थान प्राप्त आहे, त्यात साहित्य संघाचा सिंहाचा वाटा आहे हे त्रिकाल सत्य आहे, असे मी आणि माझे समस्त कुटुंबीय अभिमानाने म्हणतो आणि बाबा हयात असेपर्यंत नेहमी असेच म्हणत. त्यांच्या अनेक लेखांत 'याचा' त्यांनी अभिमानाने उल्लेख केला आहे. हे संघाचं वैभव बापूंच्या प्रदीर्घ आणि अविरत प्रयत्नांचं फळ आहे असं म्हणायला हवं. संघानं संस्कृत रंगभूमीवरचे निर्मला गोगटे, सुमती टिकेकर, नलिनी फणसे, नारायण बोडस यांच्यासारखे कलाकारही मराठी रंगभूमीवर आणले. साधारणत: 'डॉक्टर' एखाद्या माणसाला जीवदान देऊ शकतो, पण या महर्षी धन्वंतरीनं साहित्य संघाच्या रूपाने आसन्नमरण झालेल्या समस्त मराठी रंगभूमीला जीवदान दिलं, हे सूर्यप्रकाशाइतकं सत्य आहे. बापूंनी आपल्या सर्वस्वाचं सिंचन करून लावलेल्या साहित्य संघ नावाच्या रोपट्याचा आज एक डवरलेला वृक्ष झाला आहे, आणि आजही ह्या वृक्षाच्या छायेत असता बापूंच्या प्रेमाच्या ऊबेची अनुभूती होते. बापूंच्या अथक प्रयासातून, श्रमयज्ञातून संघाने रंगभूमीला अनेक कलाकरांच्या रूपानं व नाट्यकृतींच्या रूपानं अनमोल शिल्प अर्पण केली आहेत.

बापू आपल्या संघ कुटुंबातील सहकाऱ्यांवर इतकं प्रेम करत, प्रत्येक कार्यकर्त्याला नेहमी संस्थेसाठी तो व त्याचा सहभाग महत्वाचा असल्याची जाणीव देत असत, त्याचा परिणाम त्यांच्यापैकी अनेकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या हृदयांत इतका खोलवर झाला की आज त्यांची दुसरी पिढीही संघकार्याशी निगडीत आहे. साहित्य संघ हे अनेक कुटुंबांचं एक कुटूंब आणि बापू त्याचे कुटुंबप्रमुख. बापूंच्या पत्नी - आमच्या सर्वांच्या वहिनी, याही आईप्रमाणे समस्त संघ कार्यकर्त्यांची सदैव विचारपूस करत, त्यांचं दुखलंखुपलं बघत, त्यांना हवं नको ते बघत. नाटकाच्या वेळी स्त्रियांचा कपडेपट सांभाळणे हे काम नेहमी वहिनींकडे असे व त्यांच्या मदतीला वत्सलाताई अंधृटकर, शालिनीताई वर्तक, सुमनताई पांगे आणि माझी आई यांच्यापैकी कुणीतरी असे. त्यावेळी बरेचदा नाटकात खरे दागिने वापरले जात. त्याचा ताबा वहिनींकडेच असे. साड्या नेसवण्यापासून ते त्याच्या घड्या घालून ठेवण्यापर्यंत सगळी कामे याच सर्वजणी करत. नाईक, अधृंटकर, कलगुटकर, वर्तक आणि भाटवडेकर कुटुंबातील आम्ही सर्व मुलं आणि आमच्यातला मोठा सुधीर– सुधीर ठाकूर, जगन्नाथ ठाकुरांचा मुलगा, साहित्य संघाला आमचं दुसरं घर मानत असू. रजनीताई (पूर्वाश्रमीची वर्तक व आता दांडेकर - उद्योगपती सुभाष दांडेकर यांच्या पत्नी) व शरददादा (अनंतकाका वर्तकांचे चिरंजीव) हे दोघे आम्हा मुलांत नेहमीच नसत. कारण ते दादरला राहत, त्यामुळे दररोज येणं होत नसे. बाकी सुधीर सोडून आम्ही सारे गिरगावातले. बापूंच्या कुटुंबातील बाळदादा, बेबीताई, कुंदाताई आम्हा सर्व मुलांना मोठ्या भावंडाप्रमाणे होते आणि अजूनही आहेत. बापू आणि त्या माऊलीच्या प्रेमात त्यांच्या स्वत:च्या मुलांबरोबर आम्ही सर्व मुलंही हक्काचे

वाटेकरी होतो. बापूंचं आम्हा सर्व मुलांवर अतिशय प्रेम होतं, त्याचप्रमाणं आम्हा सर्व मुलांना बापूंचा प्रचंड धाक होता, आदरही ओतप्रोत होता. नातवंडांसाठी आजोबा-आजीचं प्रेम स्वगृही आम्हांपैकी फार थोड्यांच्या नशिबी आलं असेल, पण बापू-वहिनींनी त्याची उणीव आम्हाला कधी भासू दिली नाही.

माझ्या आईचे संघाशी जोडल्या गेलेल्या संबंधाची एक मजेदार गोष्ट तिच्याच शब्दांत देतो. आईचं आज वय ९१ वर्ष, प्रकृती अस्वास्थामुळे ती लिहू शकत नाही. सांगितलेल्या आठवणीचे शब्दांकन करण्याचा मी फक्त प्रयत्न केला आहे. - ''संघासाठी पैसे जमा करण्याच्या हेतूने पु. ल. च 'अंमलदार' नाटक करण्याचा घाट दाजी भाटवडेकर, अनंत वर्तक, मोहन संझगिरी, नाना अभ्यंकर वगैरे मंडळींनी घातला, त्यात माईसाहेबांनी कामासाठी माझं नाव (मला अजिबात न विचारताच) घालून टाकलं. मला जेव्हा हे कळलं, त्यावेळी भीतीने माझे हृदयाचे ठोके क्षणभर बंदच पडले. मी घाबरट नंबर एक, नाटकात कधीही काम न केलेली. एवढचं नव्हे तर नाटकंही न पाहिलेली, तेव्हा मुरब्बी नटसंचात मी काम करणं सर्वथैव अशक्यच ! माझा आतापर्यंत नाटकांशी संबंध आला तो फक्त कॉलेजमध्ये असताना अभ्यासक्रमात लावलेल्या संस्कृत नाटकांचा अभ्यास करण्यापुरता. अशी ही मी, अभिनय हा ज्यांच्या हातचा मळ अशा थोर कलावंतांबरोबर मी स्टेजवर काय उभी राहणार ? पण दुर्दैवच पाठीशी लागल्याप्रमाणं दुसऱ्याच दिवशी सकाळी डॉक्टर स्वत:च आमच्या घरी हजर ! आल्याआल्याच मला माझे जुन्या तऱ्हेचे दागिने दाखवायला सांगितले. हे माझे घरचे खरे दागिने सांभाळायची जबाबदारी वहिनींना घ्यावी लागली. वहिनी कायम बॅकस्टेजला असायच्या म्हणून आमचं निभावलं. कुठल्या अंकात मी म्हणजे माईसाहेबांनी कुठले दागिने घालायचे हे डॉक्टरांना ठरवायचं होतं, मी भीतभीत म्हटले,''पण डॉक्टर मी नाटकात काम कुठं करणार आहे ? पडदा वर गेल्यावर मोठा जमाव पाहिला की भीतीने माझी गाळण उडून मी खचित बेशुध्दच पडेन !'' डॉक्टर म्हणाले,''नाटकाची मला नाही का काळजी ? मी तिथे असताना तुम्हाला काळजी करण्याचे काही कारण नाही. बेशुध्द वगैरे पडायचे माझ्यावर सोपवा''. माझं नावही बोर्डावर नटसंचाच्या यादीत घातलं गेलं होतं. आता माझ्याकडून नकार अशक्यच ! पहिल्या प्रयोगाच्या वेळेला डॉक्टरांचा व वहिनींचा आशीर्वाद घेऊन प्रेक्षकवर्गाकडे न बघता माझी वाक्यं जोरजोरानं म्हणत स्टेजवर गेले व सुदैवाने परमेश्वराच्या व पुण्यशील भालेराव दांपत्याच्या आशीर्वादाने अगदी शेवटच्या अंकापर्यंत कुठेही न चुकता, अडखळता व एकदाही माझं वाक्य न विसरता अगदी उत्तम प्रकारे माझं काम मी तडीस नेलं. त्यानंतर मी अनेक नाटकांत (संस्कृत व मराठी) काम केले पण कधीही चुकले किंवा अडखळले नाही. अशी झाली माझ्या नाट्यजीवनाची मुहूर्तमेढ'' ; आणि संघ परिवारांत अशी एका सुनेची भर पडली.

संघ परिवारात कधीही कोणावर अन्याय झाला नाही व कोणाचे अनाठायी लाडही झाले नाहीत. या बाबतीत बाबांनी मला सांगितलेली एक गोष्ट त्यांच्याच शब्दांत देण्याचा प्रयत्न करतो - ''माझ्यावर लोभ, अभिनयादि गुणांचं कौतुक आणि निष्ठेबद्दल पूर्ण विश्वास असूनही 'वैजयंती' या

कुसुमाग्रजांच्या नाटकांत प्रमुख नायक 'जयपाल' ही भूमिका करण्याची प्रबळ इच्छा मी व्यक्त करून, दिग्दर्शक केशवराव दाते आणि सर्वेसर्वा बापू यांचेजवळ आग्रह धरूनही मला ती पेलणं जड जाईल हे ओळखून बापूंनी ती मला देण्याचं नाकारलं. पण हिरमुसलेल्या मला मा. दत्ताराम, नानासाहेब फाटक, दुर्गाबाई, मामा पेंडसे या मातब्बरांवरोबर 'रंगभूमीवरचा वावर व अभिनय आणि संवाद-फेक' यांचे दोन-तीन महिन्यांच्या तालमींच्या काळात जवळिकीनं निरीक्षण करून अभ्यास, साधना करण्याची संधी मला मिळावी या हेतूनं, कायम रंगमंचावर वावरण्याची पहारेकरी - शिपायाची पांच/दहा संवादांची भूमिका बापूंनी मला दिली. मीसुध्दा आद्यगुरू बापूंवरील प्रेमादर, निष्ठा आणि विशेष म्हणजे भक्ती यामुळे ती स्वीकारली. माझ्या गुरूस्थानी असलेल्या नानासाहेब फाटक, दुर्गाबाई, मामा पेंडसे आणि विशेषत : मा. दत्ताराम यांनी प्राणांची बाजी लावून विविध रसास्वादांच्या रंगच्छटांच्या उधळणीने भन्नाट रंगविलेल्या 'वैजयंती'च्या प्रयोगातून मला गवसलेली 'निकट निरीक्षणाचा आणि सहवासाचा लाभ' ही अभिनय साधनेचा साक्षात्कार घडवणारी एक अपूर्व पर्वणीच ठरली. आणि हे घडवून आणणारे होते मराठी नाट्यसृष्टीला संजीवन देणारे, संगीत नाटकांचे अश्विनीकुमार आणि रंगदेवतेचे निस्सीम उपासक, माझे परमप्रिय बापू-कै. डॉ. अ. ना. भालेराव !''

या परिवारात प्रत्येकाच्या गुणांचं नुसतं कौतुक झालं असं नाही तर त्याच्या गुणांना भरभरून प्रोत्साहनही मिळाले व योग्य ते लाडही झाले. बाबांच्या शब्दांतला हा आणखी एक किस्सा - ''मध्यंतरीच्या काळात संस्कृत नाट्यसृष्टीसाठी मी केलेल्या धडपडीचे कौतुक म्हणून 'कालिदास जयंती' साजरी करण्यासाठी बापूंनी साहित्य संघाच्या रंगमंचावर ब्राह्मण सभेनं निर्माण केलेल्या 'अभिज्ञानशाकुंतलम्' या कालिदासाच्या संस्कृत नाटकाचा प्रयोग घडवून आणला. मी दिग्दर्शित केलेल्या या प्रयोगात मी 'दुष्यंताची' भूमिका केली होती. त्यानंतर संस्कृत 'भ्रातृकलहम्' म्हणजेच भाषांतरीत 'भाऊबंदकी' चा प्रयोगही घडवून आणला. केशवराव दाते, नानासाहेब फाटक, मा. दत्ताराम या गुरुवर्यांनी हा प्रयोग आवर्जून येऊन पाहिला. कालिदासानं रघुवंश या महाकाव्यात रघुराजाचं वर्णन करताना असं म्हटलं आहे की त्याच्या प्रजेचे, फक्त नैसर्गिक जन्म देणारे म्हणूनच रक्ताच्या नात्याचे आई-वडील अन्य होते, पण शिक्षण, सांस्कृतिक पोषण आणि रक्षण करणारा रघुराजा हाच त्यांचा खरा पिता मानला पाहिजे. त्याप्रमाणे नाट्याभिनयाद्वारे साहित्य-संगीत-सांस्कृतिक क्षेत्रांत साहित्य संघाच्या पाणपोईने माझे जीवन विविध भूमिका देऊन समृध्द करणारे बापू हे पितृतुल्य गुरूच होते. ते मात्र मला कुटुंबातल्या धाकट्या भावासारखे, माझ्या खाण्यापिण्याच्या खास आवडीकडेसुध्दां जातीने लक्ष पुरवून, आटीव दुधाचा कटोरा, रहाळकरांची ओल्या काजूची उसळ, मिसळ, प्रकाश दुग्धमंदिरातील नाश्त्याचे पदार्थ इत्यादी वेळोवेळी मला खिलवून मायेने वागवीत. 'द्रौपदी' नाटकातील भीमाची भूमिका करताना मला बापूंचा हा खुराक अतिशय उपयोगी पडला.'"

साहित्य संघाची पंचाहत्तरी होत असताना, आता मी साठी ओलांडली आहे. पण आजही ते दिवस आठवले की असं वाटतं की आपण परत तितकं लहान व्हावं आणि ते दिवस कधी संपूच नयेत. या ७५

वर्षाच्या काळात संघानं अनेक व्यक्तीरेखा घडवल्या, अनेक देखण्या नाट्यकृतींना जन्म दिला, ज्या रंगभूमीच्या इतिहासांत मैलाचे दगड ठरतील. अनेक ख्यातनाम लेखक, दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्री, तंत्रज्ञ, नेपथ्यकार रंगभूमीला दिले.

या संदर्भात मच्छिंद्र कांबळी (बाबूजी) या नावाचा आवर्जून उल्लेख न केल्यास वास्तवाशी प्रतारणा होईल. संघातील एक सामान्य पण मेहनती रंगमंच कामगार संघाच्या संस्कारांत आणि स्वत:च्या मेहनतीने एक गुणी नट झाला की ज्याने रंगभूमीवर, विशेषत: मालवणी नाट्यप्रकारांत व लोकनाट्यांत आपली एक विशेष ओळख निर्माण केली. एका वर्षभराच्या नोकरीनंतर बाबुजींनी संघाच्या 'अजब न्याय वर्तुळाचा' या नाटकात प्रथम भूमिका केली. जिद्दीवर व अपार मेहेनतीवर हा माणूस नाट्यसृष्टीत एक नामांकित व यशस्वी निर्माता झाला, याचा साहित्य संघालाही यथार्थ अभिमान आहे. पुढे व्यवसायामुळे बाबूजी जरी संघापासून शरीराने दूर झाले तरी मनाने सदैव संघाबरोबरच होते. मृत्युपूर्वी काही दिवस मच्छिंद्र संघात आले होते ते नियामक मंडळाच्या सभेला संघाचे उपाध्यक्ष या नात्याने. संघाच्या संस्कारात एका रंगमंच कामगाराचा उपाध्यक्ष झाला, ही संघासाठी साभिमानाची बाब आहे. संघसंस्कृतीत योग्यते व क्षमतेप्रमाणेच 'पद' प्राप्त होतं याची या घटनेमुळे पुष्टी मिळते. संघसंस्कृतीत अनेकांचा व्यक्तित्वविकास झाला याचे हे उत्तम उदाहरण आहे.

त्याचप्रमाणे गोविंदराव पटवर्धन (ऑर्गन), दामुअण्णा पार्सेकर (तबला) आणि सब्बीर हुसेन (सारंगी) यांच्यासारखे पट्टीचे वादक जनताजनार्दनाच्या समोर पेश केले. ज्या कलाकारांना त्यांची साथ लाभली व ज्या प्रेक्षकांनी ती ऐकली त्यांना 'नादब्रह्माची' अनुभूती खचितच झाली असेल, त्या श्रोत्यांपैकी मीही एक आहे. लिखाणात काही चुका झाल्या असल्यास दोष माझा आहे व त्याबद्दल आपल्याकडून संघाचे आप्त म्हणून माफीची नम्र अपेक्षा आहे. अशा साहित्य संघाच्या चौथ्या पिढीचा मी एक संघसेवक.

माझे वडील कै. दाजी भाटवडेकर व माझ्या मातोश्री चारुशीला भाटवडेकर यांच्या वतीने वाहिलेली ही एक मनाच्या स्मृतिसागरातील सुगंधी स्मृतींची ओंजळ!

# संघ नाट्यशाखा
# इतर कार्यक्रम

★ १९९५ नेहरू सेंटर-बहुभाषिक सांस्कृतिक कार्यक्रम 'मंगळागौर'
अ. ना. भारतीतर्फे सर्व कार्यक्रमाच्या आखणीसाठी संघाचे सहकार्य.

★ १९९६ 'विद्याधर गौरव' - विद्याधर गोखले यांच्या नाटकांवर आधारित कार्यक्रम.
सादरकर्ते : जयंत सावरकर
निवेदन लेखन : शि. मो. घैसास

★ १९९७ जळगाव येथील स्पर्धेत 'झुंझारराव एकांक' अनेक पारितोषिकांचा बहुमान -
बालगंधर्व पुण्यतिथी सहकार्य ट्रिनिटी क्लब
नाट्यसंगीत-नीलाक्षी जुवेकर, अरविंद पिळगावकर

★ १९९७ अण्णा मार्तंड जोशी स्मृतिदिन 'नाट्यप्रवेश वाचन'
सूत्रसंचालन : प्रदीप भिडे
निवेदन : वासंती वर्तक
सहभाग : नाट्य कलाकार
प्रमुख पाहुण्या : शिरीष पै

★ १९९८ आचार्य अत्रे जन्मशताब्दी निमित्त 'लग्नाची बेडी'
'साष्टांग नमस्कार', 'मी मंत्री झालो', 'पाणिग्रहण', नाटकांतील प्रवेश.

★ १९९८ आचार्य अत्रे जन्मशताब्दि : विविध कार्यक्रम
नाट्यप्रवेश : नाट्यसंगीत, विनोदगीते, नाट्यवाचन,
निवेदन लेखन : शिरीष पै
सहकार्य : महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक विभाग
रंगभूमी दिन

★ २००१ 'साभिनय नाट्यप्रवेश' संकल्पना
लेखन : अरविंद पिळगावकर 'भागवत मेळा' (५०० वर्षांची परंपरा)
या नाटकावर चर्चा
सहभाग : अशोक रानडे, वसुंधरा पेंडसे-नाईक, इंदू रामन,
तंजावरी भागवत मेळा, शाकुंतल
सादरकर्ते : रंगश्री ट्रस्ट

# अमृत नाट्य भारती

साहित्य संघाचे संस्थापक, संवर्धक मराठी रंगभूमीला संजीवनी देणारे, डॉ. अ. ना. भालेराव यांची स्मृती जागती ठेवण्यासाठी, साहित्य संघाने 'अमृत नाट्यभारती' हा विभाग चालू केला. प्रायोगिक व हौशी रंगभूमीला प्रोत्साहन देत हा विभाग, गेली अनेक वर्षे कार्यरत आहे.

कमलाकर सोनटक्के, वामन केंद्रे, जयदेव हट्टंगडी, माधव खाडिलकर, यांच्या नेतृत्वाने घेतलेले नाट्यशिक्षण वर्ग, शिवदास घोडके यानी घेतलेली बालनाट्यशिबिरे, अ. ना. भारतीतर्फे, केलेल्या अनेक एकांकिका, नाट्यस्पर्धातून भाग घेऊन मिळविलेली अनेक पारितोषिके, साभिनय नाट्यसंगीत शिबिरांतून, नाट्यसंगीताला दिली गेलेली नवशक्ती, हे अमृत नाट्य भारतीचे कार्य रंगभूमीसाठी उत्साह देणारे आहे. यापुढे प्रतिवर्षी हे कार्य असेच चालू राहणार आहे.

**अमृत नाट्य भारतीने केलेल्या एकांकिका**

| इ. सन | नाव | लेखन | दिग्दर्शक |
|---|---|---|---|
| १९९६ | ग.म.भ.न. | - | - |
| १९९७ | तो बुद्ध हवा पण | - | कौस्तुभ सावरकर |
| १९९८ | अघटित | माधुरी भिडे | यशवंत भिडे |
| १९९८ | अगम्य | श्रीधर मुदलियार | श्रीधर मुदलियार |
| १९९८ | व्यंकूची शिकवणी | द.मा.मिरासदार | प्रकाश भागवत |
| १९९९ | जाव | नितीन मतकरी | नितीन मतकरी |
| १९९९ | आरंभ | सतीश जोशी | विलास म्हामणकर |
| १९९७ | मोलकरीण येता घरा | - | यशवंत भिडे |
| १९९७ | सुपारी | - | विलास म्हामणकर |
| १९९९ | तंद्री | सचिन मोटे | नितीन दीक्षित |

## इतर कार्यक्रम - अमृत नाट्य भारती

| | |
|---|---|
| ★ गडकरी दर्शन (१९९९) | एकच प्याला, प्रेमसंन्यास,भावबंधन, पुण्यप्रभाव, राजसंन्यास नाटकांतील प्रवेश |
| ★ अत्रेदर्शन (१९९९) | नाट्यप्रवेश, नाट्यवाचन, नाट्यगीते, विडंबन गीते<br>संकल्पना : जयंत सावरकर<br>एक दिवस अचानक (१९९९), सादरकर्ते :अशोक साठे<br>१२ एकांकिका (१९९९) प्रत्येक दिवशी दोन ( सहा दिवस)<br>सादरकर्ते : मुंबई विद्यापीठ, बहि:शाला शिक्षणविभाग<br>अमृत सिद्धी, व. शां. देसाई लिखित (१९९९)<br>दिग्दर्शक : पद्माकर देव, सादरकर्ते : श्रुतिमंदिर, सोलापूर<br>हौशी कलावंत मेळावा (१९९९) उद्घाटक : आत्माराम भेंडे<br>प्रमुख पाहुणे : मच्छिंद्र कांबळी<br>कार्यक्रम : नाट्यप्रयोग : 'जीवन त्यांना कळले हो'<br>सादरकर्ते : मुंबई विद्यापीठ, नाट्यविभाग<br>नाट्यप्रयोग : 'सुवर्णतुला'. सादरकर्ते : रंगशारदा |
| ★ **उस्फूर्त एकांकिका स्पर्धा (हौशी रंगमंच)** | तीन एकांकिका<br>सादरकर्ते : अविष्कार, अमृतनाट्य भारती (मुंबई विद्यापीठ)<br>चर्चा: विषय-'हौशी, प्रयोगिक रंगभूमीची स्थिती खालावली आहे'<br>सहभाग : रमेश चौधरी, अनिल सोनार, मुग्धा कर्णिक<br>समारोप - स्नेहलता देशमुख |
| ★ २००४ **अभिनय प्रशिक्षण शिबिर (लहान मुलांसाठी)** | शिक्षक : शिवदास घोडके, सहभाग : २१ विद्यार्थी<br>समारोप : प्रमुख पाहुणे : वामन केंद्रे<br>कार्यक्रम : नाटक-कमाल देशात, झाली धमाल |
| ★ २००५ **अभिनय प्रशिक्षण शिबिर (लहान मुलांसाठी)** | शिक्षक : शिवदास घोडके, सहभाग : २५ विद्यार्थी<br>समारोप : प्रमुख पाहुणे : प्रल्हाद जाधव<br>कार्यक्रम : नाटक : अंधेर नगरी |
| ★ २००६ **अभिनय प्रशिक्षण शिबिर (लहान मुलांसाठी)** | शिक्षक : शिवदास घोडके, सहभाग : २१ विद्यार्थी<br>समारोप : प्रमुख पाहुणे : प्रमोद पवार<br>कार्यक्रम : नाटक : गोष्ट गोधराजची |

| | |
|---|---|
| ★ २००६ **अभिनय प्रशिक्षण शिबिर** | शिक्षक : पं. सत्यदेव दुबे,<br>सहभाग : सत्तावन्न विद्यार्थी, वय वर्षे १८ ते ५० |
| ★ २००७(लहान मुले) **अभिनय प्रशिक्षण शिबिर** | शिक्षक : शिवदास घोडके,<br>सहभाग : २१ विद्यार्थी<br>समारोप : प्रमुख पाहुणे : वामन केंद्रे |
| ★ **अभिनय प्रशिक्षण शिबिर** | शिक्षक : पं. सत्यदेव दुबे,<br>सहभाग : ४१ विद्यार्थी, वय वर्षे १८वरील |

## अमृतकुंभ स्पर्धा

साहित्य संघाचे संस्थापक, संवर्धक, आदर्श कार्यकर्ते कै. डॉ. अ. ना. भालेराव यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने **अमृतकुंभ** ही तरुण हौशी कलावकारांसाठी अभिनय स्पर्धा, प्रतिवर्षी होऊ लागली.

## प्रायोगिक हौशी रंगभूमीला प्रोत्साहन

मुंबई मराठी साहित्य संघ नाट्यशाखेने अनेक प्रायोगिक नाटके केली असून, साहित्य संघ हौशी प्रायोगिक रंगभूमीला सतत सहकार्य देत असतो. या कल्पनेतून केलेले कार्यक्रम - **रंगसंग उपक्रम**

# मुंबई मराठी साहित्य संघ नाट्यशाखेने केलेले नाट्यप्रयोग

| नाटक | लेखन | सन |
|---|---|---|
| मायाविवाह (नवीन) | श्री. कृ. कोल्हटकर | १९३८ |
| आठवणींचे खंदक | डॉ. टेंबे | १९३९, १९४३ |
| भिडस्त माणूस (नवीन) | श्यामराव ओक | १९३९ |
| घरकुल (नवीन) | अनंत काणेकर | १९४१ |
| बुवा | भेंडे | १९४१ |
| उडती पाखरे (नवीन) | मामा वरेरकर | १९४१ |
| अरे बाबा जाहिरात (नवीन) | चिं. वि. जोगळेकर | १९४२, १९५५ |
| बांदवलीच्या मास्तरणी | अनंत काणेकर | १९४३ |
| कारकून | दिवाकर (गर्गे) | १९४३ |
| आजोबांच्या मुली (नवीन) | माधव मनोहर | १९४३ |
| गुणाची पोर (नवीन) | कृष्णाभाई मोटे | १९४४ |
| जन्माचे सोबती (नवीन) | व्यंकटेश वकील | १९४४ |
| ते वेगळे जग (नाटिका) | व्यंकटेश वकील | १९४४ |
| सारस्वत | मामा वरेरकर | १९४४ |
| सत्तेचे गुलाम | मामा वरेरकर | १९४४ |
| भाऊबंदकी | कृ. प्र. खाडिलकर | १९४४, १९४९ |
| स्वयंवर | कृ. प्र. खाडिलकर | १९४४, १९५१ |
| उद्याचा संसार | आचार्य प्र.के. अत्रे | १९४४ |
| सौभद्र | अण्णासाहेब किर्लोस्कर | १९४४, १९५०, १९५१ |
| हुंडाप्रवेश | त्रिलोकेकर | १९४४ |
| वेड्याचा बाजार | राम गणेश गडकरी | १९४४ |
| शारदा | गो. ब. देवल | १९४४, १९४७ |
| शकुंतला स्वप्न-संगीतिका (नवीन) | प्र. ग. गुप्ते | १९४४ |
| घोर अपघात (नवीन) | विमादि पटवर्धन | १९४४ |
| परत या (नवीन) | सु. भु. मानकर | १९४५ |
| विकार विलसित (हॅम्लेट) | गो. ग. आगरकर | १९४५ |
| धरणीधर (नवीन) | मामा वरेरकर | १९४६ |

| नाटक | लेखन | सन |
|---|---|---|
| संशयकल्लोळ | गो. ब. देवल | १९४६, १९४९ |
| त्राटिका | वासुदेवराव केळकर | १९४६, १९५० |
| विद्याहरण | कृ. प्र. खाडिलकर | १९४६, १९५०, १९५१ |
| कांचनगडाची मोहना | कृ. प्र. खाडिलकर | १९४६ |
| मानापमान | कृ. प्र. खाडिलकर | १९४६, १९४९ |
| सवाई माधवरावांचा मृत्यु | कृ. प्र. खाडिलकर | १९४६ |
| एकच प्याला | राम गणेश गडकरी | १९४६, १९४८, १९४९ |
| दूरचे दिवे (नवीन) | वि. वा. शिरवाडकर | १९४६, १९५१ |
| दुसरा पेशवा (नवीन) | वि. वा. शिरवाडकर | १९४७ |
| कुंपणावरून (नवीन छायानाट्य) | श्री. बा. रानडे | १९४७ |
| प्रेमसंन्यास | राम गणेश गडकरी | १९४७ |
| मृच्छकटिक | गो. ब. देवल | १९४७, १९४९, १९५५ |
| योगायोग (नवीन मुलांचे) | शैलजादेवी पंत | १९४७ |
| साष्टांग नमस्कार | आचार्य प्र.के. अत्रे | १९४७ |
| शिवशंभव | वासुदेवशास्त्री खरे | १९४७ |
| पारध (नवीन) | मालती बेडेकर | १९४७ |
| वधुपरीक्षा | श्री. कृ. कोल्हटकर | १९४७, १९५६ |
| म्युनिसिपालटी | माधवराव जोशी | १९४७, १९५२ |
| शाकुंतल | अण्णासाहेब किर्लोस्कर | १९४८, १९४९ |
| सशाची शिंगे | माधव मनोहर | १९४८, १९४९ |
| कृष्णार्जुन युध्द | न. चिं. केळकर | १९४९ |
| उदार उसनवार | माधवराव जोशी | १९४९ |
| कीचकवध | कृ. प्र. खाडिलकर | १९४९ |
| एकच गाठ (नवीन) | सुधा साठे | १९४९ |
| वंदे भारतम् | आचार्य प्र. के. अत्रे | १९५० |
| शोभेचा पंखा | वि. ह. कुलकर्णी | १९५० |
| मूकनायक | श्री. कृ. कोल्हटकर | १९५० |
| विचित्रलीला | शं. प. जोशी | १९५० |
| खडाष्टक | शं. प. जोशी | १९५१, १९५३, १९५५ |
| वैजयंती (नवीन) | वि. वा. शिरवाडकर | १९५० |
| लग्नाची बेडी | आचार्य प्र. के. अत्रे | १९५१, १९५३ |

| नाटक | लेखन | सन |
|---|---|---|
| कवडीचुंबक (नवीन) | आचार्य प्र. के. अत्रे | १९५१ |
| तुकाराम | बाबाजीराव राणे | १९५१ |
| प्रेमशोधन | श्री. कृ. कोल्हटकर | १९५१ |
| आंधळ्यांची शाळा | श्री. वि. वर्तक | १९५१ |
| बेबंदशाही | विष्णूपंत औंधकर | १९५१, १९५८, १९९३-९४ |
| पतंगाची दोरी | अनंत काणेकर | १९५१, १९५६ |
| अंमलदार | पु. ल. देशपांडे | १९५२, १९५५ |
| पुण्यप्रभाव | राम गणेश गडकरी | १९५२ |
| भाग्यवान (नवीन) | पु. ल. देशपांडे | १९५३ |
| अभिज्ञान शाकुंतलम् | अनंत काणेकर | १९५३ |
| कौंतेय (नवीन) | वि. वा. शिरवाडकर | १९५३ |
| कुंजविहारी | मामा वरेरकर | १९५३ |
| करीन ती पूर्व | मामा वरेरकर | १९५३ |
| संन्यासाचा संसार | मामा वरेरकर | १९५३ |
| महानंदा | वा. नि. आगटे | १९५४ |
| राजमुकुट (नवीन) | वि. वा. शिरवाडकर | १९५४ |
| घराबाहेर | आचार्य प्र. के. अत्रे | १९५४ |
| शेक्सपीयर मीड समर नाईट ड्रीम | स. ह. शुक्ल | १९५४ (इंग्रजी प्रवेश) |
| ऑथेल्लो | स. ह. शुक्ल | १९५४ (इंग्रजी प्रवेश) |
| होनाजी बाळा (नवीन) | चिं. य. मराठे | १९५४, १९५५ |
| ब्रह्मचारी यक्ष | वसंत माने | १९५४ |
| पृथ्वीचे स्वयंवर (संगीतिका) | कुमुदिनी रांगणेकर | १९५४ |
| कोणे एके काळी | मो. ग. रांगणेकर | १९५४ |
| झुंज (नवीन) | अनंत काणेकर | १९५४ |
| रहस्य आणि तरुणी | गंगाधर गाडगीळ | १९५४ |
| सौभद्र | अण्णासाहेब किर्लोस्कर | १९५४, १९५५ |
| मीराबाई | स. ह. शुक्ल | १९५४ |
| शापसंभ्रम | गो. ब. देवल | १९५४ |
| भावबंधन | राम गणेश गडकरी | १९५५ |
| झुंझारराव | गो. ब. देवल | १९५५ |
| विक्रमोर्वशीय | गो. ब. देवल | १९५५ |

| नाटक | लेखन | सन |
|---|---|---|
| दुर्गा | गो. ब. देवल | १९५५ |
| लोकांचा राजा | चिं. य. मराठे | १९५६, १९७८ |
| छापील संसार | शं. गो. साठे | १९५६ |
| द्रौपदी | कृ. प्र. खाडिलकर | १९५६, १९७२ |
| उत्तररामचरितम्(संस्कृत) | भवभूति | १९५६, १९५९, १९७८ |
| तुझे आहे तुजपाशी | पु. ल. देशपांडे | १९५७, १९५८, १९८२ |
| दुरितांचे तिमिर जावो | बाळ कोल्हटकर | १९५७ |
| सत्वपरीक्षा | कृ. प्र. खाडिलकर | १९५७ |
| रणरागिणी | शा. गो. गुप्ते | १९५७ |
| ललित | नाना गवंडे (संग्राहक) | १९५७ |
| माणूस नावाचे बेट | विजय तेंडूलकर | १९५७ |
| जगन्नाथाचा रथ | गो. नि. दांडेकर | १९५७ |
| सुंदर मी होणार | पु. ल. देशपांडे | १९५७, १९७४ |
| छोटे मासे मोठे मासे | पु. ल. देशपांडे (एकांकिका) | १९५७ |
| सारं कसं शांत शांत | पु. ल. देशपांडे | १९५७ |
| सदू आणि दादू | पु. ल. देशपांडे | १९५७ |
| वयं मोठं खोटंम् | पु. ल. देशपांडे | १९५७ |
| हे हे हर्ररम् उर्फ कोल्होबाचे लग्न | वसंत माने | १९५७ |
| कृष्णलीला | वसंत माने | १९५७ |
| गृहदाह | गो. के. भट | १९५८ |
| मधुमंजिरी | रत्नाकर मतकरी | १९५८ |
| आग्राहून सुटका | विष्णुपंत औंधकर | १९५८ |
| निशिकांताची नवरी | अनंत काणेकर | १९५८ |
| गड्या आपुला गाव बरा | शामराव ओक | १९५९ |
| जादूचा वेल | सुधा करमरकर | १९५९ |
| पत्थर का देवता | कमलाकर दाते | १९५९ |
| वच्चू लछमन | कुमुदिनी रांगणेकर | १९५९ |
| सत्याग्रही | स. ह. शुक्ल | १९५९ |
| चौऱ्यांशीचा फेरा | वसंत माने | १९६२ |
| उग्रमंगल | वासुदेवशास्त्री खरे | १९६२ |
| तीन अंकी हॅम्लेट | नाना जोग | १९६३ |

| नाटक | लेखन | सन |
|---|---|---|
| ऑथेल्लो | वि. वा. शिरवाडकर | १९६३ |
| राजयाचा पुत्र अपराधी देखा | द. ग. गोडसे | १९६४ |
| सरी ग सरी | विजय तेंडुलकर | १९६४ |
| पराजिता मी | शरश्चंद्र गुणे | १९६५, १९६६ |
| सगेसोयरे | चिं. त्र्यं. खानोलकर | १९६६ |
| शतानिक | यशवंत रांजणकर | १९६६ |
| नाटककाराच्या शोधात सहा पात्रे | माधव वाटवे | १९६८ |
| मेजर चंद्रकांत | वसंत सबनीस | १९६८ |
| साठा उत्तरांची कहाणी | केशव केळकर | १९६८ |
| पती गेले गं काठेवाडी | व्यंकटेश माडगूळकर | १९६८ |
| घेतलं शिंगावर | मनोहर काटदरे | १९७०, १९८८, १९८९ |
| वल्लभपूरची दंतकथा | केशव केळकर | १९७०, १९७१ |
| रातराणी | पद्माकर गोवईकर | १९७०, १९७१ |
| असा ही अश्वत्थामा | चिं. त्र्यं. खानोलकर | १९७२ |
| शोनार बांगला | श्री. ना. पेंडसे | १९७२ |
| बुध्दीवादी हरला | अशोकजी परांजपे | १९७३, १९७४ |
| नकटीच्या लग्नाला | यशवंत रांजणकर | १९७३, १९७४ |
| दर्यासागर | रमेश पवार | १९७४, १९७५ |
| अजब न्याय वर्तुळाचा | चिं. त्र्यं. खानोलकर | १९७४ |
| एक होती वाघीण | वि. वा. शिरवाडकर | १९७४ |
| मुद्राराक्षस | गो. के. भट | १९७५, १९७६ |
| ययती आणि देवयानी | वि. वा. शिरवाडकर | १९७६, १९८३, १९८५ |
| माझे जीवन गाणे | पद्माकर गोवईकर | १९७६, १९७७ |
| पैसाच पैसा | माधवराव जोशी | १९७७ |
| धाडिला राम तिने कां वनी | द. ग. गोडसे | १९७८, १९९२, १९९३ |
| पंडित आता तरी शहाणे व्हा | श्री. ना. पेंडसे | १९७८ |
| घरात हसरे तारे | रमेश कोटस्थाने | १९७९ |
| मिठू मिठू पोपट | दिलीप चित्रे | १९८० |
| राज्यारोहण | य. ना. टिपणीस | १९८०, १९८१ |
| टिळक आणि आगरकर | विश्राम बेडेकर | १९८२ |
| स्वयंवर | कृ.प्र. खाडिलकर | १९८३, १९८४ |

| नाटक | लेखन | सन |
|---|---|---|
| रवीराज तो मी रोहिणी | पुरुषोत्तम दारव्हेकर | १९८४ |
| वाजे पाऊल आपुले | विश्राम बेडेकर | १९८६, १९८७ |
| संगीत कान्होपात्रा | ना. वि. कुलकर्णी | १९८७, १९८८ |
| काय घडलं त्या रात्री | राजा गावडे | १९८९, १९९१ |
| संगीत शतरंग | सुहासिनी मुळगावकर | १९९०, १९९१ |
| संगीत गीता गाती ज्ञानेश्वर | नानासाहेब शिरगोपीकर | १९९१ |
| बाप रे बाप | ज्योती म्हापसेकर | १९९४ |
| ब्लँक कॉल | वीरेंद्र प्रधान | १९९४ |
| सह्याद्रीची हाक | सुमतीदेवी धनवटे | १९९५ |
| राधाकृष्ण | अवधूतमहाराज लिमये | १९९५ |
| हे वयच असं असतं | वीरेंद्र प्रधान | १९९५ |
| नमन नटवरा | वि. मु. शेगई | १९९९ |
| सौजन्याची ऐशी तैशी | वसंत सबनीस | २००० |
| अमृत नाट्य गाथा | माधव खाडिलकर | २००२ |
| लेक लाडकी | रत्नाकर मतकरी | २००२ |
| थोडी ओली पाने | डॉ. चंद्रशेखर फणसळकर | २००२, २००३ |
| धन्य ते गानी कळा | गोपाळ कृष्ण भोबे | २००५ |
| संन्यस्त खड्ग | वि. दा. सावरकर | २००५, २००६ |
| धन्य ती प्रेम गाथा | मनोहर सोमण | २००६ |
| संत गोरा कुंभार | अशोकजी परांजपे | २००७ |

# मुंबई मराठी साहित्यसंघ

## व्यवस्थापन



## संघमंदिर व्यवस्था समिती : मुंबई मराठी साहित्य संघाचा कणा

- यशवंत पंडित

मुंबई मराठी साहित्य संघाने यावर्षी अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे.

साहित्य संघाचे कार्य ३ विभागात चालते.

- ★ साहित्य शाखा
- ★ नाट्य शाखा
- ★ संघमंदिर व्यवस्था समिती

साहित्य संघ स्थापन झाल्यापासून साहित्य, नाट्यविषयक लक्षणीय कार्य सातत्याने चालू आहे. त्यावेळी सुध्दा व्यवस्थापन विभाग होता पण साहित्य संघ मंदिर उभे राहिल्यानंतर संघ मंदिर व्यवस्था समिती हा संघाचा प्रमुख कणा बनला. संघ मंदिर बांधतांना उत्पन्नाची बाब म्हणून संघमंदिरात डॉ. अ. ना. भालेराव नाट्यगृह यांचे व्यवस्थापन हे संघ मंदिर समितीचे महत्वाचे कार्य ठरले.

तेव्हापासून साहित्य संघ मंदिराची व्यवस्था समिती आपल्या परीने कार्यरत आहे. नेहमी नियामक मंडळाच्या निवडणूकीतून कार्यकारी मंडळ ही व नंतर त्यातून समिती नियुक्ती केली जाते. गेल्या कित्येक वर्षात संघ मंदिर व्यवस्था समितीची निवडणूक किमान ८-१० वेळा झाली आहे. प्रत्येक वेळी जुने व नवे सभासद या समितीत घेतले जातात. या समितीच्या कामांची जबाबदारी समितीच्या कार्यवाहांकडे प्रामुख्याने राहते.

या समितीचे कार्यवाह म्हणून भार्गवराम पांगे, शिवा चिखलीकर, बापूराव नाईक, शं. ना. अंधटकर, डॉ. बाळ भालेराव, सुधाकर भानुशे, दिलीप भाटवडेकर, यशवंत पंडित, सुभाष भागवत, अशा अनेक व्यक्तींनी आपल्या नेतृत्वाखाली संघमंदिर व्यवस्था समितीची कामे पूर्ण केली.

प्रारंभीच्या कालामध्ये साहित्य संघात नाट्यप्रयोग मोठ्या प्रमाणावर होत असत. त्यामुळे एक उत्पन्नाची बाजू म्हणून हे उत्पन्न प्रभावी ठरले. या उत्पन्नातून नाट्याशाखा, साहित्य शाखा यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळाले. आता कालप्रवाह बदलामुळे डॉ. भालेराव नाट्यगृहातील प्रयोगांची संख्या घटली. व्यवस्थापन खर्च मात्र वाढत्या महागाईमुळे वाढत गेला. हे सर्व अडथळे पहाता व्यवस्था समितीचे काम अधिक जिकीरीचे झाले. तरी सुध्दा व्यवस्थापन समितीच्या कामामुळे संघमंदिर आणि डॉ. भालेराव नाट्यगृह दिमाखात उभे आहे. संघमंदिर व्यवस्था समितीच्या कार्याचा पसारा नजरेत भरणारा नसला तरी महत्वाचा आहे. अशा या व्यवस्थापन समितीच्या कक्षेत अनेक कामे येतात, ती पूर्ण होण्यासाठी अनेकांचे सहकार्य घ्यावे लागते.

**कामांची यादी**

- ★ डॉ. अ. ना. भालेराव नाट्यगृह व संघमंदिर इमारतीमधील जागा व नाटकांचे नेपथ्य सांभाळणे व भाड्याने देणे
- ★ महाराष्ट्र शासन व महानगर पालिका यांची वास्तुसंदर्भातील सर्व कामे करणे
- ★ सर्व परवान्यांचे नूतनीकरण करणे व करभरणा व्यवहार पूर्ण करणे
- ★ संघमंदिर व नाट्यगृह यांतील आवश्यक दुरूस्त्या, परवाने, करभरणा व्यवहार, वास्तू आणि मालमत्ता यांचे संरक्षण करणे
- ★ नूतनीकरण, शैक्षणिक वर्गांचा आर्थिक व्यवहार सांभाळणे
- ★ वास्तुमधील उपहारगृह व्यवस्था, जल आणि विद्युत व्यवस्था सांभाळणे, प्रसाधनगृह व्यवस्था, साफसफाई, रंग रंगोटी व्यवस्था, इत्यादी कामे
- ★ संघ मंदिरात नाट्यगृह यांतील वातानुकूलन व वीज व्यवस्था यांची दुरुस्ती व नूतनीकरण यांच्या बाबतीत देखभाल करणे
- ★ संघमंदिराची कर्मचारी सेवा व संरक्षणसेवा त्यांच्या अर्थव्यवहारासह सांभाळणे, इ. सर्व कामे
- ★ अशा प्रकारची अशी विविध तऱ्हेची कामे लक्षपूर्वक केली नाहीत तर संस्थेच्या कार्याचा व्याप सुरळीत चालणार नाही. अलीकडच्या काळात डॉ. बाळ भालेराव, यशवंत पंडित, आशा मुळगावकर, सुभाष भागवत, राजेंद्र गोळे, दिलीप भाटवडेकर, आर्किटेक्ट मराठे कुलकर्णी, सॉलीसीटर श्रीमती विजया दिवेकर या व्यक्तींचे समितीला आत्मीयतेचे सहकार्य मिळते.

साहित्य संघ अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असतांना व्यवस्था समिती समोर एक मोठा प्रश्न उभा राहिला. संघ मंदिर बांधून अनेक वर्षे झाल्यामुळे त्यामधील जुन्या सुविधांचे नूतनीकरण करणे अतिशय आवश्यक होते. अनेक सुहृदांच्या सहकार्यामुळे महाराष्ट्र शासनाकडून संघ मंदिर व्यवस्था समितीला १ कोटी रुपयांचे अनुदान मिळाले. या अनुदानातून संघाच्या अमृत महोत्सवी वर्षात संघ इमारत आणि डॉ. भालेराव नाट्यगृह अतिशय देखण्या रूपात उभे केले गेले आहे. ही घटना अमृत महोत्सवी वर्षाचा शुभारंभ म्हणावा लागेल. या अनुदानातून व्यवस्था समितीने पुढील कार्यवाही केली.

**मुंबई मराठी साहित्य संघ संस्थेच्या वास्तुच्या नूतनीकरणाचा अहवाल**

- ★ नूतनी करण्याच्या कामाला नाट्यगृहाच्या दुरुस्ती अंतर्गत व फेरफाराच्या कामाने प्रारंभ झाला. नाट्यगृहाच्या प्रेक्षागृहावरील छपराचे पत्रे अनेक ठिकाणी तुटले होते त्यावर परदेशी बनावटीचे आकर्षक व मजबूत आच्छादन घालण्यात आले.

* रंगमंचाच्या वरील भागातील ५० फूट उंचीवरील काँक्रीट स्लॅबच्या आतील लोखंडी सळ्या गंजल्यामुळे त्यांना गंजनिरोधक रसायन लावून संपूर्ण सडलेल्या सळ्यांच्या बदल्यात नव्या सळ्या घालून व आवश्यक ठिकाणी अधिक सळ्या घालून इपॉक्सीच्या माध्यमातून प्लॅस्टर करण्यात आले.
* रंगमंचावरील व पहिल्या मजल्यावरील कलावंतांच्या पुरुष आणि महिला प्रसाधनगृहांचे संपूर्ण नूतनीकरण व सुशोभीकरण करण्यात आले व त्यांचे क्षेत्रफळही वाढविण्यात आले. महिला कलावंतांसाठी नवीन प्रसाधनगृह बांधण्यात आले.
* पहिल्या मजल्यावरील शैक्षणिक वर्गासाठी वापरण्यात येणाऱ्या खोल्यांची संपूर्णपणे संरचनात्मक दुरूस्ती खिडक्यांना संगमरवरी फ्रेम्स् व काचेच्या सरकत्या झडपा लावून भिंतींना रंगरंगोटी करण्यात आली.
* रंगमंचावर ५० फुट उंचीवर असलेल्या गच्चीचे मुख्य प्रवेशद्वारावरील कॅनपी व इतर छज्जांवर वॉटर प्रुफींग करण्यात आले.
* प्रेक्षागृहाच्या उजव्या बाजूला असलेल्या महिलांच्या प्रसाधनगृहाचे पायापासून छपरापर्यंत संपूर्ण नूतनीकरण करण्यात आले. नव्या प्रसाधनगृहात जाण्यासाठी महिलांना आता पायऱ्यांची चढउतार न करता प्रेक्षागृहातून परस्पर प्रसाधनगृहात जाता येते. प्रसाधनगृहातील विविध रचना आधुनिक पध्दतीने करण्यात आल्या असून नवीन रॅंप लावून अपंग प्रेक्षकांची सोय करण्यात आली आहे. त्याचा उपयोग निर्गमनासाठीही होऊ शकतो.
* प्रेक्षकगृहातील पुरुषांसाठी असलेल्या तळमजल्यावरील व १ ल्या मजल्यावरील प्रसाधनगृहाचे आधुनिक पध्दतीने नूतनीकरण करण्यात आले.
* लिफ्टच्या बाजूच्या जिन्याच्या भागाला तळमजल्यापासून ५ व्या मजल्यापर्यंत रंगरंगोटी करण्यात आली.
* प्रेक्षागृहात व रंगमंचावर एअर कडिंशनींग पध्दतीत नवीन डॅक्टींग लावून त्यावर नवीन पी.ओ.पी. आवरण आणि त्यावर आकर्षक नक्षीकाम व रंगरंगोटी करण्यात आली व तळमजल्यांवरील आसनांचे नूतनीकरण करण्यात आले.
* प्रेक्षकगृहातील, भिंतींची फॉलसिलींगची, संपूर्ण दुरूस्ती आणि नवीन रंगरंगोटी करण्यात आली.
* इमारतीच्या दर्शनी बाह्य भागाची आवश्यक ती विविध दुरुस्ती करण्यात येऊन सुशोभिकरण करण्यात आले. हे करताना अनावश्यक भाग काढून टाकून आकर्षक रंगरंगोटी करण्यात आली.
* नाट्यगृह व्यवस्थापक कार्यालयाची व त्याच्या आजूबाजूच्या भागाची दुरूस्ती व रंगरंगोटी

करण्यात आली. तसेच दर्शनी भागाच्या कंपाऊंड वॉलचे नूतनीकरण करण्यात येऊन त्यावर आकर्षक पध्दतीचे एम. एस. रेलींग लावण्यात आले.

इमारतीच्या पुढील मोकळ्या जागी कॉंक्रीटींग करून त्यावर आकर्षक फरश्या बसविण्यात आल्या तसेच इमारतीच्या बाह्यभागावर ''मुंबई मराठी साहित्य संघ'' असा फलक व त्याच्या बाजूला संघाचे बोध चिन्ह लावण्यात आले. सर्वात महत्वाची बाब म्हणजे मुंबई मराठी साहित्य संघाचे जनक कै. डॉ. अ. ना. भालेराव ह्याचा पहिल्या मजल्यावरील पुतळा भिंतीवर ग्रॅनाईटची आकर्षक रचना करून मुख्य प्रवेशद्वाराच्या बाजूला हलविण्यात आला.

★ वरील कामांच्या अंतर्गत संघमंदिरातील नाट्यगृहाबरोबर अन्य ठिकाणचे जरूर असलेले इलेक्ट्रिकल इनस्टॉलेशन बदलण्यात आले, तसेच आवश्यक तेथील इलेक्ट्रीकल फीटींग्ज बदलण्यात आली. काही ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे नवीन इलेक्ट्रीकल ऑपरेशनच्या व्यवस्था करण्यात आल्या तसेच, इमारतीच्या दर्शनी भागावर आवश्यकतेप्रमाणे प्रकाश झोताची व्यवस्था करण्यात आली.

अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री. भालचंद्र तथा अण्णा पेंढारकर यांनी मुंबई मराठी साहित्य संघाला देऊ केलेल्या ध्वनीमुद्रित साहित्याच्या डिजिटल रुपांतरिकरणाचा प्रकल्प सर्व पत्रव्यवहार व इतर गोष्टींचे सोपस्कार करून संघ मंदिर व्यवस्था समितीतर्फे हाती घेण्यात आला. याकरिता आवश्यक त्या सुविधा साहित्य संघाकडून पुरविण्यात आल्या असून संघाच्या स्वखर्चाने सर्व कामे सुरळीत सुरू आहे. आतापर्यंत अंदाजे २०० पेक्षा अधिक नाटके व विविध कार्यक्रम यांच्या डी. व्ही. डी. साहित्य संघाकडे जमा झाल्या आहेत.

एकूण प्रकल्पाबद्दल एवढेच नमूद करावेसे वाटते की या सर्व साहित्यामुळे मुंबई मराठी साहित्य संघाच्या साहित्य व नाट्य श्रीमंतीत लक्षणीय भर पडणार आहे. कारण त्यात अनेक जुन्या नामवंत नटमंडळींचे आवाज वगैरे गोष्टी समाविष्ट होणार आहेत.

नूतनीकरणाचे महत्वपूर्ण कार्य करीत असतांना, मराठे आणि कुलकर्णी (आर्किटेक्ट), श्री. गुरूनाथ दळवी (आर्किटेक्ट), श्री. विलास अवचट (आर्किटेक्ट), श्री. कापडी (एअरकाडींशनींग एक्सपर्ट व कन्सलटन्ट), श्री.अविनाश तांबे (स्ट्रक्चरल इंजीनिअर), श्री. मोहन पंडित (लायसन्सड इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर), श्री. दिलीप भाटवडेकर (जनरल सुपरवायजर) या सर्वांचे तसेच, डॉ. बाळ भालेराव, यशवंत पंडित आणि सौ. आशा मुळगावकर, सुभाष भागवत, रोहिदास पांगे व संघमंदिराचा सर्व कर्मचारी वर्ग यांचे महत्वाचे सहकार्य संघमंदिर व्यवस्था समितीला मिळाले. महाराष्ट्र शासनाकडून अधिक अनुदान मिळावे म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत. तसे घडले तर मधूर दुधास केशराची रूची व रंग यावा असे उत्साहवर्धक वातावरण निर्माण होईल. या अनुदानातून पुढील कार्य पूर्ण करण्याचे आमचे स्वप्न आहे.

**सरकारी अनुदानाच्या दुसऱ्या टप्प्यातून करावयाच्या कामाचा संक्षिप्त तपशील**

१. संघाच्या वास्तुच्या मागील व दोन्ही बाजूंच्या भिंतींमधील कॉंक्रीटच्या खांबांची व तुळ्यांची संरचनात्मक डागडुगी

२. वरील तिन्ही बाजूंचे प्लास्टर व भिंतींचे मजबुतीकरण व रंगरंगोटी

३. अस्तित्वात असलेल्या खिडक्यांचे नूतनीकरण व खिडक्यांवरील वेदर शेडस् टेरेसचे वॉटर प्रुफींग

४. दर्शनी भागातील खोल्यांची डागडुजी / दुरूस्ती व अंतर्गत प्लास्टरींग

५. गच्चीवरील कुलींग टॉवरचे नूतनीकरण

६. आपत्कालीन प्रसंगी आवश्यक असणारा जनरेटर

७. नाट्यगृहातील बाल्कनीमधील खुर्च्यांचे नूतनीकरण

८. लिफ्टचे नूतनीकरण

९. वॉटर हार्वेस्टिंग तरतूद योजना

१०. नाट्यगृहाच्या तळमजल्यावरील फॉयरचे सुशोभिकरण

११. जनरल इलेक्ट्रीफिकेशन

१२. वास्तुच्या दर्शनी भागाचे ए.सी.पी. (ॲल्युमिनियम कॉम्पॅक्ट पॅनल) च्या माध्यमातून करावयाचे सुशोभिकरण

१३. नाट्यगृहाच्या पहिल्या माळ्यावरील फॉयर चे सुशोभिकरण

१४. संघ कार्यालय, मॅनेजर रूम, व्ही.आय.पी.रूम, उर्वरित टॉयलेटस्‌ची दुरूस्ती व अंतर्गत सजावट

१५. रंगभूमीवरील नेपथ्य व पडद्यांचे नूतनीकरण

१६. नाट्यगृहात सुरक्षा यंत्रणेची तरतूद

१७. नाट्यगृहाची ध्वनी व विद्युत योजना नूतनीकरण

१८. अंतर्गत व बाह्य भागातील लँडस्केपींग

१९. विविध शाखेतील व्यवसायिक सल्याची फी / मानधन

२०. इतर किरकोळ खर्च व कॉटिजन्सीज

व्यवस्था समितीचे कार्य नमूद करताना मला अतिशय आनंद होत आहे कारण व्यवस्था समितीतील आत्मीयतेने परिश्रम घेणाऱ्या व्यक्ती लोकांसमोर कधीच येत नाहीत. पण हे पडद्यामागचे कार्यकर्ते, संघाच्या बहुविध कार्याला चालना देण्याचे महत्वपूर्ण काम करत असतात. संघाच्या इतर शाखांना त्यामधून आर्थिक सहकार्य मिळते. त्यामुळे मला असे वाटते की संघमंदिर व्यवस्था समिती हा साहित्य संघाच्या कार्याचा महत्वाचा कणा आहे.

# देणगीदार

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र शासन | रू. १ कोटी | संघमंदिर देखभाल व नूतनीकरण |
| महाराष्ट्र शासन | रू. ५ लाख | कर्ज फेडीसाठी |
| महाराष्ट्र शासन | रू. १५ लाख | संघ कार्यासाठी |
| महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक महामंडळ | वार्षिक ५ लाख | साहित्य शाखेसाठी |
| दि सारस्वत बँक | रू. ५० हजार ते १ लाख<br>रू. १० हजार | डॉ. आडारकर स्मृतीदिन<br>दरवर्षी संघ कार्यासाठी |
| य. गो. फडके चॅरीटेबल ट्रस्ट | रू. ५० हजार ते १.५ लाख | प्रासंगिक आर्थिक मदत |
| मुंबई महानगर पालिका | रू. १ लाख | दरवर्षी इ.स. १९५९-१९६६ पर्यंत |
| शरयू चंद्रगिरी | रू. ३ लाख<br>रू. १ लाख | विविध नूतनीकरणे आणि<br>साहित्य पारितोषिक निधी |
| अभिजित गजेंद्रगडकर | अंदाजे रू. ६० हजार | ग्रंथालय नूतनीकरणासाठी |
| अमर स्वयंसेवक मंडळ<br>असोसिएटेड व्हॉलेंटियर्स | — | दरवर्षी सातत्याने देणगी |
| डॉ. श्रीरंग आडारकर | अंदाजे रू. ५० लाखापर्यंत | साहित्य संघाला विविध<br>माध्यमातून आर्थिक सहकार्य |
| जयंतराव साळगावकर | — | संघकार्यातील विविध<br>कार्याकरिता प्रायोजकत्व<br>माध्यमातून मदत |
| बापूराव पेंढारकर स्मृती समिती | रू. २.५ लाख | – |
| श्रीमती बारवाले | रू. ५ लाख | डॉ. अ. ना. भालेराव<br>जन्मशताब्दिनिमित्त |

# आठवणी साहित्य संघाच्या



## गोष्ट छोटी, डोंगराएवढी

- सुहासिनी कीर्तिकर

मुंबई मराठी साहित्य संघाची यावर्षी (२००९) पंच्याहत्तरी चालू आहे. व्यक्तीची सत्तरी, पंच्याहत्तरी थाटात साजरी केली जाते. ही तर साहित्य, संस्कृती, समाज या परिघातली मुंबईतील महत्वाची संस्था. संस्थेचे वाढणे आलेखाच्या रूपात पाहिले तर ते निश्चितच आनंददायी, भविष्यवेधी, आशादायक आहे. व्यक्ती जन्मते, वाढते (जन्म, जरा) मरते ; मात्र संस्था जन्मल्यानंतर तिचे वाढणेच प्रेरणादायक ठरत जाते. तिला म्हातारपण नाही आणि मृत्युतर नाहीच नाही. संस्थेच्या छायेत व्यक्ती मोठ्या होत जातात, मोठ्या ठरतात आणि संस्थेला अमर करतात. मुंबई मराठी साहित्य संघ ही अशी मोठी मोठी होत गेलेली अमरसंस्था आहे, तिची ही मातृवत् छाया मलाही लाभली.

माझा साहित्य संघाशी संबंध कधी बरे जुळला ? आठवतंय्, त्या काळी परिषदेतर्फे होणाऱ्या वाङ्मयीन परीक्षांचे आयोजन साहित्य संघ करीत असे. मी १९६६ साली एम्. ए. झाले. लगेचच एलफिन्स्टन कॉलेजमध्ये रूजू झाले. तेव्हाचे प्राचार्य कवीवर्य पु. शि. रेगे हे वा. रा. ढवळेंचे मित्र. त्यांच्या सांगण्यावरून ६६ सालीच मी साहित्य संघात वाङ्मयीन परीक्षार्थींना शिकवू लागले. आज त्याला चार दशके उलटून गेली आहेत. पण तेव्हापासून जुळलेला ऋणानुबंध अधिकाधिक घट्ट होत गेलाय. डॉ. सरोजिनी वैद्य, अनंत काणेकर, डॉ. सरोजिनी शेंडे, केशव मेश्राम, रमेश तेंडुलकर, कुळकर्णी, हे या वर्गाचे माझे सहकारी होते. या सर्वांबरोबर मैत्र जोडणारे होते. वा. रा. ढवळे आणि त्यांना साथ होती डॉ. ग. ब. ग्रामोपाध्ये यांची. 'चांदरात' हा काणेकरांचा कवितासंग्रह या परीक्षार्थींना एकदा काणेकरांच्याच उपस्थितीत शिकविण्याचा विलक्षण आनंददायी अनुभवही याच संस्थेने मला दिला ! पुढे ग्रामोपाध्यांनी दादरच्या बालमोहन विद्यामंदिर या केंद्रात मला या वर्गांना शिकविण्याची विनंती केली. माझा आठवड्यातून एकदा दोनदा संघाशी येणारा थेट संबंध थोडासा खंडीत झाला. पण याच काळात, साधारण १९७२ साली असेल, दि. वि. तथा तात्या आमोणकरांनी सौंदर्यशास्त्रावर साधारण आठवडाभर दिवसभराचे चर्चासत्र आयोजित केले होते. डॉ. रा. भा. पाटणकर, डॉ. अशोक केळकर, प्रभाकर पाध्ये, डॉ. मिलिंद मालशे, श्री. पु. भागवत, यास्मिन शेख, डॉ. अशोक रानडे, डॉ. काशीबाई नातू आदींनी त्यात घेतलेला सहभाग लख्ख आठवतोय. त्यावर पुढे एक लेखसंग्रहही माझ्या आठवणीप्रमाणे प्रसिध्द झाला. तात्या आमोणकर तर मिळालेल्या प्रतिसादांनी खूश होऊन गेले होते. आम्हा काही तरूण मंडळींना ते म्हणाले होते, 'असेच येणार असाल तर तुमची इथे रहाण्याचीही मी व्यवस्था करेन'. डॉ. तारा भवाळकर, गंगाधर गाडगीळ, डॉ. स. गं. मालशे यांची ज्ञानवंत भाषणे ऐकण्याची संधी साहित्य संघानेच त्याकाळात दिली. उमेदीच्या वयात संघाने केलेला तो अमूल्य संस्कार होता. योग असा की, पुढे १९९३ साली. ल. ग. जोग स्मृतिव्याख्यानमालेत माझीच दोन व्याख्याने लागोपाठ दोन दिवस या साहित्य संघानं आयोजित केली होती. (पद्माताई घारपुरे त्यावेळी साहित्य शाखेच्या कार्यवाह होत्या.) 'साहित्य आस्वाद' वर्गात अरविंद गोखले आणि शाम महनोहरांवर मला स्वतंत्रपणे बोलण्याची संधी दिली गेली. (कुंदाताई पडळकर तेव्हा साहित्य शाखेच्या कार्यवाह होत्या.)

साहित्य संघाशी जुळलेली माझी नाळ माझं सासर गिरगावात असल्यानं अधिकच अतूट झाली. एकदा गिरगावातल्या बुक डेपोत अचानक वा. रा. ढवळे भेटले. चौकशी केली. त्यांनी मला घरी बोलावलं. वहिनीनी माझी ओटी भरली. त्या ओटीत साहित्य संघाचा सर्व प्रेमभाव भरलेला होता. पुढं 'साहित्य' मध्ये अधूनमधून लेखन, संपादन सहाय्यक म्हणून काम, प्रा. वि. श. चौघुलेंच्या जागी अमराठी भाषा वर्गांना शिकवणं, मल्हार ढगे बाजूला झाल्यावर या वर्गाची संचालक म्हणून काम पहाणं, साहित्य शाखेच्या सर्व उपक्रमात सहभागी होणं, आखणी नियोजन, सूत्रसंचालन कामात अडकत जाणं, विविध पातळींसह (महाविद्यालयीन, महानगर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आदी) संमेलतनात झोकून देणं, शि. मो. घैसास बाजूला झाल्यावर महामंडळावर साहित्य संघाची प्रतिनिधी म्हणून वावरणं, महामंडळ साहित्य संघाकडे आल्यावर महामंडळाची कार्यवाह म्हणून अनुभव घेणं, अशा अनेक सांस्कृतिक, साहित्यिक गोष्टींची या ओटीत भर पडत गेली.

आज मी साहित्य संघाच्या कार्यकारिणीवर सदस्य आहे. 'साहित्य' ची प्रमुख संपादिका आहे. अमराठी भाषा वर्गाची संचालिका आहे. महामंडळावर साहित्य संघाची प्रतिनिधी आहे. आवडीचे काम आणि साहित्य संघासारखी पुण्यभू कर्मभूमी यांची जोड असल्यामुळे पूर्ण समाधानी आहे. महामंडळाची कार्यवाह असताना वसुंधरा पेंडसे नाईक, निरंजन उजगरे आणि मी अशी टीम होती. साहित्य शाखेत काम करत असताना आता उषा तांबे, उज्ज्वला मेहेंदळे, चंद्रशेखर गोखले, इतर सदस्य आणि मी अशी अप्रतिम 'टीम' आहे. एकत्रितपणे संघभावनेने साहित्य संघात कार्यानंद लुटताना आजचे प्रमुख कार्यवाह डॉ. बाळ भालेराव यांचे मार्गदर्शन आणि साथ मिळते. डॉ. बाबा कलगुटकर कार्यवाह असतानाही ती होती. साहित्यिक गंगाधर गाडगीळ संघाध्यक्ष असताना त्यांचा साहित्यिक उपक्रमातील सल्ला आणि सहभाग मोलाचा होता. डॉ. दाजी भाटवडेकर नाट्यशाखेत जास्त रस घेणारे असले तरी संघाध्यक्ष म्हणून त्यांनी देखील 'साहित्य शाखेच्या' उपक्रमात सहभाग घेतला होता. विद्यमान अध्यक्ष जयंत साळगावकर यांनी तर साहित्य शाखेची अमृत व्याख्यानमालाच सुरू करून नवीन उपक्रम केला आहे. गाडगीळांनी सुरू केलेला 'साहित्याच्या प्रांगणात', 'विचारसंवाद' सारखा उपक्रमही असाच आम्हा कार्यकर्त्यांचे शिक्षण करणारा होता.

मुंबई मराठी साहित्य संघ कार्यकर्ते घडवतो, माणसे जोडतो. ज्यांना काही करायचे आहे त्यांना शिक्षण देतो, संदर्भ वाचनालय चालवून ज्ञानाची पाणपोई उघडतो. 'जे दिव्य भव्य ते मज मोह घाली' ही त्याची वृत्ती आहे आणि आम्हा सगळ्यांचीच तो संजीवनी आहे.

पूर्वी दक्षिण मुंबईला जायचे म्हणजे आम्हा पार्लेकर मंडळींना (उपनगरीय मंडळींना) दूऽऽर 'मुंबई' ला जायचे असायचे. एकेकाळी चवळीच्या शेंगेसारखी असलेली बृहन्मुंबई सुटलेल्या बेडौल पुरंध्रीसारखी अस्ताव्यस्त झाली आहे. अशावेळी दक्षिण मुंबई म्हणजे शांत विनटलेला परिसर झाला आहे. या परिसरातील मनोरम, सुसंस्कृत हिरा ठरलेल्या साहित्य संघाचा हीरक महोत्सव आहे. या संस्थेच्या डोंगराएवढ्या उज्ज्वल कार्यासमोर मी किती छोटी व्यक्ती. एवढीशी छोटी पण माझ्यासारखीला सावली देणारा हा वटवृक्ष भवितव्यात आपल्या कार्याच्या पारंब्या रोवत आणखी आणखी बहरत जावो; ही सदिच्छा.

## मराठीचा माहोल
-सुंदररामन राममूर्ती

मुंबई मराठी साहित्य संघ गेली ७५ वर्षे साहित्य व नाट्य या क्षेत्रांत बहुमोल कार्य करीत आला आहे. साहित्य संघाच्या या दीर्घ कालावधीच्या वाटचालीत आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे मुंबईतील अनेक केंद्रांत अमराठी प्रौढ माणसांसाठी साहित्य संघाने सुरू केलेले मराठी भाषेचे वर्ग हा आहे.

चेंबूर तमिळ संघमची स्थापना होऊन ५४ वर्षे पूर्ण झाली आहेत. सर्वश्री रामजयम, कृष्णन, गोपालन, पेरूमाळ, वासन, वेंकटरमणी, विश्वनाथन, श्यामसुंदर यांच्यासारख्या सक्षम कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळे चेंबूर तमिळ संघम एवढी वर्षे सुरळीतपणे चाललेला आहे. १९६६ सालापासूनचे नाते सुदृढआहे आणि ते नाते वृध्दिंगत होत चालले आहे. चेंबूर तमिळ संघमच्या कार्यकर्त्यांना मुंबई मराठी साहित्य संघाचे ज्येष्ठ व श्रेष्ठ पदाधिकारी वामनराव ढवळे यांच्याविषयी स्नेह व आदरभाव होता. तमिळ संघमृच्याबरोबर काहीही अडचणी आल्यास तेव्हा भाऊसाहेब ढवळे त्यांना चांगला सल्ला देत असत.

मुंबई मराठी साहित्य संघ आणि चेंबूर तमिळ संघम या संस्थांच्या सहकार्याने आणि त्यांच्य संयुक्त विद्यमाने १९७० च्या ऑगस्ट महिन्यातील एका रविवारी चेंबूर केंद्रात अमराठी प्रौढ विद्यार्थ्यांसाठी मराठी वर्गांचा श्रीगणेशा झाला. भर पावसातील तो रविवार अजून मला आठवतो. मुंबई मराठी साहित्य संघाचे तात्यासाहेब आमोणकर आणि साहित्य संघाचे ज्येष्ठ पदाधिकारी वा. रा. ढवळे यांच्या हस्ते मराठीच्या वर्गाचे जनरल एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत उद्घाटन झाले आणि प्रा. राम पटवर्धन यांनी 'श्री' काढून या वर्गांचा विधिपूर्वक प्रारंभ केला. या समारंभात मराठी भाषा शिकू इच्छिणारे असंख्य अमराठी विद्यार्थी जमले होते. भाऊसाहेब ढवळे या मराठीच्या वर्गांशी एवढे समरस झाले होते की मराठीचे वर्ग आणि भाऊसाहेब ढवळे यांचे जणु समीकरणच झाले. त्यादिवशी सुरु केलेले हे वर्ग आजतागायत सातत्याने चालत आहेत. महत्वाची गोष्ट म्हणजे या केंद्रात बिगरतामिळ लोकांना तमिळ भाषाही शिकविली जात आहे. चेंबूर केंद्रात सुरू केलेले हे मराठीचे वर्ग नंतरच्या काळात शीव (मुंबई तमिळ संघम), माटुंगा, अंधेरी, गिरगाव, वाशी येथे चालविले जात आहेत. मुंबई मराठी साहित्य संघाचा हा उपक्रम आम्हा अमराठी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय उपयोगी ठरलेला आहे.

चेंबूर केंद्रात दरवर्षी साजरा होत असलेल्या मराठी भाषा प्रमाण-पत्र वितरण समारंभात ढवळे साहेब आवर्जून उपस्थित राहायचे. एवढे त्यांचे आम्हा विद्यार्थ्यांविषयीचे पितृतुल्य वात्सल्य ! ढवळे साहेबांनी आम्हांला मराठी शिकविण्यासाठी एक चांगला आणि कार्यक्षम अध्यापक - समूह निर्माण केला. मी चेंबूर केंद्रातील मराठीच्या वर्गांचा सुरूवातीपासूनचा विद्यार्थी होतो. प्रा. प्र. न. परांजपे आमचा भाषा - प्रवेश वर्ग घेत असत. मराठी व्याकरणावर त्यांचा भर असायचा. प्रा. रमेश तेंडुलकरांची शिकवण उत्कृष्ट व काव्यात्मक असायची. मल्हार ढगे उत्तम रीतीने आम्हांला शिकवीत होते. प्रा. राम पटवर्धन

आपल्या चांगल्या शिकवणीमुळे 'अध्यापनपटूच' झाले होते ! प्रा. सुधा जोशी यांच्या 'अमृततुल्य' मराठीमुळे आमची मराठी 'सुधारली'. प्रा. भांडारे मराठी भाषेचे जणू 'भांडार' चे होते. चेंबूरलाच राहणारे प्रा. अरूण कुलकर्णी हे गेली जवळ जवळ ३३ वर्षांपासून चेंबूर केंद्रात मराठी शिकवीत होते. स्थानिक रहिवाशी उषा मोघेबाईसुध्दा अजूनही चेंबूर केंद्रात दीर्घकाळ मराठी शिकवीत आहेत.

चेंबूर केंद्रातील मराठीच्या वर्गाच्या ४० व्या वर्षाला प्रारंभ झाला आहे याचा आम्हांला सानंद अभिमान वाटतो. या वर्गात मराठी शिकलेल्या विद्यार्थ्यांनी आता आपल्या मुलांना व इतर लोकांना मराठी शिकवायला सुरुवात केली आहे.

शीवमधील मुंबई तमिळ संघमच्या मराठीच्या वर्गात प्रा. अरूण टिकेकर, प्रा. सुभाष सोमण यांच्यासारखे कार्यक्षम शिक्षक मराठी अध्यापनाचे काम पाहात होते. मुंबई तमिळ संघमचे माजी अध्यक्ष आदि लक्ष्मणन व कार्यकर्ते कंदस्वामी यांचे मुंबई मराठी साहित्य संघाशी जवळचे संबंध होते. १९८४ साली भाऊसाहेब ढवळे यांचे दु:खद निधन झाले आणि त्यानिमित्त आयोजित केलेल्या शोकसभेत कंदस्वामी आवर्जून उपस्थित होते आणि त्या दिवशी ते अगदी हेलावून गेले होते. मी ही त्या शोकसभेत सहभागी झालो होतो आणि मी माझ्या भाषणात भाऊसाहेब ढवळे यांच्या व्यक्तिमत्त्व व कार्याचा उल्लेख केला होता. भाऊसाहेब ढवळे हयातभर माणसे जोडीत राहिले. नंतरच्या काळात २ फेब्रुवारी २००८ या दिवशी भाऊसाहेब ढवळे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने एक कार्यक्रम मुंबई मराठी साहित्य संघाच्या पुरंदरे सभागृहात आयोजित करण्यात आला होता. मी त्या कार्यक्रमात भाग घेऊन ढवळे साहेबांच्या कार्याबद्दल दोन शब्द बोललो. या सोहळ्यात चेंबूर तमिळ संघमचे चार पदाधिकारी सहभागी झाले होते.

माझ्या हृदयात कायमचा असा साठवलेला आणखी एक अनुभव म्हणजे मराठीचे ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर यांचा मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त सभागृहात झालेला सत्कार समारंभ! मुंबई मराठी साहित्य संघ आणि अन्य ऐंशी मराठी व अमराठी भाषक साहित्यिक व सांस्कृतिक संस्था यांच्या वतीने या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. २५ मार्च १९७६ रोजी झालेल्या त्या समारंभात मी मराठीतून चार शब्द बोललो. भाऊसाहेब खांडेकरांच्या जवळजवळ सर्व कादंबऱ्या तमिळ भाषेत अनुवादित होऊन खांडेकर तमिळनाडूमध्ये लोकप्रिय झालेले आहेत हे मी श्रोत्यांच्या निदर्शनास आणून दिले. ही संधी मला मुंबई मराठी साहित्य संघामुळे आणि भाऊसाहेब ढवळे यांच्या प्रोत्साहनामुळे मिळाली. त्या सत्कार समारंभात आ.दि. लक्ष्मणराव यांचेही भाषण झाले होते.

मुंबई मराठी साहित्य संघाचा सुवर्ण महोत्सव १९८५ साली मोठ्या उत्साहाने साजरा झाला. त्या सोहळ्यात सहभागी होण्याची सुवर्ण संधी मला लाभली होती हे माझे भाग्यच होते. आता साहित्य संघाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. या अमृत महोत्सवातही मला सहभागी होता आलं, हे माझं महद्भाग्यच म्हटलं पाहिजे.

## मुंबई मराठी साहित्य संघ - एक अमूल्य संस्कार

- प्रा. अरुण रामचंद्र कुलकर्णी

माझे बालपण आणि तरूणपण दक्षिण मुंबईत गेले आहे. गिरगावातल्या गोखले एज्युकेशन सोसायटीच्या डी.जी.टी. हायस्कूलमध्ये मी माध्यमिक शिक्षण घेतले. चौपाटीवरच्या विल्सन महाविद्यालयात माझे महाविद्यालयीन शिक्षण झाले. ज्या शाळेत शिकलो तेथेच दोन वर्षे शिक्षक म्हणून काम केले. त्यानंतर १९६६ पासून दादर चौपाटीवरच्या कीर्ती महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले. गिरगाव चौपाटी ते दादर चौपाटी असा माझा जीवन प्रवास घडत गेला.

विल्सन महाविद्यालयात शिकत असताना आणि त्यानंतरही अगदी अलीकडच्या काळापर्यंत साहित्य संघामध्ये माझे येणे जाणे होते. महाराष्ट्रातले नामवंत साहित्यिक आणि विद्वान त्याप्रसंगी पहायला मिळावेत, त्यांची भाषणे ऐकायला मिळावीत अशी त्या वयात मला मोठीच आस असायची. कार्यक्रम बहुधा संध्याकाळी असायचे. श्रोत्यांना मुक्तद्वार असलेले भाषणांचे कार्यक्रम असायचे. त्यामुळे माझ्यासारखे अनेक तरूण तेथे हजेरी लावायचे. अनंत काणेकर, पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ यांच्यासारखे अनेक प्रथित यश साहित्यिक जवळून बघायला मिळाले, त्यांचे शब्द कानावर पडले, तरी समाधान वाटायचे. कधी भालेराव नाट्यगृहात तर कधी पुरंदरे सभागृहात हे कार्यक्रम व्हायचे. साहित्य संघाच्या कार्यालयातील कोणाशीही माझी त्या वयात ओळख नव्हती. अनेक साहित्यिक व मराठीचे अनेक नामवंत प्राध्यापक व विद्वान मी येथेच प्रथम पाहिले आणि ऐकले.

प्रा. न. र. फाटक यांची व्याख्याने मी येथेच ऐकली. बी. ए. व एम. ए. परीक्षेला माझा मुख्य विषय संस्कृत होता. नंतर प्राध्यापक म्हणून बराच काळ संस्कृत शिकवीत असे. इथले दाजी भाटवडेकर मोठेच संस्कृत प्रेमी. त्यांनी संस्कृत मधील अभिजात नाटकांचे काही प्रयोग बसविले होते. त्यातले काही नाट्य प्रयोग मी साहित्य संघात तर काही रंगभवनमध्ये पाहिले.

वेद, वेदान्त, रामायण, महाभारत व भागवत यांत मला अजूनही गोडी आहे. चारही वेद, रामायण व महाभारत यांचे मराठी व हिंदी अनुवाद ज्यांनी आयुष्यभर व्यासंग करून पूर्ण केले ते वेदमूर्ती पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर - मी येथेच त्यांना पाहिले. वयाची शंभर वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार येथे झाला. शंभराव्या वर्षी सुद्धा उत्तम स्मरण शक्ती आणि तल्लख बुध्दीचे दर्शन झाले. गिरगावातील एक ज्येष्ठ पत्रकार श्री. रा. टिकेकर यांच्या ओळखीने मला त्यांना जवळून भेटता आले, त्यांच्याशी दोन शब्द बोलून त्यांचा आशीर्वाद मिळवता आला.

१९६५ साली भारत पाकिस्तान युध्द झाले. भारताने पाकच्या आक्रमणाला जशास तसे प्रत्युत्तर दिले. त्यानिमित्ताने देशाच्या संरक्षण विषयात लोकांना गोडी निर्माण झाली त्यावेळी साहित्य संघाने संरक्षण विषयातील काही तज्ज्ञ लष्करी अधिकाऱ्यांची व्याख्याने आयोजित केली होती. त्याचीही आठवण दीर्घकाळ राहिली.

इंदूरचे एक महाभारताचे व्यासंगी विद्वान प्रा. ग. बा. कवीश्वर यांची महाभारतावरील व्याख्यानमाला मी येथे रोज चेंबूरहून येऊन ऐकली.

१९७५ साली माझी प्रा. मल्हार ढगे आणि प्रा. राम पटवर्धन यांच्याशी प्रा. रमेश तेंडुलकरांमार्फत ओळख झाली हे सर्वजण मराठी भाषा वर्गाच्या चेंबूर केंद्रात शिकवित असत. ढगे आणि पटवर्धन यांना काही कौटुंबिक अडचणी आल्यामुळे त्यांनी माझा या वर्गामध्ये शिक्षक म्हणून प्रवेश करवून दिला आणि मी एका अद्‌भुत दुनियेतच प्रवेश केला. शिकण्याची इच्छा असलेले, त्यासाठी प्रयत्नशील असलेले, प्रेमाने शिकणारे प्रौढविद्यार्थी मिळणे हा शिक्षकाच्या आयुष्यातला फार मोठा आनंद असतो. या मराठी भाषा वर्गाच्या चेंबूर केंद्र, वाशी केंद्र, गिरगाव साहित्य संघ केंद्र येथे मला हा आनंद पुरेपूर मिळाला. आता जरी वयोमानामुळे येणाऱ्या शारीरिक अडचणींच्या कारणाने मी यातून निवृत्त झालो आहे, तरी शिक्षकाला हवाहवासा वाटणारा शिकविण्याचा आनंद व समाधान याच क्षेत्रात मला सर्वाधिक प्रमाणात मिळाले, यात शंका नाही. ३२-३३ वर्षे माझी रविवार सकाळ आनंदात गेली. वर्ग संपल्यावरही प्रा. ढगे, प्रा. राम पटवर्धन, प्रा. रमेश तेंडुलकर यांच्या बरोबरच्या गप्पा व चर्चाही कायमच आठवणीत राहतील.

मराठी भाषा वर्गाच्या कामामुळे माझी श्री. वा. रा. ढवळे यांची ओळख झाली. साहित्य संघात आल्यावर त्यांची भेट झाली नाही असे कधी झालेच नाही. नुसती भेटच नव्हे तर आलेल्या प्रत्येकाला चहा आणि बटाटावडा ही मिळायचा ! वडीलकीच्या नात्याने सर्वांची आस्थेने विचारपूस करणारा, प्रत्येक केंद्राशी सतत संपर्क ठेवणारा, ज्येष्ठ मार्गदर्शक त्यांच्या रूपाने लाभला, हा फार मोलाचा लाभ होता. प्रत्येक केंद्राच्या वार्षिक उद्‌घाटनाला ते स्वत: येत आणि बरोबर एखादा साहित्यिक असायचा. या सर्वांचे उत्तेजन आम्हाला लाभले.

अनेक परिसंवाद आणि चर्चासत्रे यांची मेजवानीच जणू साहित्य संघाने आमच्या सारख्या अनेक अनामिकांना दिली. 'साहित्य' हे त्रैमासिकही अनेक वर्षे वाचायला मिळत होते. त्याचे नुसते वाचनच नाही, तर मल्हार ढगे यांच्याशी, त्याच्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या अंकावर माझी चर्चा होत असे - कधी प्रत्यक्ष भेटल्यावर तर कधी फोन वर.

आता मात्र वृध्दत्वामुळे आणि काही शारीरिक व्याधींमुळे साहित्य संघात मी येऊ शकत नाही आणि मराठी भाषा वर्गाचे कामही करू शकत नाही याची खंत वाटते ; आपण काहीतरी मोलाचे गमावले आहे असे वारंवार वाटते.

माझ्या अगदी तरूण वयापासून ते अगदी अलीकडच्या काळापर्यंत, माझ्या मनाच्या कक्षा रूंदावून आणि माझ्या ज्ञानाची क्षितिजे विस्तारून, साहित्य संघाने माझ्यावर एक सखोल व व्यापक संस्कार केलेला आहे. या संस्काराचे मोल करता येणे अशक्य आहे. साहित्य संघाने मला खरोखरच खूप श्रीमंत केले आहे. हे सुवर्ण कण आणि क्षण कोणीही माझ्यापासून हिरावून घेऊ शकणार नाही.

मुंबई मराठी साहित्य संघाला अमृतमहोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

## साहित्य संघासंबधी काही आठवणी

- ज. बा. कुळकर्णी, डोंबिवली

सांप्रतच्या डॉ. अ. ना. भालेराव गल्लीतील सेंट पीटर्स आर्मेनियम चर्चच्या मालकीच्या जमिनीचा एक तुकडा संघाला मिळण्याची शक्यता होती. डॉ. भालेराव यांना, संघाची स्वत:च्या मालकीची इमारत पाहिजे, अशी तीव्र इच्छा होती. नव्हे ते त्यांचे स्वप्न होते. पैसे तर नव्हते. बँकेकडून कर्ज घ्यायचे तर तारण पाहिजे होते. अंधृटकर सांगत होते की, डॉ. भालेराव त्यांचे स्वत:चे राहते घर व मी माझी नाशिकची ५२ एकर जमीन तारण म्हणून देण्यास तयार असल्याचा अर्ज घेऊन वर्ध्यांच्याकडे गेलो. वर्धे त्यावेळी बँकेचे प्रमुख डायरेक्टर होते. वर्ध्यांनी अर्ज हातात घेतला, हसले त्यांनी तो अर्ज खणात टाकला आणि म्हणाले, अर्ज मंजूर झाले. अशारीतीने इमारतीसाठी जमीन घेण्याची पैशाची प्राथमिक अडचण दूर झाली.

संघाची इमारत बांधली जात असताना एकदा मी सायंकाळी संघाच्या गल्लीतून स्टेशनकडे चालतो होतो. तेव्हा पसरलेल्या विटांच्या एका ढीगावर बसून दामू केंकरे व त्यांचे मित्र कोणत्या तरी नाटकासंबंधी बोलत असल्याचे, ऐकल्याचे स्मरते.

नाशिकला भरणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आचार्य अत्रे यांची निवड झाली होती. यावेळी झालेले पां. वा. गाडगीळ यांचे झालेले वक्तव्य एका प्रेक्षकाला न आवडून त्याने समारंभानंतर खाली उतरताना जिन्यात गाडगीळांना गाठून मुद्दाम धक्का दिला.

दि. १५ एप्रिल १९६८ ला संघाचे पुढारी बॅ. नाथ पै यांनी प्रा. न. र. फाटक यांच्या कार्याचा गौरव करून तत्कालीन परिस्थितीचे विवेचन केले. आठवते ते, की बॅ. नाथ पै आलटून पालटून मराठी व इंग्रजीत बोलत होते. उत्तरादाखल केलेल्या भाषणात प्रा. न. र. फाटक यांनी माझ्या लिखाणाचा, भाषणाचा रोख मूर्तीवर थापलेला शेंदूर रखडण्याकडे असतो, असे म्हटल्याचे आठवते. यावेळी त्यांचे दोन छोटे नातू त्यांच्याबरोबर होते.

प्रा. न. र. फाटकांच्यामुळे माझा वा. रा. ढवळेंशी परिचय झाला आणि तो अखेरपर्यंत टिकला. त्यांच्यामुळे मी संघाच्या इमारतीत त्यांचा अनेकवेळा भेटलो आहे. साहित्य संघ इमारत म्हणजे ढवळेंची १० डाऊनिंग स्ट्रीट होती. तेथे ते हमखास भेटायचे, त्यांच्या सर्व हालचाली त्या इमारतीतून व्हायच्या.

संघाच्या अनेक वार्षिक स्नेहसंमेलनास मी उपस्थित राहिलो आहे.

अशा माझ्या दादांच्या काही आठवणी!

## माझं हृद्गत
- पंढरीनाथ तामोरे (साहित्याचार्य)

डॉ. अमृत नारायण भालेराव यांनी स्थापन केलेल्या मुंबई मराठी साहित्य संघाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने संघाच्या वाङ्मयीन परीक्षांचा एक विद्यार्थी म्हणून मी माझे हृद्गत व्यक्त करीत आहे.

तारापूर जवळील सागरकिनाऱ्यावरील 'घिवली' या गावी माझा जन्म झाला. बालपणापासून दर्यावर्दी जीवन जगलो. त्यातून तारापूरच्या रा. हि. सावे माध्यमिक शाळेतून संस्कारमय शिक्षण घेऊन मुंबईस आलो. रूपारेल महाविद्यालयातल्या कलाशाखेत शिक्षण घेत असतांनाच साहित्य अभिरूचीच्या प्रेरणेनं मी १९७३च्या दरम्यान गिरगावच्या मुंबई मराठी साहित्य संघाच्या पायऱ्या भीतऊीतच चढलो. तिसऱ्या मजल्यावर आपल्या कार्यालयात आलो. साहित्य संघाचे अध्वर्यू वा. रा. ढवळे बसले होते. गोरा रंग, रूबाबदार चेहरा, पांढरी स्वच्छ खादीची टोपी, अंगात खादीचाच शर्ट व कोट, पांढरे धोतर अशी त्यांची मूर्ती दिसताक्षणीच मनात भरली. त्यांनी प्रसन्न मुद्रेनं आणि मोकळ्या मनानं माझं स्वागत केलं आणि चहा बटाटेवडा मागवून माझं आतिथ्य केलं. मी साहित्य संघात जाऊ लागलो. त्यावेळी साहित्य संघातर्फे वाङमयीन परीक्षांचे ''प्रबोध, 'विशारद', 'साहित्याचार्य'या वर्गाचं आयोजन केलं जात होतं. त्या वर्गाचे सूत्रधार पहिल्यापासून वा . रा. ढवळे हेच कार्यरत होते. आम्ही त्यांना त्या वर्गाचे 'प्रिन्सिपॉल' म्हणत असू. त्यांनी सांगितलेले काम वेळेच्या वेळी करीत असू. त्यांनी मला 'साहित्य प्रबोध' वर्गाचा सचिव नेमला व माझ्याकडून विद्यार्थ्यांना पत्रं पाठविण्याचं काम करून घेतलं. त्यांनी सांगितल्यावर नाही म्हणवत नसे याचं कारण त्यांचं निर्मळ वागणं!

साहित्य महामंडळाच्या सर्व घटक संस्थामार्फत घेतल्या जाणाऱ्या वाङ्मयीन परीक्षांना शासकीय मान्यता मिळावी म्हणून सर्व परीक्षांच्या अभ्यासक्रमाचा दर्जा समान असावा व त्यांची नावं सारखी असावी या साठी त्यांनी घेतलेले परिश्रम सर्वश्रुत आहेत.

माझ्या २६ मार्च १९८२ रोजी प्रकाशित झालेल्या पहिल्या 'हिरवा कातळ' या कथासंग्रहास त्यांची प्रस्तावना लाभली हे मी माझं अहोभाग्य समजतो. साहित्य प्रबोध, विशारद आणि साहित्याचार्य भाग - १, वर्गापर्यंत मला त्यांचं मोलाचं मार्गदर्शन लाभलं. त्यांच्या परिचयाचं स्नेहात सहज रूपांतर झालं. त्यांचा स्नेह जडला तो अखेरपर्यंत तसाच होता. याला कारण माणसं जोडण्याचा स्वभाव ! त्या थोर माणसाचा सहवास हा माझ्या आयुष्यातला फार मोठा ठेवा आहे.

साहित्य संघात वाङ्मयीन परीक्षांचा अभ्यास करीत असतांना वा. रा. ढवळे यांच्या बरोबरच डॉ. ब. दि. कुलकर्णी, डॉ. र. वि. हेरवाडकर, कांचनमाला हरमळकर (डॉ. उमा वंडसे), प्रा. रजनी परूळेकर, प्रा. वि. शं. चौघुले, प्रा. दिगंबर पाध्ये असे मान्यवर गुरूवर्य लाभले. त्यावेळी असलेल्या विद्यार्थ्यांपैकी डॉ. रजनी आपसिंगेकर, प्रीती भटटे आज साहित्य क्षेत्रात नावलौकिक प्राप्त करून आहेत.

त्यावेळी चेंबूर तमिळ संगमच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्यानं प्रौढ अमराठी भाषकांसाठी साहित्य संघातर्फे मराठीचे वर्ग घेतले जात असत. त्याची सुरूवात प्रा. अनंत काणेकर यांच्या शुभहस्ते करण्यांत आली

होती. या अमराठी भाषिक वर्गामध्ये शिकविण्यासाठी राम पटवर्धन, प्रभाकर परांजपे, मल्हार ढगे, रमेश तेंडुलकर, सुधा जोशी या अध्यापकांची नियुक्ती केलेली होती. या भाषावर्गाचं संचालन वा . रा. ढवळे अतिशय आत्मीयतेनं करीत. प्रमाणपत्र प्रदान समारंभाला आणि नव्या सत्राच्या उद्घाटनाच्या जोड समारंभाला प्रा. वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, पु. शि. रेगे, वा. ल. कुलकर्णी, नारायण सुर्वे यांच्या सारख्या साहित्यिकांना ते आवर्जून केंद्रावरच्या मराठी भाषावर्गातल्या विद्यार्थ्यांच्या भेटीला नेत.

साहित्य संघाच्या कार्यालयात गुरूवर्य वा . रा. ढवळे यांच्या शेजारी बसून काम करीत असताना त्या वेळी तात्यासाहेब आमोणकर, नटवर्य भालचंद्र पेंढारकर, डॉ. दाजी भाटवडेकर या दिग्गज मंडळी बरोबर मल्हार ढगे, प्रा. सुभाष सोमण, बापूराव नाईक, शंकरराव अंधृटकर अशा मान्यवरांचं सानिध्य आणि मार्गदर्शन लाभलं.

साहित्याचार्य भाग -१ पूर्ण झाल्यानंतर आम्ही गुरूजन आणि विद्यार्थी मिळून निरोप समारंभ साजरा केला होता. मात्र त्या नंतर काही महिन्यांनी गुरूवर्य वा. रा. ढवळे यांचं निधन झालं. मी मात्र साहित्य संघात जाऊन 'साहित्याचार्य भाग - २ करिता प्रबंध तयार करून डॉ. व. दि. कुलकर्णी यांना सादर केला होता. तो त्यांनी अभिप्रायासह साहित्य संघाकडे पाठविला होत आणि त्या संदर्भात त्यांनी मला पत्रानं कळविलं होतं. मी मात्र साहित्याचार्य पदवी मिळविण्याच्या ध्येयानं झपाटलो होतो. पण त्यावेळी साहित्य संघात वा. रा. ढवळे यांच्या जाण्यानं त्यांच कार्य करण्यास कोणीच दिसत नव्हतं. मला योग्य त... तिसाद मिळत नव्हता. अखेर मी ख्यातनाम साहित्यिक, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांना याबाबत कळ... असता ते साहित्य संघात माझ्याबरोबर आले, तेव्हां कुठं साहित्याचार्य भाग - २ च्या कार्यास गती मिळाली आणि रहिलेल्या दोन प्रश्नपत्रिका प्रा. सुभाष सोमण यांच्या मागदर्शनाखाली दिल्या. त्यावेळी मल्हार ढगे यांचं मला मोलाचं सहकार्य लाभलं.

२०० गुणांचा प्रबंध आणि २०० गुणांच्या दोन प्रश्नपत्रिका असे पेपर्स दिल्यानंतर त्यांची योग्य प्रकारे तपासणी झाल्यानंतर साहित्य संघाने मला ''साहित्याचार्य परीक्षा'' उत्तीर्ण झाल्याचं कळविलं आणि विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे साहित्य संघाच्या वार्षिक प्रमाणपत्र प्रदान समारंभात मला मान्यवरांच्या शुभहस्ते 'साहित्यचार्य' प्रमाणपत्र देऊन गौरविण्यांत आलं हे मी माझ भाग्य समजतो. मला हे भाग्य लाभू देणाऱ्या मुंबई मराठी साहित्य संघ आणि मला 'साहित्याचार्य' होण्यास प्रवृत्त करणारे परीक्षा संचालक भाऊसाहेब ढवळे यांची मला नेहमीच कृतज्ञता वाटत आली आहे.

गुरूवर्य वा. रा. ढवळे यांच्या निधनोत्तर मला त्यांच्या नावे मिळालेलं ग्रंथ पारितोषिक म्हणजे मराठीतले मान्यवर संपादक श्री. पु. भागवत यांच्या सहकार्यानं संपादित केलेला बहुमोल गौरव ग्रंथ. श्रेष्ठ समीक्षक व प्राध्यापक वा. ल. कुलकर्णी यांच्या वरचा वाङमय प्रकारांची आणि वाङ्मयाध्यापनाची सखोल जाण देणारा असा हा महत्वाचा ग्रंथ आहे. तो मला पारितोषिक म्हणून प्राप्त झाला याचा सानंद अभिमान वाटतो. दर्यावर्दी जीवन अनुभवणारा मी कधी काळी सागरातून साहित्याच्या महासागरात रमू शकेल याची यत्किंचितही जाणीव मला नव्हती.

साहित्य संघाच्या अमृत महोतसवाच्या वाटचालीला माझ्या शुभेच्छा !

# स्मरणगाथा

संकलन :- यशवंत पंडित

सहाय्य :- शि. मो. घैसास, मल्हार ढगे

मुंबई मराठी साहित्य संघ

मुंबई मराठी साहित्य संघाने यावर्षी आपल्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. संघाची ही अमृत महोत्सवी वाटचाल एक आनंद पर्वणी आहे. गेल्या पंचाहत्तर वर्षाच्या साहित्य संघाच्या जडण घडणीत, साहित्य संघाने मराठी भाषेच्या विकासासाठी बहुमोल कार्य केले आहे, तसेच मराठी रंगभूमीला नवसंजीवनी देऊन, मराठी नाटकांना पुन्हा सुगीचे दिवस दाखविले आहेत.

संघाच्या कार्यकक्षेत संघाला अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले. या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने बहुमोल कार्य करणाऱ्या तसेच संघाला मानसन्मान प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या अनेकांचे सहकार्य हा संघकार्याच्या यशाचा पाया आहे. या आनंद-पर्वणीला, संघाला सहकार्य देणाऱ्या अनेक व्यक्ती आमच्या डोळ्यांसमोर उभ्या आहेत. त्यांचे स्मरण आज कृतज्ञतापूर्वक आम्ही शब्दरूप करीत आहोत, यासाठीच ही स्मरण गाथा.

संघ व संघकार्याशी नातं जोडलेल्या ज्या व्यक्ती दिवंगत आहेत, त्यांची उणीव आम्हाला प्रकर्षाने जाणवत आहे.

साहित्य संघाला सहकार्य देणाऱ्या सर्व हितचिंतकांचे आम्ही कृतज्ञ आहोत.

ही स्मरण गाथा तयार करताना, अनवधानाने कांही व्यक्तींची नावे राहून गेली असतील त्यासाठी क्षमस्व.

## या ७५ वर्षांच्या वाटचालीत, साहित्य संघाच्या कार्यक्रमांस उपस्थित असलेले प्रतिष्ठित आणि संघकार्यातील मान्यवर


इंदिरा गांधी


मोरारजी देसाई


व्ही. व्ही. गिरी


यशवंतराव चव्हाण


सी. डी. देशमुख


बालगंधर्व


बाळासाहेब देसाई


न. र. फाटक


द. वा. पोतदार


प्रा.त्र्यं.वि.पर्वते


न्या.भा.ना.गोखले


गंगाधर गाडगीळ


पु. ल. देशपांडे


लक्ष्मणशास्त्री जोशी


अमरशेख


वसंत देसाई



न. वि. गाडगीळ


कुसुमाग्रज

# सेवाव्रती
## - मुंबई मराठी साहित्य संघाला निरपेक्ष सहकार्य देणारे



**डॉ. अ. ना. भालेराव**
माजी विश्वस्त, प्रमुख कार्यवाह
साहित्य संघासाठी तनमनधन
अर्पण करणारे व्यक्तिमत्व,
मराठी रंगभूमीला नवचैतन्य
देणारे धन्वंतरी



**वहिनी तथा सुधा भालेराव**
डॉ.भालेरावांबरोबर संघासाठी
प्रचंड परिश्रम करणारे व्यक्तिमत्व



**डॉ. भा. नि. पुरंदरे**
**-माजी विश्वस्त**
साहित्य संघाला प्रत्येक कार्यात
सहकार्य देणारे आधार स्तंभ.
यांच्या नावे संघमंदिरात ५ व्या
मजल्यावर पुरंदरे सभागृह आहे.



**डॉ. गं. मा. फडके**
माजी विश्वस्त, आश्रयदाते
साहित्य संघाच्या प्रारंभकालापासून
विविध सहकार्य देणारे



**मनुताई फडके**
माजी विश्वस्त, साहित्य संघाला
विविध कार्यात प्रत्यक्ष उपस्थित
राहून सहकार्य देणाऱ्या



**दत्तो अप्पाजी तुळजापूरकर**
पहिले संघाध्यक्ष, पहिल्या मुं. म.
साहित्य संमेलनाच्या उभारणीत
सहभाग, ६ व्या मुंबई व उपनगर
साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष



**अ. बा. गजेंद्रगडकर**
माजी विश्वस्त, अध्यक्ष,
मराठी साहित्यासाठी आस्थापूर्वक
सहकार्य देणारे, न्यायमूर्ती संघातील
संदर्भ ग्रंथालयाला त्यांचे नाव आहे.



**दि. वि. आमोणकर**
प्रमुख कार्यवाह, संघाला प्रारंभीपासून
अनेक वर्षे संघाच्या विविध विभागात
सहकार्य देणारे



**चं. वि. बावडेकर**
माजी प्रमुख कार्यवाह (१६ वर्षे),
संघाचे आजीव सदस्य करण्याचे
योगदान देणारे
संपादक - साप्ताहिक आलमगीर



**बापूराव नाईक**
माजी प्रमुख कार्यवाह,
संघाची शासकीय संबंधित कामे
तत्परतेने करणारे



**प्रा. वा. ल. कुलकर्णी**
साहित्य संघाचे सन्माननीय सभासद, उपाध्यक्ष कार्यकारी व नियामक मंडळ सदस्य, ५२ साली मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष



**श्री. शं. नवरे**
माजी कोषाध्यक्ष, संघाचा आर्थिक व्यवहार कटाक्षाने सांभाळणारे



**डॉ. बाबा कलगुटकर**
माजी कोषाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह संघाच्या कामात अनेक वर्षे आत्मियतेने सहभाग



**खं. मा. दौंडकर**
उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, कार्यकारी मंडळ सदस्य, वाङ्मयीन परीक्षावर्गाचे अध्यापक



**वि. ह. कुलकर्णी**
वा. म. जोशी व्याख्यानमालेतील व्याख्याते, वाङ्मयीन परीक्षा वर्गाचे अध्यापक, संघाचे नाटककार



**सुशील कवळेकर**
माजी विश्वस्त, कायदेविषयक सल्लागार



**भीमराव कुळकर्णी**
साहित्य संघाच्या साहित्य विषयक उपक्रमांत प्रचंड सहकार्य. काही स्मरणिकांचे संपादन. काही काळ साहित्य मासिकाचे संपादक, वाङ्मयीन परीक्षा वर्गाचे अध्यापक



**पु. शि. रेगे**
वाङ्मयीन परीक्षा वर्गाचे अध्यापक



**प्रा. कृ. पा. कुलकर्णी**
उपाध्यक्ष, वाङ्मयीन परीक्षा वर्गाचे अध्यापक



**अप्पा पेंडसे**
नाट्यशाखेचे कलावंत, केळेवाडी रस्त्याला डॉ. अ. ना. भालेराव मार्ग हे नाव देण्यासाठी विशेष प्रयत्न करणारे



**दाजी भाटवडेकर**
माजी प्रमुख कार्यवाह, कार्याध्यक्ष, अध्यक्ष नाट्यकलावंत, संघाला कर्जमुक्त करण्यासाठी देणग्या जमवून उद्दिष्ट साध्य करणारे संघप्रेमी



**भार्गवराम पांगे**
नाट्यगृह व्यवस्थापक, अनेक वर्षे संघाचे नाट्यप्रयोग दौरे सांभाळणारे, नाट्यशाखेचे एक आधारस्तंभ, परिवारासहीत सहकार्य



**शिवा चिखलीकर**
नाट्यगृह व्यवस्थापक म्हणून अनेक वर्षे सहकार्य कार्यवाह संघ मंदिर व्यवस्था समिती,
कार्यकारी व नियामक मंडळ सदस्य, प्रमुख कार्यकर्ते



**वा. रा. ढवळे**
माजी साहित्य शाखा कार्यवाह
साहित्य शाखेचे आधारस्तंभ,
साहित्य त्रैमासिकाचे माजी संपादक,
अमराठी भाषिकांसाठी असलेल्या वर्गाचे माजी संपादक



**शं. ना. अंधृटकर**
माजी विश्वस्त, नाट्य शाखा कार्यवाह साहित्य संघाचे प्रारंभ कालापासूनचे निष्ठावंत कार्यकर्ते,
संघाचे इतिहास लेखक, 'नाटक' या नियतकालिकाचे माजी संपादक



**त्र्यंबक गोखले**
नाट्यशाखा कलावंत,
डॉ. अ. ना. भालेराव नाट्यगृहाचे अनेक वर्षे व्यवस्थापन



**आनंदराव ढोलेकर**
संघाचे एकनिष्ठ कार्यकर्ते



**माधव मनोहर**
एक तत्वनिष्ठ नाट्यसमीक्षक



**प्रा. अनंत काणेकर**
संघाचे नाटककार, उपाध्यक्ष
कार्यकारी व नियामक मंडळ सदस्य
वाङमयीन परीक्षा वर्गाचे अध्यापक
कवी, ललित, लेखक, पत्रकार



**आचार्य अत्रे**
सन्माननीय सभासद, साहित्यिक,
पत्रकार, साहित्य संघाचे नाटककार,
वक्ते आणि संघाबद्दल
प्रचंड आत्मियता असणारे प्रसन्न व्यक्तिमत्त्व



**रामराव विजयकर**
साहित्य संघाच्या प्रारंभ कालावधीतील सल्लागार



**प्रभाकरपंत जोशी**
माजी उपाध्यक्ष, साहित्य संघासाठी
देणग्या जमवून उपक्रम यशस्वी करून
देण्यासाठी झपाटलेले व्यक्तिमत्व



**प्रभाकर पाध्ये**
संघाध्यक्ष,
वाङ्मयीन परीक्षा वर्गाचे अध्यापक



**लीला मस्तकार रेळे**
साहित्य संघाच्या प्रारंभ काळातील
तत्पर कार्यकर्त्या



**प्रा. का. रा. गुंजीकर**
उपाध्यक्ष, कार्यकारी व नियामक
मंडळ सदस्य,
रँगलर



**र. धों. कर्वे**
उपाध्यक्ष,
संघकार्याशी एकरूप,
चिकित्सक बुध्दिवादी
'समाजस्वास्थ'कार



**श्री. म. वर्दे**
संघाच्या पहिल्या घटनेचे
शिल्पकार, संघाचे मुखपत्र 'वीणा'
मासिकाचे संपादक, शाहीर
वाङ्मयाचे अभ्यासक, चतुरस्त्र
लेखक



**प्रा. त्र्यं. कृ.टोपे**
विश्वस्त, उपाध्यक्ष, कार्यकारी व
नियामक मंडळ सदस्य
भारतीय घटना-तज्ज्ञ



**प्रा. द. के. केळकर**
संघाध्यक्ष, उपाध्यक्ष



**प्रा. रा. भि. जोशी**
सन्माननीय सभासद
वाङ्मयीन परीक्षा वर्गाचे अध्यापक



**डॉ. श्रीरंग आडारकर**
संघाचे माजी उपाध्यक्ष, विश्वस्त,
साहित्य संघाबद्दल प्रचंड आत्मीयता
असलेले आधारस्तंभ,
संघाच्या अनेक कार्यक्रमांसाठी
देणग्या आणणारे आश्रयदाते,
डॉ. अ. ना. भालेराव जन्मशताब्दी
समितीचे अध्यक्ष,
संघाला ५० लाख रूपयांच्या देणग्या
आणून देणारे मनस्वी कार्यकर्ते



**जयंत साळगावकर**
अध्यक्ष , साहित्य संघाबद्दल प्रचंड
आपुलकी असणारे, संघकार्यात भाग
घेणारे, कार्यक्रमासाठी अर्थपूर्ण देणग्या
देणारे, साहित्य नाट्यप्रेमी



**डॉ. शरयू चंद्रगिरी**
साहित्य संघाचे पुरंदरे सभागृह आणि
गजेंद्र गडकर ग्रंथालय यांच्या नूतनी-
करणासाठी आत्मीयतेने मोठा आर्थिक
सहभाग देणारे व्यक्तिमत्व

## नाट्यसेवाव्रती
### - मुंबई मराठी साहित्य संघाशी संबंधित



**गणपतराव बोडस**
नाट्यशाखेचे दिग्दर्शक,
नाट्य कलावंत,
नाट्य सल्लागार



**केशवराव दाते**
नाट्यशाखेचे दिग्दर्शक,
नाट्यकलावंत,
नाट्य सल्लागार



**चिंतामणराव कोल्हटकर**
नाट्यशाखेचे दिग्दर्शक,
नाट्य कलावंत, नाटककार,
डॉ. भालेराव स्मारक
व्याख्यानमालेतील व्याख्याते



**बाळासाहेब काळे**
दिग्दर्शक (नाट्यशास्त्र),
छायाचित्रकार



**चिं य. मराठे**
साहित्य संघाचे नाटककार



**दुर्गाबाई खोटे**
माजी विश्वस्त,
नाट्यशाखेच्या अभिनेत्री
आणि दिग्दर्शिका



**वनमाला**
नाट्यशाखेच्या अभिनेत्री



**नानासाहेब फाटक**
नाट्यशाखेचे प्रमुख कलावंत



**शामराव ओक**
साहित्य संघाचे नाटककार



**दामू केंकरे**
नाट्यशाखेचे दिग्दर्शक आणि
कलावंत रंगमंच विभागात नेपथ्य
आणि सजावट यांचे सल्लागार



**सुधा करमरकर**
नाट्यशाखेच्या दिग्दर्शिका,
कलावंत आणि बालरंगभूमी
विभागाच्या संयोजक-संचालक



**मीनाक्षी शिरोडकर**
नाट्यशाखेच्या नाट्यकलावंत



**ज्योत्स्ना भोळे**
नाट्यशाखेच्या नाट्यकलावंत



**के. ना. काळे**
नाट्यशाखेचे दिग्दर्शक,
कलावंत,
नाट्य-शिक्षण वर्गात प्रशिक्षक



**विजया मेहता**
नाट्यशाखेच्या दिग्दर्शक,
कलावंत, संघ नाट्यशाखेच्या
जर्मन दौऱ्याच्या संयोजक



**मामा वरेरकर**
साहित्य संघाचे नाटककार,
सन्माननीय सभासद



**मो. ग. रांगणेकर**
साहित्य संघाचे नाटककार



**पु. ल. देशपांडे**
संघ नाट्यशाखेचे नाटककार,
कलावंत, दिग्दर्शक आणि
संघमंदिर उद्घाटन समारंभाच्या
कार्यक्रमाचे सूत्र संचालक



**द. ग. गोडसे**
साहित्य संघाचे नाटककार,
नेपथ्य विभागात मौलीक सहकार्य



**मा. दत्तारामबापू वळवईकर**
नाट्यकलाकार-
राम शास्त्री, सवाई माधवराव, ययाति
ह्या अजरामर भूमिका



**प्रभाकर गुप्ते**
नाटककार



**अनंत वर्तक**
नाट्यकलाकार-अश्विनशेठ,
सर्जेराव या महत्वपूर्ण भूमिका



**जगन्नाथ ठाकूर**
तंत्रज्ञ



**भालचंद्र पेंढारकर**
माजी उपाध्यक्ष, संघाच्या नाट्यशाखेचे
कलावंत आणि संघाच्या
नाट्यशाखेच्या नाट्य विषयक कार्यात
आत्मियतेने सहभागी झालेले कार्यकर्ते

## रंगमंच सेवाव्रती

रंगभूषा - संघाच्या नाट्यप्रयोगांसाठी रंगभूषेचे सहकार्य पुढील व्यक्तींनी अनेक वर्षे दिले.
नाना जोगळेकर, वर्दम मेकअप सर्व्हीस

## नाट्यशिक्षण वर्ग प्रशिक्षक

नाट्यशिक्षणाचे महत्व ओळखून साहित्य संघाने अनेक वर्षे नाट्यशिविरे आयोजित केली. या नाट्यप्रशिक्षक वर्गांना प्रशिक्षक म्हणून पुढील व्यक्तींचे मौलिक सहकार्य मिळाले.
प्रभाकर गुप्ते, पाश्वनार्थ आळतेकर, कमलाकर सोनटक्के, वामन केंद्रे, जयदेव हट्टंगडी, रमेश चौधरी

## साथ संगत

साहित्य संघाच्या नाटकांना संगीताची साथ देणारे पुढील कलाकार साहित्य संघाच्या नाट्यशाखेला अनेक वर्षे साथ संगत देण्याचे कार्य करीत आहेत-

**हार्मोनिअम वादक**
गोविंदराव पटवर्धन, माधवराव कुंडले, तुळशीराम बोरकर, विश्वनाथ कान्हेरे, केदार भागवत, अनंत लिमये, ज्ञानेश पेंढारकर

**तबला वादक**
अण्णासाहेब थत्ते, भोजराज साळवी, साई बँकर, दामुअण्णा पार्सेकर, जगदीश मयेकर

**व्हायोलीन**
वर्वे, चिंमणी हाटे, सुभाष वनगे, राजेंद्र भावे

# मुंबई मराठी साहित्य संघ अमृतमहोत्सव कार्यक्रम

**मुंबई मराठी साहित्य संघाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त - साहित्य आणि नाट्यविषयक कार्यक्रम**

**शनिवार दि. २४ ऑक्टोबर २००९**

| | |
|---|---|
| अमृत महोत्सव उद्घाटन | अध्यक्ष - प्रा. के. ज. पुरोहित |
| | उद्घाटक - श्रीमती विजया मेहता |
| | प्रमुख पाहुणे - डॉ. प्रभाकर देवधर |
| अमृत व्याख्यानमाला पुस्तक प्रकाशन | (सौजन्य श्री. जयंतराव साळगांवकर) |
| महानगर संमेलन उद्घाटन | अध्यक्ष : श्री. रामदास फुटाणे |
| सत्र १ : कवी संमेलन | सहभाग :नीरजा, अनुपमा उजगरे, नलेश पाटील, अरुण म्हात्रे |

**रविवार दिनांक २५ ऑक्टोबर २००९**

| | |
|---|---|
| महानगर संमेलन - सत्र २ :परिसंवाद | अध्यक्ष : श्री. मधु मंगेश कर्णिक |
| विषय : 'मराठीशी माझं नातं' | (अन्यभाषिक साहित्यिकांची मनोगते) |
| | सहभाग : प्रतिभा दवे (गुजराथी), ए. जनार्दन (तेलगू) |
| | कमला सत्पथी (उडिया), हरी पंकज (सिंधी) |
| | पुष्पा भारती (हिंदी) |
| | (सौजन्य : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ) |
| पु. भा. भावे जन्मशताब्दी समारंभ | वक्ते : श्री. श्रीराम सिधये |
| नाट्यप्रयोग 'संगीत स्वामिनी' | लेखक : पु. भा. भावे |
| | दिग्दर्शक : शुभदा दादरकर |
| | संगीत : ज्ञानेश पेंढारकर |
| | कलाकार : ओंकार पाटील, तक्षील खानविलकर, |
| | राजीव चुरी, मधुरा परांजपे, सई घारपुरे, प्राजक्ता जोशी |

**सोमवार दिनांक २६ ऑक्टोबर २००९**

| | |
|---|---|
| 'सुखद स्मृती'- | संकल्पना, लेखन, सादरीकरण : रजनी जोशी |
| संगीत रंगभूमीच्या वाटचालीचा | कलाकार : नारायण बोडस, प्रल्हाद अडफडकर, |
| आढावा घेणारा नाट्यसंगीताचा | चंद्रकांत कोळी, ज्ञानेश पेंढारकर, अपर्णा अपराजित, |
| अविस्मरणीय कार्यक्रम | सुवर्णा कागल, वंदना घांगुर्डे, नीलाक्षी पेंढारकर |

**मंगळवार दिनांक २७ ऑक्टोबर २००९**

| | |
|---|---|
| साहित्य संघ 'वर्धापन दिन' | साहित्यसेवा व नाट्यसेवा गौरव पुरस्कार वितरण<br>महनीय प्रवक्ते : श्री. रामदास कामत |
| 'अमृत-स्मृती' ग्रंथाचे प्रकाशन | अध्यक्ष : मा. श्री. जयंतराव साळगांवकर |
| श्री. मंगेश पाडगावकर-मुलाखत | मुलाखतकार : श्री. शंकर वैद्य |

**गुरुवार दिनांक ५ नोव्हेंबर २००९**

| | |
|---|---|
| रंगभूमी दिन-नाट्यप्रेमींचा मेळावा | अध्यक्ष : डॉ. बाळ भालेराव<br>प्रमुख पाहुणे : श्री. अजय आंबेकर,<br>संचालक-सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन |
| मनोगत– विषय : | 'मुंबई मराठी साहित्य संघाची वाटचाल' - आमचा सहभाग<br>श्री. प्रभाकर पणशीकर (नाट्यसंपदा)<br>श्री. मोहन तोंडवलकर (कलावैभव)<br>श्रीमती लता नार्वेकर (श्री चिंतामणी)<br>श्री. सुधीर भट (सुयोग) आणि<br>श्री. भालचंद्र पेंढारकर (ललित कलादर्श) |
| डी.व्ही.डी. चे हस्तांतर : | श्री. भालचंद्र पेंढारकरांनी ध्वनीमुद्रित केलेल्या दुर्मिळ कार्यक्रम |
| रंगगंध अमृताचा | सवेष नाट्यप्रवेश - |
| साहित्य संघाचा नाट्यप्रवास : | भाऊबंदकी, होनाजी बाळा, सं. स्वयंवर, गोरा कुंभार,<br>धाडिला राम तिने कां वनी (भास)<br>अजब न्याय वर्तुळाचा, टिळक-आगरकर, सन्यस्त खडग<br>संकलन : रवींद्र खरे, प्रमोद पवार<br>कलाकार : नाना बोडस, माया जाधव, शहाजी काळे,<br>प्रमोद पवार, वेदश्री ओक, प्रल्हाद अडफडकर, रवींद्र खरे,<br>सुहास भालेकर, प्रतिभा अमृते, नीलाक्षी व ज्ञानेश पेंढारकर,<br>अपर्णा अपराजित, वंदना घांगुर्डे, सुभाष भागवत,<br>चंद्रकांत कोळी, रेखा सबनीस, रवींद्र बेर्डे, सुधाकर भानुशे |

**रविवार दिनांक ८ नोव्हेंबर २००९**

| | |
|---|---|
| प्रकाशन दिन | वि. पु. भागवत पुरस्कार वितरण |

---

नेपथ्य : बाबा पार्सेकर, सुधीर ठाकूर, प्रकाश योजना : सुधीर ठाकूर
रंगभूषा : राजन वर्दम, साथ : मकरंद कुंडले, साई बँकर, राजेंद्र भावे

अमृत स्मृति


डॉ. अ. ना. भालेराव नाट्यगृह
मुंबई मराठी साहित्य संघ